पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक १२ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ फेब्रुवारी २०२२



## जग बदल घालुनि घाव, सांगूनी गेले मला भीमराव

### अमृत महोत्सव

तुम्ही सर्व सभासद, श्रेष्ठीजन
जे अमृत चाखत आहात,
तुम्ही जे भोजामृत खात आहात, ओळीबद्ध होऊन ,
आठवा त्या वीरांना
ज्यांनी आपल्या कंठात विष घेतले होते तुमच्यासाठी,
आठवा त्या योद्ध्यांना
ज्यांनी तुमच्या, माझ्यासाठी चाखले होते विष,
एक घास त्यांच्यासाठीदेखील;
ज्यांनी, जे अमृत तुम्ही आज पीत आहात, तो अमृत– कलश
त्यांनी फुटण्यापासून वाचवला होता
तुम्ही जे अमर आहात;
लक्षात ठेवा, की हा अमृतकलश केवळ तुमच्यासाठीच नव्हता,
तर कोट्यवधी जनतेसाठीही होता,
पण त्या कोट्यवधी जनतेने अजूनपर्यंत हा
अमृत– कलश पाहिलेलाच नाही,
जे उभे आहेत बाहेर, या महोत्सवापासून बहिष्कृत!
विसरू नका, की समुद्रात अजूनही विष आहे, भरपूर

हिंदी रचना : अरूण कमल, पाटणा
अनुवाद : डॉ. सूर्यनारायण रणसुभे, लातूर

# वाचकांची पत्रे

## 'घटनादुरूस्ती' चा अंक उत्कृष्ट

'एका वादळी घटनादुरूस्तीची चित्तरकथा' ही कव्हर स्टोरी असलेला १६ ते ३१ जानेवारी २०२२ चा अंक उत्कृष्ट होता. त्रिपूरदमन सिंग यांच्या 'सिक्स्टीन स्टॉर्मी डेज : द स्टोरी ऑफ द फर्स्ट अमेंडमेंट टू द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया' या ग्रंथाच्या आधारे प्रा. अविनाश कोल्हे यांनी पहिल्या घटनादुरूस्तीसंदर्भात केलेले विवेचन अभ्यासपूर्ण आहे. घटनादुरूस्तीची अपरिहार्यता मांडणारा हा लेख आम्हास विशेष आवडला.

– **विजय पाटील, संजय पाटील,** लातूर

## हा तर लोकशाहीला वेठीस धरण्याचा प्रयत्न

लोकशाहीच्या नावाखाली सत्ता उपभोगत असलेले काही राजकीय पक्ष या देशातील लोकशाहीलाच नख लावण्याचे प्रयत्न करीत आहेत. अशांवर टीकेची झोड उठवणारे 'धर्मसंसदेला फुटताहेत भगवे काटे' हे संपादकीय मार्मिक होते. संसदीय लोकशाहीविरूद्ध आवाज उठवण्यासाठी आता धर्मसंसदांचाही वापर केला जातोय, ही चिंतेची बाब आहे.

– **धर्मराज गायकवाड,** नांदेड

## हिंदू राष्ट्र बनवण्याचे षड्यंत्र

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे; परंतु धर्म आणि संस्कृतीच्या नावाने धार्मिक राष्ट्रवादाची पेरणी करून काही लोक भारतास हिंदू राष्ट्र बनवण्याचे षड्यंत्र रचत आहेत. अशा लोकांवर टीकास्त्र सोडणारा 'धर्मसंसदेला फुटताहेत भगवे काटे' हा अग्रलेख चिंतनीय होता. अग्रलेखाबद्दल संपादकांचे अभिनंदन.

– **सुरेश दणके,** मुंबई

## जनार्दन वाघमारे यांच्या कार्याला सलाम

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांच्यावरील व्यक्तिविशेष खास होते. डॉ. वाघमारे सर केवळ कुलगुरू किंवा नगराध्यक्ष म्हणूनच काम केले नाहीत तर समाजातील वंचितांसाठी झोकून देऊन काम करणारे ते एक सामाजिक कार्यकर्तेही आहेत, हे त्यांच्यावरील या लेखातून समजले. विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञातल्या या सामाजिक कार्यकर्त्याच्या कार्याला सलाम.

– **प्रकाश वानखेडे,**
**अनिता वाघमोडे,** नागपूर

## गोव्यातही पुरोगामी विचार रुजताहेत

पुणे जिल्ह्यातल्या भोर येथील फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रसारक मंडळाने गोव्यात आयोजित केलेल्या फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रसार संमेलनाचा लेखाजोखा मांडणारा प्रा. डॉ. रोहिदास जाधव यांचा लेख गोव्यात फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ रुजत असल्याचे सांगणारा होता. अशा संमेलनाच्या माध्यमातून समाजमनात महापुरूषांचे विचार रुजताहेत, ही चांगली गोष्ट आहे. संमेलनाच्या आयोजकांना धन्यवाद.

– **सदानंद वाघमारे,** औरंगाबाद

## परीक्षांमधला गोंधळ संपावा

बेरोजगारांचा जीव मेटाकुटीला आणणारा परीक्षांमधला घोळ संपावा, अशी साद घालणारा भास्कर नाशिककर यांनी लिहिलेला लेख उत्तम होता. पेपरफुटीमुळे परीक्षा पुढे ढकलण्याच्या प्रकारांमुळे तरूणांमध्ये एक प्रकारचं नैराश्य आलेलं आहे. असे प्रकार थांबवले तरच बेरोजगारांना दिलासा मिळू शकेल, असे सांगणारा हा लेख होता.

– **श्यामसुंदर पायके,** यवतमाळ

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**मुखपृष्ठ**
सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com



(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.



द पीपल्स पोस्ट
8888541822

**• जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

**• वर्गणीदारांसाठी संपर्क**

**महाराष्ट्र / मुंबई :**
गजानन आठवले : 9076065215
विदर्भ : आंकुश वाकडे : 9421424242
मराठवाडा : सचिन : 7350091569
कोकण : संकेत तांबे : 7738784132

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा


# पाक्षिक द पीपल्स पोस्ट

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी


स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक १२ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ फेब्रुवारी २०२२



| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | ४ |
| उमेदवारांची जिंकण्याची क्षमताच ठरवणार गोव्याचे राजकीय भवितव्य | – सुरेश स. नाईक | ६ |
| हवा दिल्लीची : भेट पर्ल हार्बरच्या ऐतिहासिक राष्ट्रीय संग्रहालयाची | – विजय नाईक | ११ |
| सकारात्मक बदलांसाठी घटनादुरूस्ती अनिवार्य | – प्रा. अविनाश कोल्हे | १४ |
| धर्म अन् जातीच्या गणितावरील निवडणुका | – भास्कर नाशिककर | २१ |
| धर्म एक चक्रव्यूह : भक्तिपंथ : धार्मिक स्वातंत्र्य व समतेसाठीचा संघर्ष | – बी. जी. वाघ | २४ |
| सामाजिक समानता कुठंय ? | – डॉ. विनोद मिश्रा | २८ |
| व्यक्तिविशेष : कष्टकऱ्यांचा आवाज : एन.डी. पाटील | – प्रतिनिधी | ३१ |
| आज-कालचे प्रश्न | – पंक्चरवाला | ३७ |
| ग्रंथ परिचय : छळणाऱ्या, अस्वस्थ करणाऱ्या कहाण्या : सूर्याचे सांगाती | – सुदीप गुजराथी | ३३ |
| कविता : सावित्रीची लेक – भीमराव धुळूबुळू<br>छंद वाचनाचा – प्रा.डॉ. द्वारका गिते-मुंडे<br>नामांतर लढा – जी. संदीप | | ३८ |
| ग्रेट थॉट्स | | ३९ |



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# जग बदल घालुनि घाव, सांगूनी गेले मला भीमराव

प्रसिद्ध साहित्यिक कॉ. अण्णा भाऊ साठे यांनी १९५६ ते १९५८ च्या दरम्यान 'जग बदल घालुनि घाव, सांगूनी गेले मला भीमराव' हे प्रचंड गाजलेले गाणे लिहिले होते. आजही ते लाखो लोकांच्या ओठावर मोठ्या त्वेषाने अवतरत असते. सांगुनी गेले मला भीमराव, याचा अर्थ भीमरावांची विचारधारा मला सांगून गेली आहे, की हे जग बदलायचं आहे, असा त्याचा ढोबळ मानाने अर्थ घ्यायला काहीच अर्थ नाही. तो घेत असताना अण्णा भाऊ कम्युनिस्ट की आंबेडकरवादी, या वादात पडता कामा नये. बाबासाहेबांनी हे जग बदलायचा आदेश मला दिला आहे, असं अण्णा भाऊ सांगतात आणि त्याचबरोबर कोणतं जग बदलायचं आहे हेही ते या गाण्यातून व्यक्त करतात. तर हे बदलायचं जग असं आहे.

गुलामगिरीच्या या चिखलात । रुतून बसला का ऐरावत ।
अंग झाडुनी निघ बाहेरी । घे बिनीवरती घाव ।।
धनवंतांनी अखंड पिळले । धर्मांधांनी तसेच छळले ।
मगराने जणू माणिक गिळले । चोर जाहले साव ।।
ठरवून आम्हा हीन कलंकित । जन्मोजन्मी करूनी अंकित ।
जिणे लादूनी वर अवमानित । निर्मून हा भेदभाव ।।
एकजुटीच्या या रथावरती । आरूढ होऊन चल बा पुढती ।
नव महाराष्ट्रा निर्मून जगती । करी प्रचंड निज नाव ।।

डॉ. बाबासाहेबांनी आयुष्यभर ज्या गोष्टींविरूद्ध लढा दिला, त्या सर्व गोष्टी अण्णा भाऊंच्या गाण्यात सहज अवतरल्या आहेत. यातील काही गोष्टी अण्णा भाऊ ज्या पक्षाचे होते त्या पक्षाच्या अजेंड्यावरही होत्या. मुद्दा हा आहे, की देशाला १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. पुढे नोव्हेंबर १९४९ ला राज्यघटना तयार झाली. १९५० ला ती देशाच्या मालकीची झाली, देशाला अर्पण करण्यात आली. असे करत करत स्वातंत्र्य ७५ घरात खेळले-बागडले आणि राज्यघटनाही ७१ घरात खेळली. विकास पावली. ती सामान्यांच्या जगण्याचे, विचारांचे, अस्मितेचे साधनही ठरली. अण्णा भाऊंच्या गाण्यात जे प्रश्न आले ते वर्ण, वर्ग आणि संयुक्त महाराष्ट्रासंदर्भातील आहेत. पण मूळ आशय जो आहे तो जाती आणि वर्ग बदलाचा आहे. ज्यावर बाबासाहेबांनी आयुष्यभर लढे उभारले होते. हे लढे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, सामाजिक न्याय, जातिअंत वगैरेतून तयार होणारा एक नवा माणूस आणि नवा समाज होता. आपण स्वतंत्र देश बनून, स्वतंत्र राज्यघटना तयार करून सात दशकांहून अधिक कालखंड लोटला. ही जी महामानवाने पाहिलेली स्वप्ने आणि त्यांचा समाज अस्तित्वात आला का, म्हणजेच नवा भारत, नवा समाज, नवा माणूस अस्तित्वात आला का, या प्रश्नाचा विचार निदान प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने तरी आवश्यक ठरतो. १९४७ ला आपण एका नव्या पर्वात प्रवेश करतो आहोत, युगांतर सुरू होते आहे, नवरचनेचा पाया घातला जातो आहे, असं नेहरूंनी लाल किल्ल्यावरून केलेल्या रोमांचकारी भाषणातून सांगितलं होतं. पण हेही खरं आहे, की १६ ऑगस्ट १९४७ ला डाव्यांनी मुंबईत एक मोर्चा काढून 'ये आजादी झुटी है, देश की जनता भुकी है' अशी घोषणा दिली होती. त्या वेळच्या मोर्चात स्वत: अण्णा भाऊही होते. कारण ते तेव्हा आणि नंतरही कम्युनिस्ट होते. प्रश्न असा आहे, की स्वातंत्र्यानंतर अपेक्षित असणारा समाज तयार झाला आहे का आणि बाबासाहेबांच्या स्वप्नातील समाज आकाराला आला आहे का आणि अण्णा भाऊंनी त्यांच्या गाण्यात ज्या परिस्थितीचे वर्णन केले होते ती परिस्थिती बदलली आहे काय? नसेल बदलली तर मग स्वातंत्र्याचं आणि प्रजासत्ताकाचं झालं काय आणि सामान्यांच्या वाट्याला आलं काय, असा प्रश्न तयार होईल. तो तयार होतो आहे म्हणून हा लेखनप्रपंच.

स्वातंत्र्यानंतर सर्व प्रकारची समता तयार व्हावी, हा बाबासाहेबांचा पराकोटीचा आग्रह होता. त्यासाठी

त्यांचा संघर्ष होता. म. गांधींना स्वातंत्र्याचे रुपांतर तातडीने स्वराज्यात व्हावे आणि काँग्रेसने स्वतःचे रुपांतर राजकारणाऐवजी सेवाभावी संघटनेत करावे, असे वाटत होते. म्हणून स्वातंत्र्याच्या झगमगाटात राहण्याऐवजी ते धार्मिक दंगली शांत करण्यासाठी झोपडीतल्या अंधारात जाऊन बसले. म. फुल्यांना लोकमय राष्ट्र हवे होते, जे केवळ बंधुतेवर उभे राहणार होते. नेहरूंना समाजवाद हवा होता आणि लोकांना सुखा-समाधानाचे, स्वाभिमानाचे, सुरक्षित आणि समतेनं भरलेले जीवन हवे होते. प्रजासत्ताकाची एकाहत्तरी साजरी करताना आपण या स्वप्नावर नजर टाकल्यास काय दिसते?

आपल्याकडे लोकशाही आली. ती चांगली ७५ वर्षे टिकली. ही आनंदाची गोष्ट आहे. पण सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि धर्मनिरपेक्षतेचं गाणं गाणाऱ्या लोकशाहीचं काय झालं? सामाजिक लोकशाही लवकरात लवकर येणार नसेल, जातींचा समाज लवकरात लवकर संपून समताधिष्ठित समाज लवकरात लवकर येणार नसेल तर केवळ राजकीय लोकशाहीला काही अर्थ असणार नाही. माणसाच्या सन्मानासाठी, राष्ट्राच्या सन्मानासाठी सामाजिक लोकशाहीची नितांत आवश्यकता असते, हे शेवटपर्यंत बाबासाहेब सांगत राहिले. प्रत्यक्षात सामाजिक लोकशाहीचे स्वप्न अवतरताना दिसते आहे काय, याचे उत्तर कसे मिळेल? वेगवेगळ्या कारणांनी जाती टोकदार केल्या जात आहेत. राजकारणात त्यांना अढळ स्थान दिले जात आहे. जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत त्यांना मिरवले जात आहे. संघर्षासाठी त्यांना खाद्य पुरवले जात आहे. जात पंचायतींपासून ते विशिष्ट जातींच्या माणसाला मॉब लिंचिंग करण्यापर्यंतच्या अनेक घटना आपण पाहत आहोत. आपण राजकीय लोकशाही टिकवून ठेवली. आपल्याबरोबर स्वतंत्र झालेल्या अन्य राष्ट्रांत तसे होऊ शकले नाही. आपल्याकडे सातत्यानं निवडणुका होतात. अगदी कोरोना आणि दुष्काळाच्या काळातही होतात, ही खूप मोठी महत्त्वाची गोष्ट मानावी लागेल. त्याचबरोबर निवडणुकांना कोणते स्वरूप आले आहे आणि ते कमी कसे करायचे, हा प्रश्नही वादाचा बनतो आहे. निवडणुकांत विजयी होण्यासाठी कोटीच्या कोटी उड्डाणे घ्यावी लागतात. धर्माचा, श्रद्धांचा दांडा असलेल्या जातीच्या शिड्यावरून प्रवास करावा लगातो. धनदांडगे आणि शरीरदांडगे व्हावे लागते. एवढे करूनही राजकारणाची परंपरा लगाते. विशिष्ट कुटुंबे ७५ वर्षे राजकारणात गच्च मांडी घालून बसली आहे. दहा-बारावेळा निवडून येण्याच्या त्यांच्या विक्रमाचा लोक उत्सव करतात. पती-पत्नी, भाऊ-भाऊ, बहीण-भाऊ, वडील-मुलगा मुलगी, सासरा-सून अशा नात्यांच्या जोड्या आणि सोबतीला भगवेशाही असे चित्र गडद होऊ लागले आहे. सारे काही लोकांचे आहे असे सांगणाऱ्या लोकशाहीला ते पूरक आहे का, याचाही विचार करावा लागतो. सत्ता, संपत्ती, जात, धर्म, श्रद्धा, भांडवल, प्रांतवाद, भाषावाद, भेदाभेद या सर्वांचे मिळून राजकारण बनत आहे. एक मोठे विलक्षण रसायन तयार होते आहे. बहुमत हा लोकशाहीतील सत्ताखेळाचा आधार मानला तर पाशवी बहुमताचे म्हणजे विरोधक संपवणारे किंवा त्यांना कुपोषित करणारे बहुमत लोकशाहीला कोणता चेहरा प्राप्त करून देईल, हे कोणी लोकांना सांगत नाही. लोकशाही आणि संविधानसाक्षरतेचा प्रचार-प्रसार करण्याचे साधन कोणी तयार करत नाही. त्यातूनच राज्यघटनेला हात लावल्यास खबरदार किंवा आम्ही अमूक रंगातील घटना लिहू, असे टोकाचे दोन प्रवाह तयार होत आहेत. लोकशाहीला म्हणजे आपल्या लोकशाहीला सत्तरीत जाऊनही सत्तेचे विकेंद्रीकरण म्हणावे तसे होत नाही. विशिष्ट घटकांच्या हातातच सत्ता अडकून पडलीय. जुने राजे-नवे राजे आणि काही कुटुंबे एवढ्या परिघातच लोकशाहीला अंगण उपलब्ध होते की काय, असे वाटू लागले आहे. लोकशाही माणसाला सर्वात मोठी सुरक्षितता आणि प्रतिष्ठा देत असते. हे खरे मानले, तर इतना सन्नाटा क्यौ हे भाई, इतनी अंधेरी रात पहले कभी ना थी किंवा जंगलातले पक्षी भयग्रस्त काळीज घेऊन दाहीदिशांना का धाऊ लागले आहेत, हे मुद्देही पुढं येत आहेतच. एक अनामिक आणि नामिक असुरक्षितता कोठून पाझरते आहे?

सत्तर वर्षात एक नवा मध्यमवर्ग भांडवलशाहीने तयार केला. स्वातंत्र्याच्या पूर्वी आणि नंतरही राष्ट्रीयीकरणाची चर्चा खूप झाली आहे. प्रत्यक्षात देशाची जेवढी संपत्ती आहे तेवढी एका अंबानीची कशी झाली, ही जणू काही दंतकथाच बनली. दारिद्र्यरेषा वर येण्याऐवजी कोणाच्या ओझ्यानं खाली चालली यासाठी कधी कोणती समिति जन्माला आल्याचे ऐकिवात नाही. कोरोनाकाळात इंजेक्शन, प्राणवायू, बेड, स्मशान, रुग्णवाहिका मिळाली नाही असे सांगणारे कोट्यवधी भेटतील. हे सारे कोणत्या सामाजिक आणि आर्थिक समतेचे लक्षण म्हणावे लागेल. हे जे सगळं चित्र तयार झालं आहे तेच बाबासाहेबांना नको होतं. वारंवार त्यांनी समाज, सरकार आणि राजकारण्यांना सावध केलं होतं. असा बदल घडवायचा, असा घाव घालायचा की आजचे चित्र जे विषमतेचा कळस गाठेल ते तयारच होणार नाही. अण्णा भाऊंनी हाच विचार गाण्यात मांडला. हे गाणे केवळ प्रजासत्ताक दिनीच नव्हे तर रोज गावे असे आहे. ●●●

# उमेदवारांची जिंकण्याची क्षमताच ठरवणार गोव्याचे राजकीय भवितव्य

*गोव्यात यावेळचा कौल हा पक्ष म्हणून कमी आणि व्यक्ती म्हणून दिलेला अधिक असेल. उमेदवार कोण आहे यालाच मतदारांच्या मनात प्राधान्य राहील. ज्यांच्याकडे जिंकून येण्याची क्षमता आहे, ते मते खेचतील आणि ज्यांच्याकडे असे जिंकण्याची क्षमता असलेले उमेदवार अधिक असतील, त्या पक्षाला यश मिळेल. नाही तरी काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे नेते पी. चिदंबरम यांनी म्हटलेच होते, की विनेबिलिटी पाहून उमेदवार निवडले जातील. ही काँग्रेसलाच नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांना परिस्थितीने, रंग बदलणाऱ्या सरड्याप्रमाणे पक्ष बदलणाऱ्या राजकारण्यांनी केलेली सक्ती आहे.*

**सुरेश स. नाईक**



विधानसभा निवडणूक होत असलेल्या पाच राज्यांमध्ये गोव्याचा समावेश आहे. व्हॅलेंटाईन डे ला, १४ फेब्रुवारीला पुढच्या पाच वर्षांच्या पदावधीसाठी गोव्यातील जनतेला आपले व्हॅलेंटाईन निवडायचे आहते. गोव्याच्या मुक्तीला मागील डिसेंबरमध्ये साठ वर्षे पूर्ण झाली. त्याचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अशा वैशिट्यपूर्ण वातावरणात ही निवडणूक होते आहे, तीदेखील आपली काही वैशिष्ट्ये मागे ठेवणारी ठरेल.

**मगोपची यशस्वी वाटचाल**

१९६१ मध्ये गोवा पारतंत्र्यातून मुक्त झाल्यानंतर १९६३ मध्ये राज्य विधानसभेची पहिली निवडणूक झाली. मुक्तीनंतरच्या साठ वर्षांमध्ये निरनिराळ्या राजकीय पक्षांनी सत्ता राबवली. त्यातून एक आकृतिबंध कोरता येईल, असे या राजवटीचे वैशिष्ट्य राहिले आहे. गोव्याच्या पहिल्या निवडणुकीत महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष या स्थानिक पक्षाने बहुमत मिळविले आणि त्याचा तुल्यबळ विरोधी पक्ष होता, तोही युनायटेड गोवन्स हा स्थानिक पक्षच. या पहिल्या निवडणुकीत सत्ता हस्तगत करण्याचे काँग्रेसचे स्वप्न पार धुळीस मिळाले. काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. येथून सुरू झालेली मगोपची यशस्वी वाटचाल १९८० पर्यंत चालली. १९६७ मध्ये गोव्याचे महाराष्ट्रात विलिनीकरण करावे की स्वतंत्र राज्य असावे, या मुद्यावरून घेतलेला जनमत कौल विलिनीकरणवादी मगोप हरला; तरी लगेच झालेल्या निवडणुकीत जनतेने सत्ता मात्र मगोपकडेच सोपविली. सतरा वर्षांची मगोपची राजवट झाली.

१९८० मध्ये काँग्रेसने सत्तासिंहासनावर ताबा मिळविला. गंमत म्हणजे, देशात काँग्रेसचे (इंदिरा गांधी) वारे पुन्हा वाहू लागलेले असताना गोव्याने मात्र काँग्रेस अर्सला आपला कौल दिला. एका रात्रीत या पक्षाने इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसमध्ये विलय करून काँग्रेसचे सरकार घडविले. काँग्रेसचे सुरू झालेले सत्तापर्व १९९९ अखेरपर्यंत टिकले. त्यातही १९९० च्या दशकात गोव्याने प्रचंड अस्थैर्य अनुभवले. पक्षांतरे, फाटाफूट या प्रकारांनी कळस गाठला. दहा वर्षांच्या या काळात १३ मुख्यमंत्री बदलले आणि राजकीय अस्थैर्य, पक्षांतरबंदी कायद्याचा इतका विचका केला गेला, की त्यापायी गोव्याची देशभरात बदनामी झाली.

**भाजपचे खतपाणी**

विधानसभेच्या १९९९ च्या निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्षही पक्षांतरे, फाटाफूट या राजकारणात सहभागी झाला. खुद्द भाजपमध्ये फाटाफूट झाली नाही; परंतु इतर पक्षांतील बेदिलीला धूर्तपणाने खतपाणी घातले, त्याचा फायदाही घेतला. अशाच फाटाफुटीतून संख्याबळाची जोड करून २००० मध्ये दिवंगत संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर पहिल्यांदा गोव्याचे मुख्यमंत्री बनले. त्यांचे सरकार वर्ष-सव्वावर्ष टिकले. फुटीर आमदारांच्या बळावर बनवलेले हे सरकारही पाडण्याचा प्रयत्न सुरू झाल्याचे दिसताच पर्रीकर यांनी विधानसभा बरखास्तीचा डाव टाकला. २००२ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर पर्रीकर पुन्हा मुख्यमंत्री झाले; परंतु त्यांचा कार्यकाल पूर्ण व्हायच्या आधीच, अडीच वर्षांनी सत्तांतर झाले आणि काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. पुढच्या निवडणुकीनंतर काँग्रेसने सरकार घडविले ते पाच वर्षे टिकवून ठेवले. पुन्हा २०१२ मध्ये भाजप पूर्ण बहुमताने विजयी झाला आणि पर्रीकर पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यांना केंद्रात संरक्षणमंत्री करण्यात आल्याने त्यांना पाच वर्षांचा पदावधी पूर्ण करता आला नाही. भाजप सरकारने आपला कार्यकाळ मात्र पूर्ण केला. त्या निवडणुकीपासून आतापर्यंत भाजप हाच सत्तारूढ राहिला.

**ही निवडणूक असेल वैशिष्ट्यपूर्ण**

या दोन दशकांच्या काळात काँग्रेसची सात वर्षे वगळली तर सत्ताकारण भाजपच्याच हाती राहिले. गोवा मुक्तीनंतरच्या साठ वर्षांतील राजकारणाचा ढोबळ आढावा घेतला, तर साधारण प्रत्येकी वीस वर्षांच्या कालखंडात मगोप, काँग्रेस आणि भाजपने सत्ता राबविल्याचे दिसते. त्या कालखंडात एकेका पक्षाचे वर्चस्व राहिल्याचे दिसते. हा कल चालू राहिला तर आता नवे सत्तापर्व आरंभ होण्याचा काळ आला आहे, असे अनुमान काढता येते. अर्थात, राजकारण काही एका तर्काने चालते असे म्हणता येत नाही. गोव्याच्या बाबतीत तर देशभरात जसा कौल असतो त्याच्या नेमका विरोधात गोव्याचा कौल असतो, असा आजवरचा अनुभव आहे. विशींनंतर बदलाचा कल पुढे चालू राहील किंवा अजून काही वेगळा बदल घडेल या दृष्टीने ही निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण असेल, एवढे मात्र खरे.

भारतीय जनता पक्ष, काँग्रेस आणि एकेकाळचा सत्ताधारी, प्रबळ; परंतु आता हडकलेला महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष या प्रमुख राजकीय पक्षांसह राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पार्टी, गोवा फॉरवर्ड, तृणमूल काँग्रेस, रिव्होल्युशनरी गोवन्स असे पक्ष या वेळी ४० सदस्यीय विधानसभेच्या निवडणूक रिंगणात असतील.



यापैकी भाजप सत्ताधारी असून निवडणुकीत पूर्ण बहुमत मिळविण्याची आकांक्षा तो बाळगून आहे. मजबूत पक्ष संघटना, कार्यकर्त्यांचे बुथनिहाय सक्रीय जाळे ही भाजपची बलस्थाने आहेत. सतत जागृत व सक्रीय राहणे हाही भाजपचा विशेष आहे. गोव्यात गेले वर्षभर किंवा अधिकच काळ संघटनेच्या पातळीवर जागृतीचे व बळकटीकरणाचे भाजपचे कार्य सतत सुरू आहे. केंद्रीय नेत्यांचा त्यात सहभाग हा स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांचे मनोबल व आत्मविश्वास उंचावणारा आहे. राज्याच्या प्रगतीसाठी केंद्रात व राज्यात एकाच पक्षाचे सरकार असण्याची आवश्यकता व त्याचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न भाजपकडून जोरात सुरू आहे. 'दहा वर्षे विकासाची, पाच वर्षे प्रगतीची' हे घोषवाक्य राज्याच्या कानाकोपऱ्यात झळकावले असून बहुमत जिंकण्याच्या इर्षेने, विश्वासाने भाजप कार्यरत झालेला आहे.

**सगळीच वस्तुस्थिती भाजपला पूरक नाही**

अलीकडे करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात भाजपला अनुकूल कौल देण्यात आलेला आहे. सकारात्मक हवा मोठी आहे, तशी सगळीच वस्तुस्थिती तिला पूरक आहे, असे मात्र नाही. २०१२ च्या निवडणुकीत ४० पैकी २१ जागा जिंकणारा भाजप २०१७ च्या निवडणुकीत त्या यशाची पुनरावृत्ती करू शकला नव्हता. त्याला केवळ १३ जागा मिळाल्या. पुढे मनोहर पर्रीकर व दुसरे एक मंत्री फ्रान्सिस्को डिसोझा यांचे निधन झाल्याने घेण्यात आलेल्या पोटनिवडणुकीत भाजपने पणजीची जागा गमावली. मूळ भाजपच्या आमदारांची संख्या त्यामुळे बारावर आली. त्यातही निवडणुकीपूर्वी काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या दोन नेत्यांचा समावेश होता. पणजीच्या पोटनिवडणुकीत विजयी झालेले बाबूश मोन्सेरात हे अन्य नऊ काँग्रेस आमदारांसह पुढे भाजपमध्ये दाखल झाले. मगोपच्या तीनपैकी दोन आमदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला. काँग्रेसच्या तीन आमदारांनी पक्ष सोडून भाजप उमेदवारीवर पोटनिवडणूक लढवून जिंकली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या नेतृत्वाखाली स्थिरावलेल्या सरकारातील भाजपमध्ये काँग्रेसचे तेरा, मगोपचे दोन व खुद्द भाजपचे बारा (पैकी दोन पूर्वाश्रमीचे काँग्रेसी) असे २७ जणांचे बळ झाले. हे सर्वजणच भाजप उमेदवारीवर निवडणूक लढवितील

याची शक्यता नाही. काँग्रेसमधून भाजपमध्ये गेलेल्या एकूण तेरा आमदारांपैकी सात जण ख्रिस्ती समाजातील आहेत. त्यातील एखाददुसरा आमदार वगळता इतरांना भाजप चिन्हावर निवडणूक जिंकणे शक्य नाही.

**भाजपविषयी ख्रिस्ती समाजात नाराजी**

भाजपने या आधी पर्रीकर असताना 'मिशन सालसेत' यासारखा कार्यक्रम राबवून ख्रिस्ती समाजाला भाजपकडे खेचण्याचा प्रयत्न केला होता. त्यात त्यांना पुरेसे यश आले नव्हते. या समाजात भाजपला आजही फारशी स्वीकारार्हता लाभलेली नाही. त्यामुळे भाजपमध्ये आलेल्या ख्रिस्ती आमदारांना अपक्ष लढवून, त्यांना बाहेरून समर्थन देऊन जिंकून आणण्याची व्यूहरचना भाजपमध्ये सुरू झालेली आहे. तरीही भाजपविषयी ख्रिस्ती समाजात असलेला दुरावा मिटेल याविषयी शंका आहे. मूळचे भाजपचे असलेले दोन ख्रिस्ती आमदार कार्लस आल्मेदा व मंत्री मायकल लोबो यांनी भाजपला रामराम केलेला आहे. त्यांनी पक्ष सोडण्याची कारणे वेगवेगळी असली तरी त्यातून ख्रिस्ती समाजाला जाणारा संदेश भाजपानुकूल नक्कीच नसेल. यापैकी आल्मेदा काँग्रेसमध्ये सामील झाले आहेत.



लोबो हे प्रभावशाली नेते आहेत. जवळच्या चारेक मतदारसंघांवर त्यांचा प्रभाव आहे. त्यांच्या पत्नीला भाजपची उमेदवारी मिळावी यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. त्यात यश न आल्याने त्यांनी पक्षत्याग केला आहे; परंतु पक्षत्यागामागे एवढे एकच कारण नसावे. या महत्त्वाकांक्षी नेत्याने सात मतदारसंघ असलेल्या बार्देश तालुक्यात आपला प्रभाव उभा करण्याच्या दृष्टीने गेली दोनेक वर्षे प्रयत्न चालविला होता. त्यात त्यांना काही अंशी यशही मिळाले आहे. त्यांच्या भविष्यकालीन राजकीय महत्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी काही व्यूहरचना त्यांनी केली होती. त्याला अनुसरूनच त्यांनी भाजप सोडण्याचे पाऊल उचलले आहे. त्यांच्या जाण्याने काही फरक पडणार नाही, असे भाजपच्या प्रदेशाध्यक्षांचे म्हणणे आहे. त्यातली सत्यता नजीकच्या भविष्यात उघड होईल. भाजपमधून होणारी ही वजाबाकी आपला परिणाम दाखवीलच. त्याचबरोबर भाजपचे बेरजेचे राजकारणही भाजपला बाधा पोहाचवू शकेल.

**भाजप कार्यकर्त्यांत अस्वस्थता**

सरकार स्थापण्यासाठी भाजपने मगोप, गोवा फॉरवर्ड (प्रत्येकी तीन आमदार), तीन अपक्ष आमदार यांच्याशी मोट बांधली. तीनपैकी पर्वरी मतदारसंघाचे रोहन खवटे व प्रियोळचे

## भाजपकडून असंतुष्टांची मनधरणी

*गोव्यातील राजकारणी, आमदार हे पक्षांतरासाठी जेवढे जाणले जातात तेवढे कुठल्याच चांगल्या गोष्टीसाठी ओळखले जात नसतील. आता उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झालेली असतानादेखील पक्ष बदलणे थांबलेले नाही. सकाळी एका पक्षात असलेला राजकारणी संध्याकाळपर्यंत कुठल्या गोटात दाखल होईल याची खुद्द त्यालादेखील माहिती असणार नाही, इतक्या सैलपणाने, निलाजरेपणाने पक्षबदलाचा खेळ सध्या सुरू आहे. तृणमूल काँग्रेसबाबत तर धक्क्यावर धक्केच दिले जात आहेत. काँग्रेसचे मातब्बर नेते आलेक्स रेजिनाल्ड महिनाभरात तृणमूलमधून बाहेर पडले असून दरम्यान काँग्रेसने दुसऱ्याच उमेदवाराला तिकिट दिल्याने त्यांची स्थिती ना घर का ना घाटका अशी झालेली आहे. मगोपचे एकेकाळचे नेते असलेले माजी आमदार मामलेदार याआधी तृणमूलची साथ सोडून काँग्रेसमध्ये दाखल झाले आहेत. ॲड. यतीश नाईक यांसारखा स्वच्छ चारित्र्याचा नेताही तृणमूलच्या धरसोड धोरणामुळे निवडणूक न लढविण्याच्या निर्णयाला आला आहे. भाजपचे नेते, पूर्व संरक्षणमंत्री स्व. मनोहर पर्रीकर यांचा मुलगा उत्पल यांना उमेदवारी देण्याबाबत भाजपने चालढकल चालविल्याने तो देशस्तरावर चर्चेचा मुद्दा बनला होता. त्यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. पक्षनिष्ठा, इमानदारी, चारित्र्य या मूल्यांच्या राजकारणातील स्थानाची आठवण करून देण्यासाठी आपला लढा असल्याचे सांगून त्यांनी राजकीय चर्चेची दिशा आपल्याकडे वळवून घेतली आहे. त्यांच्याप्रमाणे पूर्व मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांनीही यावेळी अपक्ष निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. पार्सेकर हे राज्यात भाजपची उभारणी करणाऱ्या मूळच्या संस्थापकांपैकी एक आहेत. आयात उमेदवारांना संधी दिली गेल्याने पाच ते सहा मतदारसंघांत भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष पसरलेला आहे. ४० पैकी ३४ उमेदवारांची घोषणा केल्यानंतर भाजपचे नेते आता या असंतोषावर उपाय करू लागले आहेत. तरी नव्या नेत्याची आयातही त्याने थांबवलेली नाही. भाजपविषयी वातावरण गढूळले गेले आहे. मात्र विरोधी मतांत तीन चार दिशांनी होणारे विभाजन भाजपच्या पथ्थ्यावर पडेल असेही वातावरण आहे.*

गोविंद गावडे हे भाजपमध्ये प्रवेशते झाले आहेत. गोवा फॉरवर्डचे जयेश साळगावकर (साळगाव मतदारसंघ) यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला आहे. खवटे यांनी मंत्रिमंडळातून वगळले गेल्यानंतर भाजपवर विशेषतः मुख्यमंत्र्यांवर जहरी टीका केली होती. त्यांच्या मतदारसंघात त्यांचे व भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये तेढीचे व नावडीचे नाते होते. त्यांना भाजपमध्ये सामील केल्याने भाजपचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. साळगावकरांच्या प्रवेशाने साळगावमधील कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे. नाराजी असंतोषात परिवर्तित झालेली आहे. भाजपचे कार्यकर्ते सहसा पक्षाविरोधात, पक्षशिस्तीच्या बाहेर जात नाहीत, असा अनुभव आहे. नाराजी व्यक्त केली तरी बांधिलकी सोडत नाहीत. यावेळी कार्यकर्त्यांमधील असंतोष अधिक गंभीर स्वरूपाचा असून बंडखोरीकडे त्यांचा कल दिसून येत आहे. साळगावमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांनी पक्षत्याग करून काँग्रेसला जवळ केले आहे आणि लोबो हे त्यांना मदत करीत आहेत, असे भाजप संघटनेच्या शिस्तीच्या विरोधात जाणारे दृश्य आता पाहायला मिळत आहे. पर्वरीतील भाजप कार्यकर्त्यांनी बंडखोरीचा पवित्रा घेतलेला आहे. त्याचा प्रकट स्फोट अजून झालेला नाही. पर्रीकर यांच्या पणजी मतदारसंघातून निवडणूक लढवायला त्यांचे पुत्र उत्पल पर्रीकर पुढे सरसावले आहेत. त्यांची उमेदवारी अजून निश्चित झाली नसली तरी त्यांना उमेदवारी देण्या न देण्यावरून सुरू असलेल्या चर्चेच्या परिणामस्वरूप पणजीतील भाजप कार्यकर्त्यांतही अस्वस्थता आहे. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री रवी नाईक भाजपमध्ये दाखल झाल्याने फोंड्यातील आणि अपक्ष गोविंद गावडे भाजपमध्ये येणार असल्याने प्रियेळ मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल आणि अस्वस्थता आहे. पेडणे व मांद्रे मतदारसंघात अनुक्रमे बाबू आजगावकर (पूर्वीचे मगापे) दयानंद सोपटे (पूर्वीचे काँग्रेस) यांना उमेदावारी देण्याबाबतही अडचणीची स्थिती निर्माण झाली असून मांद्र्यात भाजपचे माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर व त्यांचे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. भाजपच्या संघटनेत अशी अस्वस्थता या आधी कधी दिसली नव्हती. आपल्या तळागाळातील कार्यकर्त्यांना संतुष्ट ठेऊन भाजप पक्ष संघटनेतील एकात्मता कशी टिकवून ठेवतो आणि निवडणुकीला एकसंधपणे कसा सामोरा जातो आणि संघटना म्हणून कसा प्रभाव राखतो याची जिज्ञासा निर्माण झालेली आहे.

**सक्षम उमेदवारांची उणीव**

गेल्या निवडणुकीत १७ व पोटनिवडणुकीत एक असे अठरा आमदार असूनही सरकार घडविण्यात अपयशी ठरलेल्या काँग्रेसची अवस्था निवडणुकीच्या तोंडावर अतिशय केविलवाणी झालेली आहे. राहिलेल्या पाच आमदारांमध्ये चार माजी मुख्यमंत्री काँग्रेसपाशी होते. त्यातील एक रवी नाईक भाजपात गेले, दुसरे लुईझिन फालेरो तृणमूल काँग्रेसमध्ये गेले आणि राज्यसभा सदस्यही बनले. तिसरे प्रतापसिंह राणे निवडणूक लढवितील की नाही, याविषयी साशंकता निर्माण झाली असून नुकतेच मुख्यमंत्र्यांनी त्यांना आजन्म कॅबिनेट दर्जा देण्याचे जाहीर केले आहे. दुसरीकडे, त्यांचेच पुत्र आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी त्यांनी निवडणूक लढवू नये असा इशारा देतानाच, ते निवडणुकीत उतरले तर आपण स्वतः त्यांच्याविरुद्ध निवडणूक लढवू, अशी धमकी दिली आहे. चौथे




## *आप नवीन खेळाडूंसह रिंगणात*

***आपचे निमंत्रक एल्विस गोम्स आता काँग्रेसमध्ये आहेत. त्यामुळे पक्ष नवीन खेळाडू घेऊन निवडणूक लढवत आहे. आपचे संघटनास्वरूपात बळ उभे राहिलेले दिसत नाही. गेली पाच वर्षे तरी आप गोव्याच्या राजकीय वातावरणात सक्रीय आहे.***

दिगंबर कामत हे सध्या काँग्रेसचा रथ इंच-इंच पुढे ओढत नेत आहेत. त्यांचे आमदार आलेक्स रेजिनाल्ड यांनीही तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. सध्या काँग्रेसला नेत्यांची चणचण आहे. पक्ष संघटना असलेला भाजपनंतर काँग्रेस हा दुसरा नाव घेण्याजोगा पक्ष आहे; परंतु काँग्रेसची संघटना भाजपइतकी शिस्तबद्ध आणि बळकट नाही. काँग्रेस पक्ष म्हणून प्रभाव वाहणारे लोकमानस लक्षणीय आहे. विशेषतः सालसेत हा आठ मतदारसंघांचा तालुका हा मुख्य आधार आहे. याच तालुक्यातून निवडून आलेले बहुतेक ख्रिस्ती आमदार भाजपमध्ये गेल्याने आणि जे दहाजण एकत्रितपणे भाजपवासी झाले त्यात बहुतेक हे ख्रिस्ती आमदारही असल्याने आणि त्यांना काही झाले तरी पुन्हा पक्षात घेतले जाणार नसल्याची प्रतिज्ञा नेत्यांनी राहुल गांधींच्या सहमतीने केल्याने, निवडणूक लढविण्यासाठी सक्षम उमेदवारांची उणीव काँग्रेसला भासते आहे. त्यातही भाजपचे कार्लुस आल्मेदासारखे काही नेते आल्याने काँग्रेसला थोडी उभारी मिळाल्यासारखे वाटते. निवडणुकीत उतरावयाला दमदार उमेदवार दाखवायला कुणी नाही, अशी स्थिती काँग्रेसची झाली आहे.

**आपचे संघटनात्मक बळ नाही**

मागील निवडणुकीनंतर गोवा फॉरवर्डने मुख्यमंत्रिपदाचा प्रस्ताव देऊनही काँग्रेसबरोबर राहणे मंजूर केले नाही. भाजपने हाकलल्यानंतर, हातची सत्ता गेल्यामुळे तो पुन्हा गोवा फॉरवर्ड काँग्रेसबरोबर आला आहे. त्यातही आपल्या अटीवर त्याने राहुल गांधींच्या आशीर्वादाने युती केली. दोन जागा आपल्यासाठी घेतल्या असून अजून तीन जागांवर डोळा ठेऊन आहे. काँग्रेसला हे स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही अशी सध्याची स्थिती आहे. ती काँग्रेसची दुर्बलताही दाखवणारी आहे. गोवा फॉरवर्डच्याही तीनपैकी एक आमदार सध्या त्यांच्यापाशी आहे. त्यांचाही नव्या सक्षम उमेदवारांसाठी शोध-व्यवहार सुरू आहे. आपने मागच्या वेळी ३९ जागा लढविल्या. त्या सर्व तर हरल्याच, शिवाय ३८ जणांच्या अनामती जप्त झाल्या. आपचे निमंत्रक एल्विस गोम्स आता काँग्रेसमध्ये आहेत. आपने नवे खेळाडू घेऊन निवडणूक




## मगोपच्या साथीने तृणमूलची उडी

*राजकीय पक्षाच्या सक्रियतेत तृणमूल काँग्रेसने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. भाजपचा तृणमूल काँग्रेसला असलेला विरोध जगजाहीर आहे. त्यांनी तृणमूलची चालवलेली निर्भर्त्सना खरे तर तृणमूलचे इथले अवतरणे गाजायला साह्यभूत होत आहे. या पक्षाचीही संघटना अशी उभी राहिलेली नाही. उसनवारी केलेल्या नेत्यांची मांदियाळी लक्षवेधी ठरली आहे. २०१७ च्या निवडणुकीत काँग्रेसला बहुमताच्या दाराशी आणण्यात यशस्वी झालेले लुझिन फालेरो यांनी तृणमूलमध्ये प्रवेश करून गोव्यातील जनतेला पहिला आश्चर्याचा धक्का दिला. त्यांच्यापाठोपाठ चर्चिल आलेमावही राष्ट्रवादी सोडून तृणमूलमध्ये दाखल झाले आहेत. या दोघांचे राजकीय वैमनस्य तसे जगजाहीर. त्यांचे एका राजकीय पक्षासोबत येणे आश्चर्याचे आहे, तसेच त्यांच्या भागातील राजकीय वाऱ्याची दिशा कशी राहील याचेही संकेत देणारे आहे. चर्चिल आलेमाव यांचे, कन्या वालंका हिला आमदार, खासदार बनवायचे स्वप्न आहे. फालेरोंशी झालेलं सख्य हे त्या दृष्टीने आलेमाव यांना लाभदायी ठरेल, तसे तृणमूललाही फायद्याचे ठरेल. तृणमूलने गोव्यात प्रवेश करतानाच मगोपशी युती करून मोठीच उडी घेतली आहे. मगोपला स्वतःच्या जिवावर निवडणुका जिंकणे अवघडच झाले आहे. भाजप मोठा होण्यात मगोपचा जीव गेला, तरी अनेक ठिकाणी धुगधुगी आहे. निवडणूक जवळ आली असताना आर्थिक साह्यासाठी मगोप नेत्यांनी व्यापारी, व्यावसायिकांना आवाहन केले होते. तृणमूलशी युती केल्याने त्याची ती अडचण दूर झाली, असे समजायला हरकत नाही. त्यातून धुगधुगी असलेल्या काही ठिकाणी पक्षाला नवे धुमारे फुटू शकतात. तसे भाजपला जशी मदत झाली अगदी तशी आणि तेवढी नसली तरी तृणमूलला गोव्यात पाय रोवायला मजबूत अवकाश मिळणे मगोपमुळे शक्य होणार आहे.*

लढण्याची जय्यत तयारी चालवली आहे. आपचे संघटना स्वरूपात बळ उभे राहिलेले दिसत नाही. गेली पाच वर्षे तरी आप गोव्याच्या राजकीय वातावरणात सक्रीय आहे. रूढ अर्थाने काही संघटना कार्यरत आहेत, असे मात्र दिसत नाही. कार्यकर्ते आहेत. त्यांची भाजपसारखी शिस्तशीर बांधणी झालेली नाही. अनेक सामाजिक समस्या, भ्रष्टाचाराचे विषय घेऊन आप आंदोलने, जनजागृती करीत आला आहे. त्यानिमित्ताने मतदारांच्या नजरेत राहण्याचा अखंड प्रयत्न चाललेला आहे. काँग्रेसच्या चळवळी नेत्या प्रतिमा कुतिन्हो, भाजपच्या माजी मंत्री अलिना साल्ढाणा, भाजपचे रामराव वाघ तर अमित पालेकर हे प्रसिध्द वकील असे उदयोन्मुख नेते आपकडे आहेत. दिल्लीत अरविंद केजरीवाल यांनी यशस्वी केलेली विकासाची धोरणे, कामे, कल्याणकारी योजना गोव्यात पुनरावृत्त करण्याच्या आश्वासनाचे मोठे आकर्षण पुढे करून मतदारांचे चित्त वेधण्यावर या पक्षाचा सध्या भर आहे.

**निवडून येण्याची क्षमता हीच पात्रता**

या सर्वच पक्षांचे एकूण चलनवलन पाहिले तर एक लक्षात येते, की यावेळी पक्ष म्हणून कुणालाही यशाला गवसणी घालणे कठीण आहे. पक्षसंघटना मजबूत असलेल्या भाजपलाही स्वपक्षीय नेत्यांची उणीव आहे. कार्यकर्त्यांचा सन्मान करणारा पक्ष म्हणून शेखी मिरविणाऱ्या या पक्षाने सध्या बाहेरून नेत्यांची आयात सुरू केलेली आहे. हे सगळेच आयात नेतेही भाजपचे म्हणून निवडणूक रिंगणात उतरू शकत नाहीत. पक्षाशी बांधिलकी म्हणून निमूटपणे समोर केल्या जाणाऱ्या नेत्याला स्वीकारण्याची भाजप कार्यकर्त्यांची मानसिकता राहिलेली नाही. त्यांच्या मनातील अस्वीकाराला शब्द व कृतीचे पाय फुटू लागले आहेत. आप व तृणमूलसारख्या पक्षाकडे रुढार्थाने पक्षसंघटनाच नाही. तृणमूल तर आधी शेंडा मग बुडखा अशा तऱ्हेने उभा राहू पाहतोय. उसनवारीच्या नेत्यांवरच त्याची मदार आहे. स्वाभाविकपणे असे दिसते, की यावेळचा कौल हा पक्ष म्हणून कमी आणि व्यक्ती म्हणून दिलेला अधिक असेल. उमेदवार कोण आहे यालाच मतदारांच्या मनात प्राधान्य राहील. ज्यांच्याकडे जिंकून येण्याची क्षमता आहे, ते मते खेचतील आणि ज्यांच्याकडे असे जिंकण्याची क्षमता असलेले उमेदवार अधिक असतील, त्या पक्षाला यश मिळेल. नाही तरी काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे नेते पी. चिदंबरम यांनी म्हटलेच होते, की विनेबिलिटी पाहून उमेदवार निवडले जातील. ही काँग्रेसलाच नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांना परिस्थितीने, रंग बदलणाऱ्या सरड्याप्रमाणे पक्ष बदलणाऱ्या राजकारण्यांनी केलेली सक्ती आहे. ●●●

**(लेखक गोव्यातील ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

# भेट पर्ल हार्बरच्या ऐतिहासिक राष्ट्रीय संग्रहालयाची



विजय नाईक

*१७ एकरांमध्ये ६५ दशलक्ष डॉलर्स खर्च करून उभारलेले हे संग्रहालय पाहण्यासाठी जगातून दरवर्षी १८ लाख ते २० लाख लोक येतात. विशेष म्हणजे, ॲरिझोनावरील हल्ल्यातून वाचलेले लोऊ कौन्टर व केन पॉट्स हे दोन नौदल अधिकारी आजही हयात असून, वाचलेला रेडिओ अधिकारी ग्रेन हार्वे लेन तीस वर्षे नौदलात सेवा करून निवृत्त झाला.*




**(मुक्काम होनोलुलू, हवाई, अमेरिका)**

३ डिसेंबर, २०२१ रोजी होनोलुलूत पाऊल ठेवलं, तेव्हापासून दुसऱ्या महायुद्धात जपानने येथील पर्ल हार्बरवर केलेला हल्ला व जपानला नमविण्यासाठी अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकीवर टाकलेले दोन अणुबॉंब, यांचा ऐतिहासिक भयपट नजरेसमोर उभा राहात होता. ९ जानेवारी २०२२ रोजी पर्ल हार्बरला भेट देताना जपानी विमानांनी अमेरिकन नौदल, हवाई दल व सेनादलाचा ८० वर्षांपूर्वी जो विध्वंस केला, त्याचे अवशेष पाहाण्यास मिळाले. ७ डिसेंबर, १९४१ रोजी झालेल्या हल्ल्यानंतर दुसऱ्या दिवशी होनोलुलू स्टार बुलेटीन या दैनिकातील मथळा होता, ''डेथ्स ओव्हर ४०० ऑन ओआहू, लेटेस्ट रिपोर्ट. टोकियो अनाउन्सेस स्टेट ऑफ वॉर विथ यूएस.'' उपमथळा होता, ''जॅपानीज रेड्स ऑन गुआम, पनामा रिपोर्टेड. गव्हर्नर प्रोक्लेम्स नॅशनल एमर्जन्सी.''

**दुसऱ्या महायुद्धाच्या स्मृतीचं जतन**

आम्ही राहातो त्या सॉल्ट लेक उपनगरातील अला पोहा संकुलापासून पर्ल हार्बर राष्ट्रीय संग्रहालय गाडीने पंधरा मिनिटांच्या अंतरावर आहे. कोरोनाच्या साथीमुळे ते गेले काही महिने बंद होते. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पर्यटकांना पाहण्यासाठी खुले करण्यात आले. हवाई हा आठ बेटांचा समूह आहे. त्यात ओआहू, माउई, हवाई, काऊआई, मोलोकाई, लानाई, निहाऊ व काहूलावे यांचा समावेश आहे. पर्ल हार्बर हे ओआहूतील फोर्ड बेटानजीक आहे. पर्ल हार्बर ऐतिहासिक संग्रहालयात यूएसएस ॲरिझोना लढाऊ जहाजाचे संग्रहालय सर्वात महत्त्वाचे मानले जाते. तसेच यूएसएस ओक्लाहामा व यूएसएस यूटा यांची उपसंग्रहालये आहेत. बुडालेल्या या जहाजांचे अवशेष आजही पाहण्यास मिळतात. यूएसएस ॲरिझोनाचे अवशेष पाहण्यासाठी फेरीतून तीन ते चार मिनिटे प्रवास करून उभारलेल्या पांढऱ्या शुभ्र इमारतीवर नेले जाते. इमारतीच्या एका भिंतीवर त्यात ठार झालेल्या १७०० अधिकारी व सैनिकांच्या नावांचा फलक पाहावयास मिळतो. इमारतीच्या कठड्यावरून बुडालेले ॲरिझोना दिसते. त्याचा काही भाग पाण्याच्या वरही आहे. दुसरे महायुद्ध होऊन ८० वर्षे उलटली, तरी त्याच्या भयाण स्मृती अमेरिका विसरलेली नाही. उलट जे वाचलं ते जसंच्या तसं जपून ठेवण्यात आलंय.

६५ दशलक्ष डॉलर्स खर्च करून १७ एकरांत

उभारलेले हे संग्रहालय पाहण्यासाठी जगातून दरवर्षी १८ लाख ते २० लाख लोक येतात. विशेष म्हणजे, ॲरिझोनावरील हल्ल्यातून वाचलेले लोऊ कौन्टर व केन पॉट्स हे दोन नौदल अधिकारी आजही हयात असून, वाचलेला रेडिओ अधिकारी ग्रेन हार्वे लेन तीस वर्षे नौदलात सेवा करून निवृत्त झाला. पर्ल हार्बरवरील हल्ल्यातून वाचलेल्या; परंतु कालांतराने मरण पावलेल्या सैनिकांची राख एका चंदेरी डब्यात ठेऊन पाणबुडे ती यूएसएस ॲरिझोनाच्या तळाशी जाऊन सुरक्षित जागी ठेवतात. ही नौदलाची प्रथा असून ७ डिसेंबर २०२१ रोजी लॉरेन बर्नर या सैनिकाची रक्षा समारंभपूर्वक ठेवण्यात आली. हल्ल्यातून वाचलेला तो ४४ वा; किंबहुना शेवटचा सैनिक असावा, असे त्या दिवशी प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे.

जगाच्या इतिहासात रविवार, ७ डिसेंबर १९४१ ही तारीख अतिशय महत्त्वाची आहे. या दिवशी सकाळी ७.४८ वाजता जपानने पहिला हवाई हल्ला केला. त्यापाठोपाठ अर्ध्या तासाने दुसरा हल्ला केला. यावेळी पर्ल हार्बर, फोर्ड बेट व ओआहूच्या प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावर अमेरिकन नौदलाची एकूण १८५ जहाजे सरावाची तयारी करीत होती; परंतु अचानक झालेल्या हल्ल्यात पर्ल हार्बरमध्ये उभ्या असलेल्या १८ लढाऊ जहाजांपैकी ८ जहाजे नष्ट अथवा निकामी झाली. २,३९० अमेरिकन सैनिक आणि अधिकारी ठार झाले, तर १,१७८ लोक जखमी झाले. ओआहू तळावर उभी असलेली अमेरिकेची १७८ लढाऊ विमाने बेचिराख व हिकमन तळावरील १५९ विमाने (एकूण ३३७) नादुरूस्त झाली.

पहिल्या हल्ल्यासाठी जपानने १८३ लढाऊ विमाने धाडली, तर दुसऱ्या लाटेत १६७ विमानांनी हल्ला केला. जपानने केट टॉर्पेडो बॉंबर्स व १६७ डाइव्ह बॉंबर्स व मित्सुबिशी झीरो फायटर या विमानांचा उपयोग केला. एकूण २१ जहाजांना जलसमाधी मिळाली. पर्ल हार्बरमध्ये उभ्या असलेल्या वेस्ट व्हर्जिनिया, ओक्लाहामा, कॅलिफोर्निया, नेवाडा या जहाजांवर हल्ला केला. त्यापैकी यूएसएस ॲरिझोनावर पडलेल्या बॉंबने ते जवळजवळ उद्ध्वस्त झाले. त्यातील १७०० अधिकारी व नौसैनिक ठार झाले, तर यूएसएस कॅलिफोर्नियावरील १०३ व यूएसएस ओक्लाहामावरील ४३० जण ठार झाले.

**जपानचे प्रगत युद्ध तंत्रज्ञान**

जपानचे युद्ध तंत्रज्ञान इतके विकसित झाले होते, की पर्ल हार्बरवर हल्ला करणाऱ्या जपानी विमानांनी तब्बल चार हजार मैलांचा प्रवास करूनही त्यांना कोणत्याही रडारने वेधले नाही. हल्ल्यापूर्वी जपानची ३५ लढाऊ जहाजे ओआहूपासून २३० मैलांवर दबा धरून उभी होती. सहा विमानवाहू जहाजांवरून विमाने पर्ल हार्बरच्या दिशेने झेपावली. ओआहू बेटावरील कुलाऊ टेकड्यांच्या पायथ्याशी असलेल्या फोर्ड या बेटानजीक हे बंदर आहे. फोर्ट कामेहमेहा व फोर्ट वीव्हर या टेकड्यांच्या मधोमध असलेल्या चिंचोळ्या खाडीतून प्रशांत महासागराचे पाणी बंदराच्या आत शिरते. बंदर नैसर्गिक आहे. टेकड्यांच्या परिसरात जपानने सात तळांवर हल्ले केले. टेकड्यांवर पाच ठिकाणी उभारलेल्या रडार्सना चुकवून विमाने बंदरात झेपावली. ओपाना येथील फिरणाऱ्या रडारच्या दिशेने विमाने येत असल्याचे तेथील टेहळणी अधिकाऱ्याने पाहिले. तथापि, ती अमेरिकेचीच विमाने आहेत, असे वाटून त्याने मुख्यालयास काही माहिती दिली नाही.

## तिसरे महायुद्ध झाले तर पृथ्वीचा संहार

***तिसरे महायुद्ध होऊ नये किंवा अणुबॉंबचा वापर होऊ नये, यासाठी परस्परविरोधी देशही एकत्र येतील. कारण ते महायुद्ध म्हणजे सर्वनाश व पृथ्वीचा संहार ठरेल. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जगाची लोकसंख्या २.३ अब्ज होती. २०२० मध्ये ती ७.५३ अब्ज झाली होती. यावरून या युद्धात किती मनुष्य व नैसर्गिक हानी होईल, याची कल्पनाही करता येणार नाही.***

संग्रहालयात हल्ल्यातील सर्व घटनांचे वर्णन करणारे फलक असून, त्यावर तपशीलवार माहिती वाचावयास मिळते. हल्ल्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावयाचा असेल, तर व्हर्च्युअल उपकरणाद्वारे ते पाहता येते, पाऊण तासाचा चित्रपट पाहता येतो. यूएसएस ॲरिझोनावर हल्ला झाला त्यावेळी जहाजावर असलेल्या; परंतु बंद पडलेल्या मात्र जतन करून ठेवलेल्या घड्याळातील काटे ८ वाजून ९ मिनिटे झाल्याचे दाखवितात. या जहाजाचा नांगर (अँकर) संग्रहालयात आहे.

१९४७ साली स्थापन झालेल्या अमेरिकेच्या इन्डो-पॅसिफिक कमांडचे केंद्र होनोलुलू येथे असून, त्यात नौदलातील पावणेचार लाख अधिकारी, सैनिक काम करतात. 'व्हॅलर, सॅक्रिफाईस अँड पीस' हे बोधवाक्य असलेल्या कमांडचे नेतृत्व रिअर ॲडमिरल टिमॉथी कोट करीत असून, हिंद-प्रशांत महासागरात चीनच्या विस्तारवादी धोरणाला रोखण्याचे काम करीत आहे. दक्षिण चीन समुद्रावर चीनने वर्चस्व स्थापन केले आहे. अनेक बेटांवर संरक्षणात्मक बांधकाम केले आहे. भारतासह प्रशांत महासागरातील अनेक देशांचा त्याला विरोध आहे. महासागर ही मानवाची सामाईक संपत्ती असून त्यावर सर्व राष्ट्रांचा समान अधिकार आहे, असे चीनला वारंवार सांगितले जात आहे. त्यामुळे या कमांडला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. कमांडच्या अधिकार क्षेत्राखाली हिंद-प्रशांत महासागराचा १०० दशलक्ष चौरस मैलाचा परिसर येतो. या परिसराने पृथ्वीचा ५२ टक्के भाग व्यापला आहे. त्यात अंटार्क्टिकापासून चीन, मंगोलिया, दोन्ही कोरिया, जपान, दक्षिण पूर्व आशिया, भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आदी ३६ राष्ट्रांचा समावेश आहे.

**मनोधैर्य खच्चीकरणासाठी हल्ला**

पर्ल हार्बरवरील हल्ल्याचे कारण, जपानला प्रशांत महासागरातील अमेरिकेचे आरमार नेस्तनाबूत करून महासागरावर तसेच दक्षिण पूर्व आशियावर आपले प्रभुत्व सिद्ध करायचे होते. हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी जपानने थायलंड, हॉंगकॉंग, मलाया व फिलिपीन्स, गिलबर्ट, वेक या बेटांवर व गुआमवर हल्ले केले. जपानच्या युद्ध महत्त्वाकांक्षेने जगाचा एक तृतीयांश भाग व्यापला. पर्ल हार्बरवर हल्ला करून जपानने अमेरिकेला महायुद्धात खेचले. १९४२ मध्ये फिलिपीन्स, म्यानमार, सिंगापूर पडले. जपानने न्यूगिनीवर हल्ला केला. अमेरिकेच्या ताब्यात असलेल्या आट्टू व किस्का बेटांवर कब्जा केला. दक्षिण पूर्व आशिया, ब्रिटन, द नेदरलँड्स व अमेरिकेवर हल्ले करण्याच्या योजना जपानने आखल्या होत्या. आपल्या प्रभावक्षेत्रात अमेरिकेने हस्तक्षेप करू नये, या इराद्याने अमेरिकेचे मनोधैर्य खच्ची करण्यासाठी पर्ल हार्बरवर हल्ला

झाला. जपानचे ॲडमिरल इसोकोरू यामामोटो यांनी त्यासाठी महिनोन्महिने अचूक नियोजन केले.

दुसरे महायुद्ध होण्यापूर्वी जागतिक सत्तांच्या दरम्यान पडलेल्या दोन तटांत जपान, जर्मनी व इटली (एक्सिस) एकीकडे व त्याविरूद्ध फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, अमेरिका व सोव्हिएत महासंघ दुसरीकडे असे चित्र होते. आशिया व अन्यत्र असलेल्या युरोपीय वसाहतींवरील वर्चस्व संपुष्टात आणून जपानला आपली सत्ता स्थापन करावयाची होती. जपानी साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी १९१० मध्ये जपानने चीन व रशियाला पराभूत करून कोरिया व फॉर्मोसाला संलग्न करून मांचुरियावर ताबा मिळवला होता. ब्रिटनची सत्ता असलेल्या भारतावर जपानने हल्ला चढविला. त्यापैकी कोहिमा (नागालँड) व इम्फाळ (मणिपूर) येथे झालेली युद्धे निर्णायक ठरली. त्यात जपानी सैन्याचा मोठा पराभव झाला.



**हिरोशिमा, नागासाकीवरील हल्ल्यानंतर जपानची शरणागती**

पर्ल हार्बरवर हल्ला झाला, तेव्हा फ्रँकलिन डी. रूझवेल्ट हे अमेरिकेचे अध्यक्ष होते. त्यांनी अमेरिकन काँग्रेसपुढे केलेल्या भाषणात या हल्ल्याचे वर्णन 'अ डे विच विल लीव्ह इन इनफेमी' असे केले. रूझवेल्टनंतर आलेले अध्यक्ष हॅरी ट्रूमन यांनी जपानला कायमची अद्दल घडविण्याच्या उद्देशाने पॉट्सडॅम (जर्मनी) जाहीरनाम्यातील कलमांनुसार २६ जुलै १९४५ रोजी जपानला बिनशर्त शरण येण्याचे आवाहन केले. जाहीरनामा अमेरिका, ग्रेट ब्रिटन व चीन या देशांदरम्यान झाला होता; परंतु अकरा दिवसांनंतरही जपानकडून काही प्रतिसाद न आल्याने ६ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमाच्या वेळेनुसार सकाळी ८.१५ मिनिटांनी अमेरिकेने पहिला अणुबाँब टाकला व ९ ऑगस्ट रोजी नागासाकीवर अणुबाँबचा दुसरा हल्ला झाला. दोन्ही शहरे बेचिराख झाली, तेव्हा कुठे जपानचे नरेश हिरोहितो यांचे डोके ठिकाणावर आले व त्यांनी शरणागतीची घोषणा केली. २ सप्टेंबर, १९४५ रोजी जपानचे परराष्ट्रमंत्री मामोरू शिगेमात्सु यांनी यूएसएस मिसौरी या लढाऊ जहाजावर झालेल्या समारंभात अमेरिकन जनरल रिचर्ड सदरलँड व जपानी व अमेरिकन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शरणागतीच्या दस्तऐवजांवर स्वाक्षरी केली.

पर्ल हार्बरवरील हल्ल्यानंतर जपानच्या विस्तारवादाला चाप बसविण्यासाठी अमेरिकेने जोरदार तयारी केली. १९४३ मध्ये सॉलोमन बेटातील ग्वादलकॅनाल तसेच अलेशियन बेटे, न्यूगिनी परत ताब्यात घेण्याच्या दृष्टीने हल्ले सुरू केले. १९४४ मध्ये अमेरिकेच्या बी-२९ बाँबर्सनी जपानवर पहिला हल्ला करून सायपान, मारियान, गुआम व फिलिपीन्सवर ताबा मिळविला. १९४५ मध्ये अलाईड सेनेने जिमा व ओकिनावा बेटसमूह ताब्यात घेतले. दुसरीकडे, चीनने दक्षिण चीनमधील जपानच्या ताब्यातील शहरे परत काबीज केली. १९५२ मध्ये जपान व अलाईड सेनेदरम्यान झालेल्या सॅनफ्रान्सिस्को शांती करारानुसार जपानच्या ताब्यातील सर्व प्रदेश मुक्त झाल्यावर जपानविरूद्धचे युद्ध संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात आले. जपान व अमेरिकेदरम्यान १९६० मध्ये झालेल्या परस्पर साह्य व सुरक्षाविषयक करारान्वये अमेरिका व जपान पुन्हा मित्रराष्ट्र झाली. अमेरिकेने जपानचे केवळ पुनर्निर्माण केले नाही, तर आज हिंद-प्रशांत महासागरात अमेरिकेचा सहकारी म्हणून जपान महत्त्वाची व व्यूहात्मक भूमिका बजावित आहे.

**चीनसमोर आज मोठे आव्हान**

दुसऱ्या महायुद्धादरम्यान त्यावेळच्या (१९४०) २.३ अब्ज लोकसंख्येपैकी ७० ते ८५ दशलक्ष लोक ठार झाले. अनेक राष्ट्रांच्या संपत्तीची अतोनात हानी झाली. रोगराई व अन्य कारणांनी अंदाजे १९ दशलक्ष ते २८ दशलक्ष लोक मरण पावले. अमेरिका व सोव्हिएत महासंघ या दोन तटात जग वाटले गेले. दुसऱ्या महायुद्धानंतर उलटलेल्या ८० वर्षांत जग अनेकार्थाने बदलले असून, १९९१ मध्ये सोव्हिएत महासंघाचे विभाजन झाल्यावर महासत्ता म्हणून चीन पुढे आला आहे. अमेरिकेची सद्दी संपवून आशिया व जगातील पर्यायी महासत्ता म्हणून चीनला प्रस्थापित व्हावयाचे आहे. चीनला आवर घालण्यासाठी भारत, अमेरिका, जपान व ऑस्ट्रेलिया यांचा 'क्वाड (क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग) हा चतुष्कोन गट' चीनला आव्हान देऊ पाहात आहे. त्यापाठोपाठ अमेरिका, ब्रिटन व ऑस्ट्रेलिया यांचा नुकताच स्थापन झालेला 'ऑकुस (ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंगडम अँड अमेरिका) हा त्रिकोण' व जपान व ऑस्ट्रेलिया दरम्यान (जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा व ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन यांच्यात) झालेला संरक्षण क्षेत्रातील सहकार्याचा करार, हे चीनसाठी आव्हान ठरणार आहेत.


**आव्हानात्मक पंचकोन**

अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्या कारकीर्दीत त्यांनी टीपीपी (ट्रान्स पॅसिफिक पार्टनरशिप) ही संकल्पना राबविण्याचा प्रयत्न केला होता; परंतु नंतर आलेले अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ती मोडीत काढली. जो बायडेन अध्यक्ष झाल्यावर ती निरनिराळ्या स्वरूपात पुढे येत असून, स्थापन झालेले वरील गट हे तिचाच एक भाग आहेत; परंतु या गटांना आव्हान देण्यासाठी रशिया, चीन, पाकिस्तान, तुर्कस्तान, इराण यांचा एकत्र येऊ पाहणारा पंचकोन तितकाच आव्हानात्मक ठरणार आहे.

एक गोष्ट निश्चित, की काहीही झाले तरी पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर तिसरे महायुद्ध होऊ नये वा अणुबाँबचा वापर होऊ नये, यासाठी परस्परविरोधी देशही एकत्र येतील. कारण ते महायुद्ध म्हणजे सर्वनाश व पृथ्वीचा संहार ठरेल. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात वर उल्लेखिलेल्याप्रमाणे जगाची लोकसंख्या २.३ अब्ज होती. २०२० मध्ये ती ७.५३ अब्ज झाली होती. यावरून या युद्धात किती मनुष्य व नैसर्गिक हानी होईल, याची कल्पनाही करता येणार नाही. ●●●

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

# सकारात्मक बदलांसाठी घटनादुरूस्ती अनिवार्य



प्रा. अविनाश कोल्हे

*पहिली घटनादुरूस्ती झाली नसती तर नंतर घटनेत झालेले सकारात्मक बदल झाले असते का, याचा विचार झाला पाहिजे. अमेरिकेतही घटना लागू केल्यानंतर लगेचच एक नाही, दोन नाही तर तब्बल दहा दुरूस्त्या कराव्या लागल्या होत्या. अमेरिका काय किंवा भारत काय, या देशांतील सामाजिक, आर्थिक वास्तव नेहमीच गुंतागुंतीचे होते आणि आजही आहे. अशा स्थितीत भारतीय राज्यघटनेत अधूनमधून दुरूस्ती करणे आवश्यक ठरते. याचा फार बाऊ करू नये. भारतीय राज्यघटनेत तर आजपर्यंत शंभरपेक्षा जास्त दुरूस्त्या झालेल्या आहेत. हे एकप्रकारे अपरिहार्य आहे.*



१६ ऑक्टोबर १९५० रोजी मुंबई उच्च न्यायालयाने 'बॉम्बे स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन' ही राज्य सरकारची कंपनी बेकायदेशीर असल्याचा निर्णय दिला. मुंबई सरकार या कंपनीद्वारे राज्यातील 'रस्ते वाहतूक' स्वतःच्या ताब्यात घेण्याच्या विचारात होते. काही महिन्यांपूर्वी नाशिक येथे भरलेल्या अधिवेशनात काँग्रेसने 'राष्ट्रीयीकरण' हा आमचा महत्त्वाचा आर्थिक कार्यक्रम आहे' अशा आशयाचा ठराव केला होता आणि आता मुंबई उच्च न्यायालयाने त्याला केराची टोपली दाखवली होती. यात 'रस्ते वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण' हा मुद्दा गुंतला होता.

**निवडणुका पुढे ढकलाव्या**

'रस्ते वाहतूक' हा मुद्दा उत्तर प्रदेशातही वादग्रस्त ठरला होता. उत्तर प्रदेश सरकारने मार्च १९५० मध्ये राज्यातील रस्ते वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करणारा हुकूम जारी केला होता. याला खाजगी बसमालकांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. या हुकूमामुळे आमच्या कोणताही व्यवसाय करण्याच्या मूलभूत हक्कांवर गदा येते, असा त्यांचा युक्तीवाद होता. अपेक्षेप्रमाणे उच्च न्यायालयाने हा हुकूम रद्द केला (पृ.७४). अर्थात, 'राष्ट्रीयीकरण' हा मुद्दा जरा वेगळा होता. येथे न्यायपालिकेने 'सरकारने हुकूम न काढता विधिमंडळात चर्चा करून कायदा करावा' असे नमूद केले. त्यानुसार केंद्रीय वाहतूक मंत्री के. संथनम यांनी ३० नोव्हेंबर १९५० रोजी असा कायदा संमत करून घेतला. असे असले तरी एव्हाना नेहरू सरकारच्या लक्षात आलं होतं, की 'जमीन सुधारणा', 'आरक्षण' आणि 'जनसेवांचं राष्ट्रीयीकरण' हे जे तीन महत्त्वाचे कार्यक्रम आहेत, इथं त्यांना न्यायपालिकेशी टक्कर द्यावी लागेल. यासाठी घटनादुरूस्ती करणं गरजेचं आहे, याबद्दल एकमत होऊ लागलं. त्यानुसार १९ ऑक्टोबर १९५० रोजी नेहरूंनी कायदामंत्री असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पत्र लिहून घटनादुरूस्ती करावी लागेल, याचे संकेत दिले. यानंतर ३१ ऑक्टोबर १९५० रोजी नेहरूंनी राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र लिहून मे १९५१ च्या आत सार्वत्रिक निवडणुका घ्या, असा आग्रह केला. पण काँग्रेसचे प्रांतांच्या पातळीवरचे नेते अशा नकारात्मक स्थितीत निवडणुका घेण्यास तयार नव्हते. काँग्रेसची लोकप्रियता रसातळाला गेली आहे, काँग्रेस एकही योजना अंमलात आणू शकत नाही, जमीन सुधारणा झालेल्या नाहीत, आरक्षणाचा मुद्दा कोर्टात आहे, राष्ट्रीयीकरणाचे भवितव्य अधांतरी आहे. अशा स्थितीत नेते

मतदारांसमोर जाण्यास तयार नव्हते. शेवटी नेहरूंनी निवडणुका पुढे ढकलत नोव्हेंबर १९५१ मध्ये घेण्याचे ठरवले (पृ.८०).


तिकडे पंजाब प्रांतात वेगळेच आव्हान आकार घेत होते. अकाली दलाचे नेते मास्टर तारासिंग यांना सरकारने कलम '१२४ अ' वापरून (हे कलम सध्या चर्चेत आहे) देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक केलेली होती. २८ नोव्हेंबर १९५० रोजी पंजाब उच्च न्यायालयाने तारासिंगांची सुटका करावी, असा आदेश दिला. 'सरकारच्या विरोधात भूमिका घेणे म्हणजे राजद्रोह नव्हे' असे पंजाब न्यायालयाने नमूद केले होते. देशभर सरकारच्या लोकशाहीविरोधी मानसिकतेवर टीका सुरू होती. अशा स्थितीत १५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेलांना देवाज्ञा झाली (पृ.८५). हा एका व्यक्तीचा मृत्यू नव्हता, तर नेहरूंना दोन शब्द ऐकवण्याची क्षमता असलेल्या वरिष्ठ व्यक्तीचा मृत्यू होता.

**...तर सरकारला बंधनं घालता येतील**

लेखकाने चवथ्या प्रकरणात देशासमोर असलेल्या संभाव्य वादळाची चर्चा केली आहे. बिहार विधानसभेने संमत केलेल्या कायद्याला पाटणा उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. त्याविरूद्ध बिहार सरकारने सर्वो च्च न्यायालयात दाद मागितली होती. सर्वोच्च न्यायालयाने अपील दाखल करूनच घेतले नाही आणि स्थगिती उठवण्यास नकार दिला. दुसरीकडे, हंगामी लोकसभेचे सभापती जी. व्ही. मावळणकर यांनी एका पत्राद्वारे नेहरूंकडे तक्रार केली, की आजकाल सरकार ऊठसूट वटहुकूम काढते आणि याद्वारे लोकसभेतील चर्चेला बगल देते (पृ.८८). याच काळात भारतीय प्रजासत्ताकाचा पहिला वाढदिवस जवळ येत होता. उत्तर प्रदेश सरकारने १ जानेवारी १९५१ रोजी विधानसभेचे खास अधिवेशन बोलावले आणि उलटसुलट चर्चेनंतर १० जानेवारी १९५१ रोजी 'जमीनदारी निर्मुलन कायदा' संमत झाला. राज्यपालांनी स्वाक्षरी करून राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीसाठी पाठवला. सर्वांना '२६ जानेवारी'चा मुहूर्त साधावयाचा होता. त्याकाळी केंद्रीय कायदा विभागाचे संयुक्त सचिव एस.एन. मुखर्जी होते. या गृहस्थाने घटनासमितीच्या सचिवालयात काम केलं होतं. घटना बनवण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. घटनेच्या कलम १९ प्रमाणे सरकार मूलभूत हक्कांवर प्रसंगी 'न्याय्य बंधनं (रिझनेबल रिस्ट्रीक्शन्स) लादू शकतं. यात 'शांततापूर्ण मार्गाने एकत्र येण्याचा हक्क' (राईट टू असेम्ब्ल पीसफुली) आणि 'संघटना स्थापन करण्याचा हक्क' (राईट टू फॉर्म असोसिएशन) हे दोन हक्क येतात. पण 'उच्चार आणि आविष्कार स्वातंत्र्य' यांच्यासंदर्भात 'न्याय्य' हा शब्द वापरलेला नाही. अशा स्थितीत 'न्याय्य' हा शब्द कलम १९ च्या सर्व उपकलमांतून काढून टाकावा आणि एक प्रकारची समानता आणावी, असे मुखर्जींनी सूचवले. हे जर साध्य झालं तर सरकारला 'उच्चार स्वातंत्र्य' आणि 'आविष्कार स्वातंत्र्य' यावर बंधनं घालता येतील. मुख्य म्हणजे ही बंधनं 'न्याय्य आहेत' याचे कोर्टासमोर समर्थन करण्याची गरज उरणार नाही (पृ.९३).

**चिडून नेहरूंचे मुख्यमंत्र्यांना पत्र**

लेखक नमूद करतो, की मुखर्जी यांची सूचना त्यांचे वरिष्ठ के.व्ही.के. सुंदरम यांनी मान्य केली आणि त्यानुसार कलम १९ (२) मधील 'न्याय्य' शब्द काढून टाकायला मान्यता दिली. एवढंच नव्हे तर उच्चारस्वातंत्र्यावर बंधनं आणताना आणखी काही कारणं असावीत म्हणत त्यांनी 'देशाची सुरक्षा', 'परराष्ट्रांशी संबंध', 'सुसंस्कृत वागणं' (डिसेन्सी) आणि 'पब्लिक ऑर्डर' याचा समावेश केला. एवढेच नव्हे तर, जमीनदारी




निर्मुलन कायदा 'न्यायालयीन पुनर्विलोकनापासून (ज्युडीशियल रिव्ह्यू) दूर ठेवावा, असंही सुचवलं. हे टिपण नेहरूंना आणि आंबेडकरांना पाठवण्यात आलं.

तिकडे जमीनदारसुद्धा तयारीत होते. ते सर्व कलम २२६ खाली अर्ज करणार होते. अपेक्षेप्रमाणे २४ जानेवारी १९५० रोजी राष्ट्रपतींनी उत्तर प्रदेश विधानसभेने संमत केलेल्या जमीनदारी निर्मुलन विधेयकावर स्वाक्षरी केली. जमीनदारांनी ताबडतोब अलाहाबाद आणि लखनौच्या उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यांच्यातर्फे नामवंत वकील पी.आर. दास खटला लढवणार होते. जमीनदारांकडे अचानक 'मूलभूत अधिकारांचे कैवारी' अशी भूमिका चालत आली. यातील विसंगती थक्क करणारी होती. दुसऱ्याच दिवशी खटल्याची सुनावणी सुरू झाली. न्यायालयाने हंगामी स्थगिती दिली. २५ जानेवारीला सकाळी दिल्लीत काँग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्त्वाला बसलेल्या धक्क्याचे वर्णन काय करावे? पंडित नेहरू प्रचंड चिडले होते. त्यांनी १ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. ते लिहितात 'आपण सर्व न्यायपालिकेचा आदर करतो. पण जर राज्यघटना सामाजिक आणि आर्थिक बदलांच्या मार्गात अडथळे निर्माण करत असेल तर घटनादुरूस्तीला पर्याय नाही' (पृ.९७).

लेखकाने तेव्हा असलेल्या स्थितीची दुसरी बाजू दाखवली आहे. एक म्हणजे उच्च न्यायालयांनी 'स्थगिती' दिली आहे, 'जमीनदारी निर्मुलन

कायदे चुकीचे आहेत' असं म्हटलेलं नाही. समजा उच्च न्यायालयांनी नंतर असा निर्णय दिला, तर सरकार सर्वोच्च न्यायालयात जाईलच. म्हणजे जमीनदारी निर्मुलन रद्द केले नव्हते तर एक प्रकारे पुढे ढकलेले गेले होते. दुसरं म्हणजे, काँग्रेसच्या नेत्यांत एकमत होते की 'खाजगी मालमत्तेचा हक्क', 'जमीनदारी निर्मुलन', 'उच्चार स्वातंत्र्य', 'राष्ट्रीयीकरण' वगैरेंबद्दल घटनादुरूस्ती झालीच पाहिजे (पृ.१०१).

**हंगामी संसदेमार्फत घटनादुरूस्ती करण्यास आक्षेप**

घटनादुरूस्ती करून 'न्याय्य' शब्द काढायचा की नाही याबद्दल मंत्रिमंडळात एकमत नव्हते. कायदामंत्री डॉ. आंबेडकरांच्या मते, 'न्याय्य' हा शब्द न काढता हा शब्द जिथं नाही तिथेही टाकला पाहिजे, अन्यथा सरकार प्रचंड अधिकार बळकावून बसेल. गृहमंत्री राजगोपालाचारी यांच्या मते, हा शब्द घटनेतून काढून टाकला पाहिजे. लेखक नमूद करतो त्याप्रमाणे, फेब्रुवारी आणि मार्च १९५१ मध्ये देशातले वातावरण घटनादुरूस्तीच्या बाजूने झालेले होते. सर्व देशाचे लक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे लागले होते. अशा स्थितीत ९ एप्रिल १९५१ रोजी 'टाईम्स ऑफ इंडिया'ने बातमी दिली, की सरकार मूलभूत अधिकारांत पाच घटनादुरूस्त्या करण्याच्या विचारात आहे. या दुरूस्त्या कलम १४, १५, १९, ३१ आणि ३२ बद्दल असतील. त्याच दिवशी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणासंदर्भात मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय ग्राह्य धरला आणि आरक्षण अमान्य केले. हे आरक्षण कलम २९ (२) च्या विरोधात जात असल्याचे नमूद करण्यात आले. न्यायमूर्ती कानिया, न्यायमूर्ती फाजल अली, न्यायमूर्ती पातांजली शास्त्री, न्यायमूर्ती मेहेरचंद महाजन, न्यायमूर्ती सुधीरंजन दास, न्यायमूर्ती बी.के. मुखर्जी आणि न्यायमूर्ती व्ही.व्ही.एन. बोस या सर्वांनी एकमताने मद्रास सरकारचा आरक्षणाचा निर्णय फेटाळला.

अशा स्थितीत घटनादुरूस्ती अपरिहार्य झाली. असं असलं तरी पी.आर. दाससारखे नामवंत वकील या संसदेला घटनादुरूस्ती करण्याचा हक्क नाही, अशी भूमिका ठासून मांडू लागले. यात तथ्य होतेच. भारतातील घटनासमिती स्वातंत्र्यपूर्व काळात निवडली गेली, जेव्हा फार कमी लोकांना मतदानाचा अधिकार होता. तेव्हा प्रौढ मतदानाचा हक्क नव्हता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना बनवण्याचे काम संपल्यानंतर ही घटनासमिती 'हंगामी संसद' म्हणून कार्यरत होती. अशी हंगामी संसद घटनादुरूस्ती कशी करू शकते, हा धारदार आक्षेप होता (पृ.१२३). यावर आधी न्यायमूर्ती छागला यांनी पुण्यात केलेल्या भाषणांत आक्षेप घेतले होते. आता नामवंत कायदेतज्ज्ञ एम.आर. जयकर यांनीसुद्धा हेच आक्षेप घेतले. 'मुंबई प्रांत वकील संघटनेने'सुद्धा एका ठरावाद्वारे सरकारला आवाहन केले, की घटनादुरूस्ती करायचीच असेल तर सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर करावी'. या ठरावाला देशाच्या अनेक भागांतून पाठिंबा मिळाला. देशातले बडे व्यापारी आणि उद्योगपतींची संघटना 'फेडरेशन ऑफ इंडियन चेम्बर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' (फिक्की)ने सुद्धा या ठरावाला पाठिंबा जाहीर केला.

**घाई करण्याची गरज नाही**

लेखक नमूद करतो, की याचा नेहरू सरकारवर काहीही परिणाम झाला नाही. मंत्रिमंडळ समितीने केलेल्या शिफारसीनुसार कलम ३१ (खाजगी मालमत्तेचा हक्क) ला धक्का न लावता 'कलम ३१ अ' आणायचे आणि याद्वारे सरकारला योग्य वाटल्यास खाजगी मालमत्ता ताब्यात घेण्याचे अधिकार द्यायचे. शिवाय कलम १९ (६) आणायचे आणि याद्वारे सरकारला व्यवसाय किंवा व्यापारांचे राष्ट्रीयीकरणाचे अधिकार प्रदान करायचे (पृ.१२७). या शिफारशींची एक प्रत राष्ट्रपतींना

## घटनादुरूस्तीच्या दिशेने नेहरूंचे प्रयत्न

*पाटणा उच्च न्यायालयाचा निर्णय १२ मार्च १९५१ रोजी आला आणि 'जमीनदारी निर्मुलन कायदा' घटनाविरोधी असल्याचे जाहीर केले. काँग्रेस पक्षात नैराश्य पसरलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक विस्तृत टिपण तयार केलं. यात त्यांनी घटनादुरूस्तीच्या बाजूने मत दिलं. पटेलांनंतर केंद्रीय गृहमंत्री झालेल्या सी. राजगोपालचारींनी तर 'न्याय्य बंधनांतील' 'न्याय्य' शब्द काढून टाकावा अशी शिफारस तर केलीच; शिवाय कलम १९ ने प्रदान केलेल्या मूलभूत हक्कांवर इतरही बंधनं लादली पाहिजे, अशी सूचना केली. या सर्व घटना घडत असताना संसदेचे अधिवेशन सुरू होते. नेहरूंनी याच अधिवेशनात घटनादुरूस्ती व्हावी, या दिशेने प्रयत्न सुरू केले (पृ. १०५).*

*देशभरात पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पडसाद उमटले. लेखकाने पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे खरे रूप काय होते, हे तपशिलात नमूद केले आहे. निर्णयात म्हटलं होतं, की जमीनदारांची जमीन घेऊ नका असं आम्ही म्हणत नाही. या प्रकारे जमीन सरकारला घेता येईल, असा स्पष्ट उल्लेख कलम ३१ च्या उपकलम ४ आणि ६ मध्ये आहे. एवढंच नव्हे तर, सरकारने 'जमिनी ताब्यात घेतल्या त्या लोककल्याणासाठी आहे', हेसुद्धा आम्ही मानायला तयार आहोत. मात्र नुकसानभरपाईमध्ये जो भेदाभेद केला आहे, तो कलम १४ नुसार मान्य होण्यासारखा नाही. उदाहरणार्थ, २०,००० रुपये वर्षाला उत्पन्न असलेल्या जमीनदाराला जमिनीच्या आठपट नुकसानभरपाई आणि २०,००१ रुपये उत्पन्न असलेल्या जमीनदाराला सहापट नुकसानभरपाई हे चुकीचे आहे (पृ.१०९). थोडक्यात, न्यायालय या अन्यायाला आक्षेप घेत होते. नुकसानभरपाई पुरेशी आहे की नाही याचीसुद्धा न्यायालय चर्चा करत नव्हते. याचा एक अर्थ असा, की न्यायालयाने जमीनदारी निर्मुलनाला आक्षेप घेतला नव्हता. उलटपक्षी न्यायालयाने जमीनदारी निर्मुलनाचे महत्त्व मान्य केले होते. याचाच दुसरा अर्थ असा की केवळ या मुद्याबद्दल घटनादुरूस्ती केली तर नंतर केलेला जमीनदारी निर्मुलन कायदा कोर्टाला मान्य होईल. हे सर्व स्पष्ट दिसत असूनही नेहरू आणि काँग्रेसच्या अनेक वरिष्ठ नेत्यांना घटनादुरूस्ती करून संसदेकडे अमर्याद द्यायचे होते, असा लेखकाचा आरोप आहे (पृ.१११).*

# महत्त्वाच्या घटनादुरूस्त्या

**भारतीय राज्यघटना अमलात आल्यापासून ऑक्टोबर २०२१ पर्यंत राज्यघटनेत १०५ दुरूस्त्या करण्यात आल्या. त्यापैकी ११ दुरूस्त्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात.**

● **पहिली घटनादुरूस्ती** : सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय घटकांच्या किंवा अनुसूचित जाती-जमातीच्या प्रगतीसाठी विशेष तरतुदींचा समावेश करणे त्याचबरोबर जमीनदारी निर्मूलन कायद्यांच्या घटनात्मक वैधतेला पूर्ण संरक्षण देण्यासाठी आणि भाषण स्वातंत्र्यावर न्याय्यबंधनं घालण्यासाठी कलम १५, १९, ८५, ८७, १७४, १७६, ३४१, ३४२, ३७२ आणि ३७६ मध्ये दुरूस्ती करून कलम ३१ ए आणि ३१ बी समाविष्ट करण्यात आले. मूलभूत हक्कांच्या घटनात्मक हमीला विरोधाभास ठरणाऱ्या कायद्यांविरोधात संरक्षण म्हणून परिशिष्ट ९ समाविष्ट करण्यात आले.

● **पाचवी घटनादुरूस्ती** : यात कलम ३ मध्ये दुरूस्ती करण्यात आली. नवीन राज्याची निर्मिती आणि संबंधित क्षेत्रामध्ये, सीमांमध्ये किंवा सध्याच्या राज्यांच्या नावांमध्ये बदल करण्याशी संबंधित प्रस्तावित केंद्रीय कायद्यांवर आपली भूमिका कळवण्यासाठी राज्य विधिमंडळाकरता एक कालमर्यादा निश्चित करण्याचे अधिकार राष्ट्रपतींना प्रदान करण्यासाठी ही घटनादुरूस्ती करण्यात आली. त्याचबरोबर कालमर्यादा किंवा वाढवलेला कालावधी संपल्यानंतर तो वाढवण्याचे आणि संसदेत सादर होणाऱ्या एखाद्या विधेयकास प्रतिबंध करण्याचेही अधिकार याद्वारे राष्ट्रपतींना देण्यात आले.



● **सहावी घटनादुरूस्ती** : कर वाढविण्याच्या दृष्टीने केंद्रीय सूची आणि राज्य सूचीमध्ये दुरूस्तीकरिता कलम २६९ आणि २८६ मध्ये दुरूस्ती करण्यात आली.

● **तेरावी घटनादुरूस्ती** : कलम १७० मध्ये दुरूस्ती आणि ३७१ ए या नवीन कलमाचा समावेश. कलम ३७१ ए अंतर्गत विशेष संरक्षणासह नागालँड राज्याच्या निर्मितीसाठी ही घटनादुरूस्ती करण्यात आली.

● **पंधरावी घटनादुरूस्ती** : कलम १२४, १२८, २१७, २२२, २२४, २२६, २९७, ३११ आणि ३१६ मध्ये दुरूस्ती करून कलम २२४ ए समाविष्ट करण्यात आले. त्याचबरोबर परिशिष्ट ७ मध्ये दुरूस्ती करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ पर्यंत वाढविण्यासाठी आणि न्यायाधीशांशी संबंधित नियमांची तर्कसंगत व्याख्या करण्यासाठी ही घटनादुरूस्ती करण्यात आली.

● **अठरावी घटनादुरूस्ती** : कलम ३ मध्ये दुरूस्ती. केंद्रशासित प्रदेशांना कलम ३ मध्ये समाविष्ट करण्यासाठी आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पुनर्रचनेला परवानगी देण्यासाठी ही तांत्रिक दुरूस्ती करण्यात आली.

● **एकोणिसावी घटनादुरूस्ती** : कलम ३२४ मध्ये दुरूस्ती. निवडणूक न्यायाधीकरण रद्द करून निवडणूक याचिका नियमित उच्च न्यायालयांमध्ये चालविण्याची तरतूद यात करण्यात आली.

● **एकविसावी घटनादुरूस्ती** : परिशिष्ट ८ मध्ये दुरूस्ती. सिंधी भाषेचा अधिकृत भाषा म्हणून समावेश करण्यासाठी ही घटनादुरूस्ती करण्यात आली.

● **बावीसावी घटनादुरूस्ती** : कलम २७५ मध्ये दुरूस्ती करण्याबरोबरच २४४ ए आणि ३७१ बी ही दोन नवीन कलमे समाविष्ट करण्यात आली. आसाम राज्याअंतर्गत स्वायत्त राज्य स्थापण्याची तरतूद यामध्ये केली गेली.

● **सव्वीसावी घटनादुरूस्ती** : कलम ३६६ मध्ये दुरूस्ती करून कलम ३६३ ए समाविष्ट करण्यात आले. विशेष म्हणजे, कलम २९१ आणि ३६२ हटविण्यात आले. स्वातंत्र्यापूर्वी अस्तित्वात असलेली संस्थाने भारतीय प्रजासत्ताकात विलीन झाल्यानंतर त्या संस्थानांच्या माजी राजांना अनुदान देण्यासाठी म्हणून स्थापन केलेली 'प्रायव्ही पर्स' योजना या घटनादुरूस्तीन्वये संपुष्टात आणण्यात आली.

● **बेचाळीसावी घटनादुरूस्ती** : आजपर्यंत राज्यघटनेत ज्या १०५ दुरूस्त्या करण्यात आल्या त्यातील ४२ वी घटनादुरूस्ती अत्यंत महत्त्वाची मानली जाते. कारण या घटनादुरूस्तीने नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर काही काळासाठी गदा आली होती. कलम ३१, ३१ सी, ३९, ५५, ७४, ७७, ८१, ८२, ८३, १००, १०२, १०३, १०५, ११८, १४५, १५०, १६६, १७०, १७२, १८९, १९१, १९२, १९४, २०८, २१७, २२५, २२६, २२७, २२८, ३११, ३१२, ३३०, ३५२, ३५३, ३५६, ३५७, ३५८, ३५९, ३६६, ३६८ आणि ३७१ एफ मध्ये दुरूस्ती करण्याबरोबरच ३१ डी, ३२ ए, ३९ ए, ४३ ए, ४८ ए, १३१ ए, १३९ ए, १४४ ए, २२६ ए, २२८ ए आणि २५७ ए ही नवीन कलमे समाविष्ट करण्यात आली. त्याचबरोबर भाग ४ ए आणि १४ ए समाविष्ट करतानाच परिशिष्ट ७ मध्ये दुरूस्ती करण्यात आली. इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सरकारच्या राजवटीत, विशेषतः अंतर्गत आणीबाणीच्या काळात ही घटनादुरूस्ती करण्यात आली. मूलभूत हक्कांमध्ये कपात करणे, मूलभूत कर्तव्यांचा समावेश करणे आणि भारतीय राज्यघटनेच्या पायाभूत रचनेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक असा बदल करण्यासाठी ४२ वी घटनादुरूस्ती करण्यात आली. या घटनादुरूस्तीला अधिकृतरित्या 'राज्यघटना कायदा १९७६' असे संबोधले जाते.

दरम्यान, मोरारजी देसाई यांच्या राजवटीत करण्यात आलेल्या ४४ व्या घटनादुरूस्तीन्वये नागरिकांचे मूलभूत हक्क पुन्हा बहाल करण्यात आले.

पाठवली. राष्ट्रपतींनी ३० एप्रिल १९५१ रोजी नेहरूंना पत्र लिहिले आणि या दुरूस्तींबद्दल नापसंती व्यक्त केली. ही संसद 'हंगामी' आहे. अशा संसदेला घटनादुरूस्तीचा अधिकार आहे का, असाही खोचक प्रश्न विचारला. लवकरच सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. अशा स्थितीत घाई करण्याची काय गरज आहे?

**नागरिक-शासन संबंधांत दूरगामी बदल**

देशातील अनेक नामवंतांप्रमाणे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसादांनासुद्धा काही आक्षेप होते. त्यांना 'कलम ३१ अ' टाकणे मान्य नव्हते. त्यांनी याबद्दल नेहरूंना पत्र लिहिले आणि जोपर्यंत पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत कशाला घाई करत आहात, असाही प्रश्न विचारला (पृ.१३१). नेहरू सरकार मात्र घाईत होते. त्यांनी या सर्व टीकेकडे दुर्लक्ष करत घटनादुरूस्ती करण्याचे नक्की केले. अशा स्थितीत १० मे १९५१ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाचा जमीनदारी निर्मुलन कायद्याबद्दल निर्णय आला. यानुसार हा कायदा बेकायदेशीर नसून सरकारला असं करण्याचा हक्क आहे. हा निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या सर्व न्यायमूर्तींनी एकमताने दिला होता. मुख्यमंत्री गोविंद वल्लभ पंत यांच्या सरकारने जल्लोष केला. या निर्णयामुळे मात्र नेहरू सरकार वेगळ्याच अडचणीत आले. घटनादुरूस्ती न करतासुद्धा जमीदारी निर्मुलन करता येते हे अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाने सिद्ध झाले. मग आता घटनादुरूस्तीची काय गरज, असा प्रश्न उपस्थित झाला. तरीही १२ मे १९५१ रोजी नेहरूंनी घटनादुरुस्ती विधेयक संसदेत मांडले. राज्यघटना लागू झाल्यानंतर अवघ्या पंधरा महिन्यांच्या आत दुरूस्ती करावी लागत होती. यातील दुरूस्तींचा अभ्यास केल्यानंतर प्रचंड टीका सुरू झाली. कलकत्याच्या 'द स्टेटसमन' ने 'आविष्कार स्वातंत्र्यावर गदा' असे घणाघाती संपादकीय लिहिले (पृ.१३६). 'लाहोर कट खटल्यात' शहीद भगतसिंगांची बाजू मांडलेले नामवंत वकील पी.एन. मेहता यांनी 'या सरकारला आविष्कार स्वातंत्र्याची भीती वाटते' असे म्हटले होते.

लेखकाच्या मते, या दुरूस्तीमुळे भारतातील 'नागरिक आणि शासन' यांच्यातील संबंधांत दूरगामी बदल झाले. याबद्दल होत असलेल्या चर्चेला पंतप्रधानांनी १६ मे १९५१ रोजी उत्तर दिले. नेहरू सलगपणे ७५ मिनिटं बोलत होते. लेखक कुत्सितपणे नमूद करतो, की नेहरूंनी जगासमोर असलेल्या आव्हानांचा उल्लेख केला खरा, पण ही आव्हानं कोणती आहेत याचे तपशील दिले नाहीत (पृ.१४०). नेहरूंनी वृत्तपत्रांवरही कडक टीका केली. मुख्य म्हणजे, घटनेत या दुरूस्त्या केल्या नाहीत, तर घटनेचा मूळ हेतू प्रत्यक्षात आणताच येणार नाही, असंही ठासून सांगितलं. अपेक्षेप्रमाणे विरोधकांनी नेहरूंवर जबरदस्त हल्ला चढवला. अनौपचारिक विरोधी पक्षनेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी नेहरू सरकार घटनेचा चेहरामोहरा मुळातून बदलत आहे, असा आरोप केला. आहे त्या अधिकारांत सरकारला प्रशासन चालवता येत नाही. म्हणून घटनादुरूस्ती करून अधिक अधिकार मिळवणं, हा खरा घटनादुरूस्तीचा हेतू आहे. राष्ट्रपतींनी जो मुद्दा मांडला होता तोच मुखर्जींनीसुद्धा मांडला. ते म्हणाले, न्यायपालिका जमीनदारी निर्मुलनाला नकार देत नाही तर मग घटनादुरूस्तीची गरजच काय? या सर्व टिकेत घटनेत टाकावयाचे 'नववे परिशिष्ट' वादग्रस्त ठरले. संसदेने संमत केलेला प्रत्येक कायदा जर नागरिकांवर बंधनकारक ठरणार असेल तर घटनेची गरजच काय?

## *नाराज असूनही राष्ट्रपतींची स्वाक्षरी*

*देशातील अनेक नामवंतांप्रमाणे राष्ट्रपतीसुद्धा या दुरूस्तीबद्दल नाराज होते. त्यांनी अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांना पत्र लिहून मनातलं शल्य व्यक्त केलं. ते लिहितात, 'कलम ३६८ नुसार घटनादुरूस्तीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहात २/३ बहुमत असावं लागतं. आज तर देशात फक्त लोकसभा आहे, राज्यसभा नाही. अशा स्थितीत घटनादुरूस्ती करता येते का? अशा प्रकारे केलेली दुरूस्ती अवैध नाही का?' (पृ. १९०). लेखक नमूद करतो, की या पत्राला अल्लादींनी दिलेलं उत्तर उपलब्ध नाही. अशा शंका मनात असूनही राष्ट्रपतींनी १८ जून रोजी घटनादुरूस्तीवर स्वाक्षरी केली. अपेक्षेप्रमाणे या दुरूस्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ५ ऑक्टोबर १९५१ रोजी आला. सर्वोच्च न्यायालयाने पहिली घटनादुरूस्ती वैध असल्याचा निर्णय दिला.*

नवव्या परिशिष्टाद्धारे संसदेने केलेल्या चुकीच्या कायद्याच्या विरूद्ध दाद मागण्याचं स्वातंत्र्य तुम्ही हिरावून घेत आहात. लेखक दाखवून देतो, की मुखर्जींचे भाषण संपले तेव्हा किती तरी वेळ टाळ्या वाजत होत्या. टाळ्या वाजवणाऱ्यांत काँग्रेसचे अनेक खासदार होते (पृ.१४६). काँग्रेसच्या खासदारांनीसुद्धा घटनेत 'न्याय्य' हा शब्द असावा, अशी मागणी केली.

**काँग्रेस खासदारांच्या मागणीने नेहरूंना धक्का**

लेखक दाखवून देतो, की लोकसभेत आणि लोकसभेच्या बाहेर या घटनादुरूस्तीवर जबरदस्त टीका होत होती. २३ मे १९५१ रोजी काँग्रेस संसदीय मंडळाची बैठक झाली तेव्हा तब्बल ७७ खासदारांनी नेहरूंना निवेदन दिले आणि या घटनादुरूस्तीवर पक्षादेशाचा विचार न करता मतदान करण्याची मुभा मागितली (पृ.१५९). नेहरूंना प्रचंड धक्का बसला. अवघ्या तीनच दिवसांपूर्वी म्हणजे २० मे रोजी नेहरूंच्या घटनादुरूस्तीला एकमुखी पाठिंबा होता आणि आता ७७ खासदारांचे निवेदन! मंत्रिमंडळातसुद्धा अनेक मंत्र्यांना वाटायला लागले होते, की घटनादुरूस्तीत 'न्याय्य' हा शब्द असला पाहिजे. पक्षात झालेला बदल लक्षात घेत नेहरूंनी 'न्याय्य' शब्द टाकण्याचे ठरवले.

दुसरीकडे, मद्रास प्रांतातून नेहरूंवर दबाव येत होता. कुठल्याही परिस्थितीत 'आरक्षण' टिकवलेच पाहिजे, अशी मद्रासच्या नेत्यांची अपेक्षा होती. त्यासाठी सध्याचे कलम २९ जे अडथळे आणत आहे ते काढण्यासाठी घटनादुरूस्तीत योग्य ते कलम टाकावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. या सर्वांचा विचार करून २५ मे १९५१ रोजी घटनादुरूस्तीचा सुधारित प्रस्ताव तयार झाला (पृ.१६४). नेहरूंनी २९ मे रोजी हा सुधारित प्रस्ताव लोकसभेत सादर केला. पुढचे दोन दिवस म्हणजे ३० मे आणि ३१ मे रोजी लोकसभेत यावर जबरदस्त आणि वादळी चर्चा झाली. नववे परिशिष्ट निर्माण करणाऱ्या कलम '३१ ब' वर कडक टीका झाली (पृ.१८२). शेवटी घटनादुरूस्तीवर मतदान घेण्यात आलं. ही दुरूस्ती २२८ विरूद्ध २० मतांनी संमत झाली. जवळजवळ पन्नास खासदार अनुपस्थित राहिले (पृ.१८५).

### घटनादुरूस्तीच्या परिणामांची चर्चा

लेखकाने सातव्या प्रकरणात या दुरूस्तीच्या परिणामांची चर्चा केली आहे. देशातील अनेक नामवंतांप्रमाणे राष्ट्रपतीसुद्धा या दुरूस्तीबद्दल नाराज होते. त्यांनी अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांना पत्र लिहून मनातलं शल्य व्यक्त केलं. ते लिहितात, 'कलम ३६८ नुसार घटनादुरूस्तीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहात २/३ बहुमत असावं लागतं. आज तर देशात फक्त लोकसभा आहे, राज्यसभा नाही. अशा स्थितीत घटनादुरूस्ती करता येते का? अशा प्रकारे केलेली दुरूस्ती अवैध नाही का?' (पृ. १९०). लेखक नमूद करतो, की या पत्राला अल्लादींनी दिलेलं उत्तर उपलब्ध नाही. अशा शंका मनात असूनही राष्ट्रपतींनी १८ जून रोजी घटनादुरूस्तीवर स्वाक्षरी केली. अपेक्षेप्रमाणे या दुरूस्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ५ ऑक्टोबर १९५१ रोजी आला. सर्वोच्च न्यायालयाने पहिली घटनादुरूस्ती वैध असल्याचा निर्णय दिला. याचे अनेक परिणाम झाले. कलम '१२४ अ' आणि '१५३ अ' योग्य असल्याचे मान्य झाले. लोकसभेने ताबडतोब 'द प्रेस (ऑब्जक्शनेबल मॅटर) ॲक्ट' संमत केला आणि वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचा संकोच केला. शिवाय नववे परिशिष्ट आले. यात सरकार आता असे कायदे टाकू शकत होते ज्यांना न्यायपालिकेत आव्हान दिले जाऊ नये, असे सरकारला वाटत होते. कलम १५ आणि कलम २९ ची व्याप्ती कमी करण्यात आली. यामुळे आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला. आरक्षणासाठी 'आर्थिक मागासलेपणा' हा निकष काढून टाकल्यामुळे आरक्षण फक्त 'जात', 'धर्म 'वगैरेंच्या आधारेच मिळेल हे स्पष्ट झाले. (१९९० पासून यात बदल करावा, अशी देशाच्या अनेक भागातून मागणी होत आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील मराठा आरक्षण). लेखक प्रांजळपणे नमूद करतो, की या घटनादुरूस्तीने सरकारला भरपूर अधिकार जरी मिळाले तरी नेहरू सरकारने त्यांचा फारसा गैरवापर केला नाही. नंतरच्या सरकारांबद्दल मात्र असं म्हणता येत नाही. आज कलम '१२४ अ' चा किती गैरवापर सुरू आहे, हे आपल्याला दररोज दिसत असते.

लेखक नमूद करतो, की पहिल्या घटनादुरुस्तीने एक अनिष्ट पायंडा पाडला. जेव्हा जेव्हा सरकारला राज्यघटनेचा अडथळा वाटेल तेव्हा तेव्हा ती बदलून सत्तारूढ पक्षाच्या सोयीने घटनेत बदल करायचा. या पायंड्याचा वापर करूनच नंतर श्रीमती इंदिरा गांधींनी अनेकदा घटनादुरूस्ती केली (पृ.१९७). लेखक जरी नमूद करत नसला तरी पहिल्या दुरूस्तीइतकीच १९७६ साली झालेली ४२ वी घटनादुरुस्तीही वादग्रस्त ठरली होती. लेखक पुढे दाखवून देतो, की असं असलं तरी न्यायपालिकेने नंतरच्या काही निर्णयातून पुन्हा एकदा तोल सांभाळण्याचा प्रयत्न केला. या संदर्भातील लक्षणीय घटना म्हणजे १९७३ साली दिलेला केशवानंद भारती खटल्यातला निर्णय आणि त्याद्वारे रूढ झालेली 'राज्यघटनेचा मूलभूत आराखडा' ही संकल्पना. त्यानंतरचा अतिशय महत्त्वाचा निर्णय म्हणजे २००७ साली 'आय आर कोयलो विरूद्ध तामिळनाडू सरकार' या खटल्यातला निर्णय. या



### बाबासाहेबांवर आरोप

*लेखकाने सहाव्या प्रकरणात पुढे झालेल्या अभूतपूर्व वादा-वादीचे तपशील दिले आहेत. १५ मे १९५१ रोजी सभापती मावळणकरांनी एका पत्राद्वारे नेहरूंना या दुरूस्तीबद्दल त्यांच्या मनातील आक्षेप कळवले. इतर अनेक मान्यवरांप्रमाणेच त्यांनासुद्धा दुरूस्तीची गरज नाही, असंच वाटतं होतं. इतर अनेक खासदारांनी आरोप केला, की काँग्रेसला निवडणुका जिंकायच्या आहेत म्हणून घटनादुरूस्तीची घाई केली जात आहे (पृ.१५०). नंतर कायदामंत्री असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दोन तास भाषण करून दुरूस्तीचे समर्थन केले. संसदेत अशी जबरदस्त वादावादी सुरू असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आचार्य कृपलानी यांनी पक्षाचा राजीनामा दिला. त्यांनी बिगर-काँग्रेस राजकीय शक्तींना एका झेंड्याखाली आणण्याचा इरादा जाहीर केला.*

*२० मे १९५१ रोजी देशातील बारा महत्त्वाचे आणि ज्येष्ठ पत्रकार नेहरूंना भेटले आणि आविष्कार स्वातंत्र्यावर लादण्यात येणाऱ्या निर्बंधांबद्दल काळजी व्यक्त केली (पृ.१५३). सुप्रिम कोर्ट बार असोसिएशननेसुद्धा घटनादुरूस्तीवर टीका केली. पत्रकारांनी घटनादुरूस्तीच्या विरोधात आघाडी उघडली होती. शेवटी नेहरूंनी 'हिंदुस्तान टाईम्स' चे देवदास गांधी (महात्माजींचे सर्वात धाकटे सुपुत्र), 'इंडियन एक्सप्रेस'चे रामनाथ गोएंका आणि 'द हिंदू'चे शिवा राव यांना चर्चेसाठी आमंत्रित केले. त्यांनी 'या घटनादुरूस्तीत 'वृत्तपत्र स्वातंत्र्य'साठी खास तरतूद करण्याची मागणी केली. अशी तरतूद अमेरिकन घटनेत आहे. 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या कायदाविषयक लेखन करणाऱ्या पत्रकाराने तर बाबासाहेबांवर 'बौद्धिक अप्रामाणिकपणाचा' आरोप केला. यासाठी त्याने बाबासाहेबांनी घटनासमितीत केलेले मोठे भाषणच छापलं (पृ.१५७). बाबासाहेबांनी १९४८ साली घटनासमितीत केलेले भाषण आणि आता लोकसभेत केलेले भाषण यात विसंगती नक्कीच होत्या. पण लेखक हे नमूद करत नाही, तेव्हा घटना बनवत होती आणि मे १९५१ मध्ये घटना लागू होऊन जवळ-जवळ पंधरा महिने झालेले होते. घटना लागू केल्यानंतर काय समस्या समोर आल्या आहेत, हे बाबासाहेबांना दिसत होते.*

निर्णयाने सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने एकमताने निर्णय दिला, की नवव्या परिशिष्टालासुद्धा 'न्यायालयीन पुनर्विलोकन' हे तत्त्व लागू होते (पृ.२०१). जुलै २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती एन.व्ही. रमणा यांनी 'प्रजासत्ताक भारतात अजूनही कलम १२४ अ' ची गरज आहे का', असा प्रश्न उपस्थित केला.

पहिल्या घटनादुरूस्तीला पाठिंबा देणाऱ्या राजगोपालाचारी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लवकरच नेहरू सरकारबद्दल कसा भ्रमनिरास झाला, हे लेखकाने पुराव्यानिशी दिले आहे. 'सरकारला असे अधिकार हवेत' असं म्हणणारे राजगोपालाचारी यांनी 'देशात व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होत आहे' म्हणत ४ जून १९५९ रोजी उजव्या विचारांना वाहिलेला 'स्वतंत्र पक्ष' स्थापन केला. जमीनदारी निर्मुलन कायद्याचे समर्थन केलेल्या बाबासाहेबांनी १९५२ साली उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यातील जमीनदारांची 'स्टेट ऑफ बिहार विरूद्ध राजा कामेश्वरसिंग' या खटल्यात बाजू मांडली (पृ २०३). बाबासाहेबांना हिंदू कोड बिलावरून कॉंग्रेसच्या बहुसंख्य नेत्यांची मानसिकता कशी आहे, याचा अंदाज आला होता. म्हणूनच त्यांनी ऑक्टोबर १९५१ मध्ये राजीनामा दिला होता.

**लेखकाची चिंतनीय निरीक्षणं**

सिक्स्टीन स्टॉर्मी डेज या महत्त्वपूर्ण पुस्तकाच्या शेवटच्या टप्प्यात लेखकाने काही चिंतनीय निरीक्षणं मांडली आहेत. लेखक नमूद करतो, की सुरुवातीपासून कॉंग्रेसला वाटायचं की ते सर्व देशाच्या वतीने बोलत आहेत. तसं पाहिलं तर देशात नेहमीच अनेक दृष्टिकोन होते. गांधीजींचा दृष्टिकोन, पंडित नेहरूंचा दृष्टिकोन, बाबासाहेबांचा दृष्टिकोन, डाव्यांचा दृष्टिकोन आणि उजव्यांचा दृष्टिकोन. परिणामी देशात सुरुवातीपासून एक प्रकारचा वैचारिक गोंधळ दिसत होता (पृ.२०४). लेखक दाखवून देतो, की ज्या कॉंग्रेसने चळवळी, सत्याग्रह, उपोषणं, जेल भरो वगैरेंसारखी आंदोलनं करून स्वातंत्र्य मिळवलं; त्याच कॉंग्रेसला सत्ता आल्यावर याच प्रकारे केलेल्या जनआंदोलनांचा सामना करावा लागला. म्हणून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री गोविंद वल्लभ पंत २३ सप्टेंबर १९४९ रोजी मथुरा येथे जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात म्हणाले होते, 'ब्रिटिश सरकारच्या विरोधात केलेल्या लढायांप्रमाणे आता लढे करण्याची गरज नाही, हे तुमचे सरकार आहे. या सरकारवर जाहीरपणे ऊठसूट टीका करणे योग्य नाही'. लेखकाच्या मते, भारतात खरा उदारमतवाद २६ जानेवारी १९५० ते १८ जून १९५१ एवढाच काळ होता (पृ.२०५). १८ जून रोजी पहिली घटनादुरूस्ती आली आणि तो काळ संपला! या मुद्यावर पुस्तक संपते. लेखकाने पुढे परिशिष्टे जोडली आहेत, ज्यात मूळ रुपातील कलम १५, १९, ३१ आणि नंतर पहिल्या दुरूस्तीने त्यात केलेले बदल दिले आहेत. यामुळे अभ्यासकांची मोठी सोय झाली आहे.

**मांडणीवर मतभेद**

लेखकाच्या या मांडणीबद्दल अनेक ठिकाणी मतभेद आहेत. पहिली घटनादुरूस्ती झाली नसती तर नंतर घटनेत झालेले सकारात्मक बदल झाले असते का, याचा विचार झाला पाहिजे. अमेरिकेतही घटना लागू केल्यानंतर लगेचच एक नाही, दोन नाही तर तब्बल दहा दुरूस्त्या कराव्या लागल्या होत्या. अमेरिका काय किंवा भारत काय, या देशांतील सामाजिक, आर्थिक वास्तव नेहमीच गुंतागुंतीचे होते आणि आजही आहे. अशा स्थितीत भारतीय राज्यघटनेत अधूनमधून दुरूस्ती करणे आवश्यक ठरते. याचा फार बाऊ करू नये. भारतीय राज्यघटनेत तर आजपर्यंत शंभरपेक्षा जास्त दुरूस्त्या झालेल्या आहेत. हे एकप्रकारे अपरिहार्य आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यावर पंडित नेहरूंनी १९५० साली 'नियोजन आयोग' स्थापन केला, 'योजनाबद्ध आर्थिक विकास' हे प्रारूप स्वीकारले. याबद्दल तेव्हा, नंतर आणि अगदी आजही त्यांच्यावर 'मुक्त बाजारपेठ' हे तत्त्व प्रमाण मानणारे अभ्यासक कडवट टीका करतात. पण तेव्हाच्या भारतीय उद्योगांची अवस्था इतकी बाल्यावस्थेत होती, की जर अशा प्रकारे त्यांना संरक्षण प्रोटेक्शनिझम दिले नसते तर भारतीय उद्योग वाढलेच नसते. तेव्हाची बजाज स्कूटर, तेव्हाची अँबॅसॅडर कार जागतिक बाजारपेठेचा सामना करूच शकले नसते. तेव्हा जर नेहरूंनी आर्थिक धोरण स्वीकारले नसते तर भारतीय उद्योग कधीही सावरला नसता. हे मान्य, की हे संरक्षण गरजेपेक्षा जास्त काळ सुरू राहिले. शेवटी १९९१ साली नरसिंहराव यांनी अर्थव्यवस्था खुली केली. दर्जेदार आणि स्वस्त परदेशी वस्तूंनी भारतीय बाजारपेठ गजबजली. बघता बघता अनेक भारतीय कंपन्या बंद पडल्या. आज बाजारात एकही भारतीय बनावटीचा टीव्ही सेट नाही! जे १९९० च्या दशकात झाले, तेच १९५० च्या दशकात झाले असते.

नेमका हाच मुद्दा पहिल्या घटनादुरूस्तीच्या वेळीही होता. रांगणाऱ्या भारतीय प्रजासत्ताकाला, ज्याने नुकतीच देशाची रक्तरंजित फाळणी पचवली होती, ज्याला शेकडो निर्वासितांचे पुनर्वसन करायचे होते, त्या प्रजासत्ताकाच्या नागरिकांना एवढे व्यक्तिस्वातंत्र्य देणे योग्य आहे का, हा मुद्दा आणि जमीनदारी संपवायची कशी, त्यांना गलेलठ्ठ नुकसानभरपाई द्यायची कुठून, हे मुद्दे तेव्हा महत्त्वाचे होते. म्हणून काही मूठभर लोकांच्या तक्रारी वगळता इतरांनी आणि खुद्द सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा पहिल्या घटनादुरूस्तीला हिरवा कंदील दाखवला. लेखकाने हे मुद्दे विचारात घेतले नाहीत. एरव्ही पाटणा उच्च न्यायालय आणि अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालपत्रातील मोठमोठे उतारे देणाऱ्या त्रिपूरदमन सिंगांनी ५ ऑक्टोबर १९५१ रोजी आलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची तपशिलात जाऊन चर्चा केलेली नाही. मात्र यामुळे त्रिपूरदमन सिंग (जन्मः१९८८) यांच्या पुस्तकाचे महत्त्व यत्किंचितही कमी होत नाही. त्यांचे पुस्तक अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठातून पीएचडी मिळवली आहे. त्यांचे आधीचे 'इम्पिरियल सॉवरेनेटी अँड लोकल पॉलिटिक्स' हे पुस्तक इंग्लंडमधील 'केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस' या नामवंत प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे. त्यांचे पहिल्या घटनादुरूस्तीबद्दलचे हे पुस्तक अभ्यासपूर्ण आहे. या पुस्तकाने पहिल्या घटनादुरूस्तीबद्दल इत्यंभूत माहिती उपलब्ध झाली आहे. अशीच अभ्यासपूर्ण पुस्तकं १९७६ साली झालेल्या आणि प्रचंड वादग्रस्त ठरलेल्या ४२ व्या घटनादुरूस्तीबद्दलही उपलब्ध आहेत. त्यांच्याबद्दल नंतर कधी. **(समाप्त)**

**(लेखक राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत)**

**पुस्तकाचे नाव : सिक्सटीन स्टॉर्मी डेज (द स्टोरी ऑफ द फस्ट अमेंडमेंट टू द कॉंस्टिटयुशन ऑफ इंडिया)**

**लेखक : त्रिपूरदमन सिंग**

**प्रकाशक : पेंग्वीन रँडम हाऊस इंडिया**

**प्रकाशन वर्ष : २०२०, पृष्ठसंख्या : २८८**

# धर्म अन् जातीच्या गणितावरील निवडणुका

*उत्तर प्रदेशसह पाच राज्यांतील निवडणुका धर्म आणि जातीच्या गणितावर लढवल्या जात आहेत. उत्तर प्रदेशात काही दिग्गजांनी भाजपला सोडचिठ्ठी दिल्यामुळे तेथे पक्षाची स्थिती सावरण्याचे प्रयत्न होत असतानाच योगी सरकारवरील जनतेची नाराजी प्रचाराद्वारे मांडून समाजवादी पक्षाचे नेते मतदारांना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. गोव्यातही भाजप सोडून अनेकजण अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असल्यामुळे तेथील लढतीचे चित्र अजूनही स्पष्ट नाही. पंजाबमध्ये मात्र आप आणि काँग्रेसमध्ये थेट लढतीची शक्यता दिसते आहे.*

**भास्कर नाशिककर**



सारया देशावर ओमायक्रॉनची छाया पडू लागली असताना, देशाच्या निवडणूक आयोगाने उत्तर प्रदेश या सगळ्यांत मोठ्या राज्यासह उत्तराखंड, पंजाब, मणिपूर आणि गोवा या राज्यांच्या विधानसभा निवडणुका जाहीर केल्या आणि राजकीय वातावरण तापू लागले. तसे तर निवडणूक जाहीर होण्याआधी महिनाभर सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने या निवडणुकीसाठी वातावरण पुरते तापवले होते.

**समाजमाध्यमांतून प्रचारावर भर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सातत्याने उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि मणिपूरचे दौरे करून उद्घाटने आणि भूमिपूजनाचा धडाका लावला होता. काशी विश्वनाथ कॉरिडॉर, अयोध्येतील राममंदिर, शरयू नहार प्रकल्प, चारधाम महामार्ग अशा उपक्रमांनी लोकानुनयी आणि विशेषतः समाजातील बहुसंख्यांकांच्या मुद्यांना आणि भावनेला हात घालत राजकारण तापवले आहे. या निवडणुकीत भाजपचे धोरण हे बहुसंख्यांक हिंदू तसेच जातीय गणितांवर भर देण्याचे आहे. विशेषतः बहुसंख्याकांचे तारणहार केवळ आपणच आहोत, असे दाखवून देण्यात सध्या तरी भाजप आघाडीवर आहे. विरोधकांना त्यांचे विरोधक, अल्पसंख्यांकधार्जिणे आहेत, असे पटवून देणे चालवले आहे. थोडक्यात, ही निवडणूक एका अर्थाने, टोकदार धर्म, जातीच्या भेदावर लढली जात आहे. त्यास गेल्या काही दिवसांत झालेल्या धर्मसंसद आणि भडकावू भाषणांची किनार आहे. आणखी महत्त्वाची बाब म्हणजे, कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत होणाऱ्या या निवडणुकीच्या थेट प्रचारावर अनेक निर्बंध आहेत. आयोगाने तिसऱ्यांदा कडक निर्बंध कायम ठेवल्याने प्रचार कसा करायचा, मतदारांवर प्रभाव टाकणे आणि त्यांच्यापर्यंत पोहोचणे अवघड झाले आहे. त्यामुळे यूट्यूब, फेसबुक, व्हॉट्सअप ग्रुप, ट्विटर, इनस्टाग्राम, टेलिग्राम या सोशल मिडियाद्वारे, तसेच एलईडी, एलसीडी व्हॅनद्वारे अत्याधुनिक प्रचार यंत्रणा राबवावी लागत आहे. अर्थात, साधने आणि निधीने सर्वात संपन्न असलेल्या भाजपने यात बाजी मारली आहे.

**शेतकरी आंदोलन प्रभाव दाखवेल**

निवडणुकीवर प्रभाव टाकणारा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, शेतकऱ्यांनी तीन कृषी कायदे मागे घेण्यासाठी केलेले आंदोलन. विशेषतः उत्तर प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंड राज्यांतील निवडणुकीत त्याचे पडसाद उमटू शकतात. निवडणूक होणाऱ्या राज्यांमध्ये पंजाब वगळता सगळीकडे भाजपची सत्ता आहे. साहजिकच या पक्षातून उमेदवारी न मिळालेले अनेक इच्छुक पक्षाला रामराम ठोकून विरोधकांना जाऊन मिळत आहेत, त्यांच्यातर्फे रिंगणात उतरत आहेत. ही बंडखोरीची लाट कितपत प्रभावी ठरते, हे निकालात दिसेलच. पण विजयी होण्याची क्षमता हा निकष लावून उमेदवारी दिल्याने अनेक

प्रस्थापित सत्तेच्या शर्यतीतून बाद होत आहेत. त्यांचा असलेला प्रभावही भाजप दुर्लक्षित करत असल्याने त्याचा फटका बसू शकतो. विशेषतः उत्तर प्रदेशात विद्यमान आठ मंत्र्यांसह काही आमदार भाजपमधून समाजवादी पक्षात गेले आहेत. गोव्यात माजी मुख्यमंत्री पार्सेकर यांच्यासह गोव्यात भाजपचा विस्तार करणारे माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांचा मुलगा उत्पलने भाजपला रामराम ठोकला आहे. या पार्श्वभूमीवर २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीआधी होणारी ही निवडणूक देशाच्या राजकारणाची दिशा ठरवेल, हेच खरे.

**उत्तर प्रदेशातील मतदार योगींवर नाराज**

४०३ सदस्यसंख्येच्या उत्तर प्रदेशात सोच इमानदार, काम दमदार, डबल इंजिन, उप-योगी अशा घोषणांचा पाऊस पाडत भाजप निवडणुकीला सामोरा जात आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सरकारच्या कामगिरीचे पक्षाने गेले वर्ष-दीड वर्षे जोरदार मार्केटिंग केले, मंत्रिमंडळ विस्तारातून जातीपातीचे गणित साधले. लव्ह जिहाद, विविध शहरांचे नामांतर, लोकसंख्या नियंत्रणाच्या कायद्याद्वारे अल्पसंख्याकांना लक्ष्य करणे, धार्मिक उपक्रमांद्वारे बहुसंख्यांकांवर छाप पाडणे, कायदा आणि सुव्यवस्थेच्या नावाखाली सीएए, एनआरसी, तसेच शेतकरी आंदोलकांवर उगारलेला बडगा या गोष्टी जनतेवर कितपत प्रभाव पाडतील, हे पाहावे लागेल.

माजी मुख्यमंत्री आणि समाजवादी पक्षाचे सर्वेसर्वा अखिलेश यादव हे योगींच्या विरोधात पूर्ण ताकदीनिशी उतरले आहेत. 'यूपीका हैं जनादेश, आ रहें हैं अखिलेश'या घोषणेद्वारे मतदारांना आवाहन करणे चालवले आहे. योगींवर नाराज असलेला घटक मोठ्या संख्येने आहे. राज्यातील राजकारण हे विविध जातींच्या नेत्यांवर चालते. योगी हे ठाकूर तर अखिलेश यादव आहेत. दोन्हीही प्रभावी समाजघटक आहेत. अखिलेश यांनी यादव (११.४२ टक्के) आणि मौर्य, कुर्मी काची, निषाद, लोध, कुंभार या ३५ टक्के यादवेतर ओबीसी समाजाची मोट बांधली आहे. जातीवर आधारित पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना आपल्या गोटात आणले आहे. माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांचे नातू जयंत चौधरी यांच्या राष्ट्रीय लोकदलाशी त्यांनी मोट बांधली आहे. राज्यात ब्राह्मण मते १० टक्के असून, ती निर्णायक ठरत असल्याचे आतापर्यंतच्या निकालातून दिसून आले आहे. गेल्या काही वर्षांत भाजपचा पाया त्यामुळेच मजबूत झाला आहे. त्यामुळेच लखीमपूर खेरी येथील शेतकरी आंदोलन उधळून लावणाऱ्या केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांच्या मुलावर कारवाईला विलंब केला गेला. जनमताचा रेटा वाढला तेव्हा त्याला अटक केली गेली. शेतकरी आंदोलनाने जाट आणि मुस्लिम पुन्हा एकत्र आले आहेत. त्यांच्यातील दुराव्याचा परिणाम, २०१४ किंवा २०१७ आणि २०१९ च्या निवडणुकीवर दिसला होता. त्याचा फटकाही भाजपला बसू शकतो, असे दिसते.

**काँग्रेसची मदार प्रियंका गांधींवर**

काँग्रेसने पक्षाच्या सरचिटणीस आणि स्टार प्रचारक प्रियंका गांधी यांच्या नेतृत्वाखाली जनमत आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न चालवले आहेत. 'लडकी हूँ, लड सकती हूँ', असे सांगत स्त्रीशक्तीला आपलेसे करणे आणि त्यांना ४० टक्के उमेदवारी देण्यावर पक्षाने भर दिला आहे. राज्याच्या माजी मुख्यमंत्री आणि बहुजन समाज पक्षाच्या नेत्या मायावती यांच्या हत्तीची गती यावेळी निवडणुकीच्या रणांगणात काहीशी मंदावलेली दिसत आहे. युवक नेते चंद्रशेखर आझाद (भीम आर्मी) यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याविरोधात गोरखपूरमधून उतरायचे ठरवले आहे, तर अखिलेश यादव हे पहिल्यांदा मैनपुरी या आपल्या बालेकिल्ल्यातील करहर मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. शिवाय, समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षाने ब्राह्मण मतांना आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न चालवले आहेत. योगींपासून हा वर्ग काहीसा दुखावला गेला आहे. स्वामी प्रसाद मौर्य, दारासिंग चौहान, धरमसिंग सैनी यांच्यासह आठ मंत्री भाजप सोडून समाजवादी पक्षात गेले आहेत, तर अखिलेश यादव यांच्या भावजय आणि मुलायमसिंग यांच्या स्नुषा अपर्णा यादव यांच्यासह अनेक जण भाजपवासी झाले आहेत. त्यामुळे पक्षांतराचा लाभ कोणत्या पक्षाला कितपत मिळेल, हे पाहणे मजेदार ठरेल.

**उत्तराखंडात काँग्रेसमध्ये चैतन्य**

देवभूमी उत्तराखंड गेले वर्षभर गाजले ते सहा महिन्यांत भाजपने दिलेल्या तीन मुख्यमंत्र्यांमुळे. त्रिवेंद्रसिंग रावत यांच्या जागी आलेल्या तिरथ रावतांची कारकीर्द अल्पकालीन आणि वादग्रस्त ठरली. मुलींनी जीन्स वापरण्याविषयी आणि कुंभमेळ्याच्या काळातील केलेल्या वादग्रस्त विधानामुळे आणि कोरोना चाचणीतील गैरव्यवहारामुळे त्यांना पदावरून जावे लागले. त्यांच्या जागी पुष्कर धामी हा तरूण, अननुभवी चेहरा आला. त्यांच्या नेतृत्वाखाली सत्ताधारी भाजप निवडणुकीला सामोरा जात आहे. विजय संकल्पयात्रेने कुमाऊ, गढवाल भाजपने पिंजून काढलाय. चारधाम देवस्थान व्यवस्थापन मंडळाबाबत घेतलेला निर्णय, बद्रिनाथ, केदारनाथ, गंगोत्री येथील विकासकामे ही भाजपची जमेची बाजू असली तरी सत्ताधाऱ्यांविषयीची नाराजी, भ्रष्ट कारभार मारक ठरू शकतो. भाजपविरोधात काँग्रेसने माजी मुख्यमंत्री हरीश रावत यांच्या नेतृत्वाखाली दंड थोपटले आहेत. भाजपमधून काँग्रेसमध्ये येणाऱ्या नेत्यांची संख्या वाढत असल्याने काँग्रेसमध्ये चैतन्य पसरले आहे.

**पंजाबमध्ये आप-काँग्रेसमध्ये काट्याची लढत**

### आपचा प्रभाव कितपत?

*आम आदमी पक्षाने उत्तर प्रदेश, उत्तराखंड या दोन्हीही राज्यांत तसेच गोव्यात आपले अस्तित्व दाखवणेच नव्हे तर आव्हान देणे चालवले आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी रोजगारासह मोफत सेवासुविधा, महिलांना पेन्शन, बेरोजगारांना हात असे जाहीरनामे प्रसिद्ध केले आहेत. पंजाबात तर आम आदमी पक्षाने वादग्रस्त गायक भगवंत मान यांना मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार जाहीर केले आहे. पंजाबातील स्थानिक संस्थांच्या निवडणुकांतही या पक्षाने अस्तित्व दाखवत, जागा पटकावल्या आहेत. उत्तराखंडमध्ये 'आप'ने निवृत्त कर्नल अजय कोठयाल यांच्या नेतृत्वाखाली मोर्चेबांधणी केली आहे. आपचे रिंगणात उतरणे किती प्रभावी ठरते, कोणाची मते तो पक्ष आपल्याकडे वळवतो, हेही पाहायला लागेल.*

काही महिन्यांपूर्वीच काँग्रेसने दिग्गज नेते अमरिंदरसिंग यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवून पंजाबची सूत्रे दलित चेहरा असलेल्या चरणजितसिंग चन्नी यांच्या हाती दिली. अमरिंदरसिंग यांनी पंजाब लोक काँग्रेसच्या नावाने सवतासुभा निर्माण करत विरोधी भाजपशी हातमिळवणी केली आहे. काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत मतभेद आहेत. चन्नी यांच्या खुर्चीला नवज्योतसिंग सिद्धू हे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष कधी सुरूंग लावतील, हे सांगता येत नाही. भाजपपासून दुरावलेल्या प्रभावी अशा शिरोमणी अकाली दलाचे सुखबीरसिंग बादल हे स्वाभाविकच मुख्यमंत्रीपदाचे दावेदार आहेत. आता अकाली दल आणि भाजप एकत्र आले असले तरी त्यांची केमिस्ट्री पूर्वीसारखी जुळलेली नाही. विधानसभेच्या ११७ जागा असलेल्या या राज्यात काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यात काट्याची लढत होईल, असे सध्या तरी चित्र आहे. शेतकरी आंदोलनातील २२ संघटनांनी एकत्र येऊन संयुक्त किसान मोर्चा हा पक्ष स्थापन करून मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून भारतीय किसान युनियनचे नेते बलबीरसिंग राजेवाल यांच्या नावाची घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी पंजाबात गेले असताना, त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा शेतकरी आंदोलकांमुळे पुरता बोजवारा उडाला होता. त्याने राजकारण पेटले होते. काँग्रेसला भाजपने टीकेचे लक्ष्य केले होते. त्याचा राजकीय फायदा भाजपला होईल का, हे पाहावे लागेल.

**मणिपुरात विकासकामे भाजपला तारणार का?**

मणिपूरमध्ये विधानसभेच्या ६० जागा आहेत. सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला खिंडार पाडत, अन्य स्थानिक छोट्या पक्षांची मोट बांधत भाजपने येथे एन. बीरेनसिंग यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. सत्तेत नागा पीपल्स फ्रंट (एनपीपी), लोकजनशक्ती पार्टी (एलजेपी) यांना बरोबर घेतले आहे. आताही बीरेनसिंगांच्या नेतृत्वाखाली भाजप निवडणूक लढत आहे. येथे काँग्रेस खिळखिळी झाली आहे. तरीही रिंगणात शड्डू ठोकून उभी आहे. विद्युत प्रकल्पांसह केलेली विकासकामे ही भाजपची जमेची बाजू आहे.

उत्तर प्रदेशात सात टप्प्यांत मतदान होणार आहे. १० फेब्रुवारी रोजी ५८ जागांसाठी, १४ फेब्रुवारीस ५५, २० फेब्रुवारीस ५९, २३ फेब्रुवारीस ६०, २७ फेब्रुवारीस ६० तर ३ मार्चला २७ आणि ७ मार्चला ५४ जागांसाठी मतदान होणार आहे. पंजाबात २० फेब्रुवारीला, उत्तराखंड आणि गोव्यात १४ फेब्रुवारीला तर २७ फेब्रुवारी व ३ मार्च रोजी मणिपूरमध्ये मतदान होईल. १० मार्चला निकाल लागेल. या एकूण प्रक्रियेत कोरोनाने मोठे आव्हान उभे केले आहे. यापूर्वी बिहार, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू या राज्यांत कोरोनाकाळात मतदान झाले होते. तथापि, त्यावेळी प्रचारावर सध्याएवढी कडक बंधने नव्हती. बंगाल, केरळ, तामिळनाडूतील निवडणुकीनंतर देशात दुसरी लाट आली होती. यामुळे प्रामुख्याने सोशल मिडियावर सर्व पक्षांच्या प्रचाराची मदार आहे. भाजप, काँग्रेस, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष यांच्यासह बहुतांश पक्षांनी थेट प्रचार करता येत नसल्याने बूथ पातळीपासून ते अगदी राज्यस्तरापर्यंत मतदारांचा डाटा संकलित केला आहे. त्यांचे व्हॉट्सअप, ट्विटर, इन्स्टाग्रामचे ग्रुप बनवून त्याद्वारे पक्षांकडे प्रचारासाठी असलेली तंत्रज्ञानकुशल युवकांची फौज, नेत्यांची भाषणे, पक्षाचा अजेंडा, पक्षाची ध्येयधोरणे, जाहीरनामा अशा कितीतरी गोष्टी मतदारांपर्यंत पोहोचवत आहेत. खेड्यापाड्यात पक्षाची एलईडी, एलसीडी वाहने प्रचार करत आहेत. यामुळे धर्म, जात यांवर आधारित ही निवडणूक एका अर्थाने हायटेक बनली आहे. राजकीय पक्षांचा अजेंडा, ध्येयधोरणे काहीही असली तरी मतदारांवर कोण किती प्रभाव पाडतो, त्यांच्यापर्यंत किती पोहोचतो यावर कौल अवलंबून आहे. ●●●

**(लेखक समकालिन विषयाचे अभ्यासक आहेत)**




## *गोव्यात बेरोजगारीसह अनेक प्रश्न*

*महाराष्ट्राशेजारील गोवा सध्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या पक्षांतराने गाजत आहे. गोव्यात भाजपने काँग्रेसला सुरूंग लावत सत्ता हस्तगत केल्यानंतर मनोहर पर्रीकर संरक्षणमंत्रीपद सोडून गोव्याचे मुख्यमंत्री झाले होते. त्यांच्या अकाली निधनाने डॉ. प्रमोद सावंत मुख्यमंत्री झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजप निवडणुकीला सामोरा जात आहे. येथे शिवसेना, काँग्रेस, महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस या नेहमीच्या पक्षांशिवाय आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस हेही रिंगणात आहेत. पर्रीकर यांच्या पुत्राला उत्पलला भाजपने तिकीट नाकारल्याने त्यांनी अपक्ष रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. शिवाय, मायकेल लोबो, लक्ष्मीकांत पार्सेकर, बाबूश मोन्सेरा यांनी पक्षांतर केले आहे. येथे भाजपच्या व्यूहरचनेची धुरा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. राज्यात विधानसभेच्या ४० जागा असून घोडेबाजारासाठी हे राज्य अधिक प्रसिद्ध आहे. पर्यटन व्यवसायातील अडचणी, पर्यावरणाचे प्रश्न, खाणकाम बंद असल्याने वाढलेली बेरोजगारी हे भेडसावणारे प्रश्न आहेत. त्याची सोडवणूक कोण करणार हे महत्त्वाचे आहे.*

धर्म एक चक्रव्यूह

# भक्तिपंथ : धार्मिक स्वातंत्र्य व समतेसाठीचा संघर्ष



बी.जी. वाघ

*भक्तिसंप्रदायाचे सामाजिक व धार्मिक जीवनावर खोलवर परिणाम झाले आहेत. दया, क्षमा, शांती, सहिष्णुता ही बौद्ध धर्मातील तत्त्वे लोप पावली होती. ती भक्तिसंप्रदायाने पुनरुज्जीवित केली. मूळ ब्राह्मणी धर्माचा हेतू स्त्री-शूद्रांना गुलाम करणे हाच होता. भक्तिसंप्रदायाने मात्र स्त्री व शूद्रांना आत्मभान दिले. त्यामुळे धार्मिक जीवनात तरी या संप्रदायांनी 'समता' हे तत्त्व अधोरेखित केले.*

धर्म एक ज्ञानाचा प्रवाह आहे. कारण तो सार्वकालिक (Eternal) सत्याचा शोध घेत असतो. तो प्रवास अंत:स्फूर्तीतून, अंत:प्रेरणांतून, मनातून होत असतो. विज्ञानाचा प्रवास भौतिकाचा (Matter and Energy) आहे. अर्थात, या दोन्ही प्रवाहांनी मानवी जीवन समृद्ध केले आहे. मन जीवनातील सौंदर्य शोधते. जगण्याचे प्रयोजन मनामुळेच कळू शकते. एवढेच नव्हे, तर स्थळ, काळ या संकल्पनांचा बोध मनामुळेच आपल्याला होतो. हा प्रवास कधी कल्पनेतून सत्याकडे, तर कधी सत्याकडून कल्पनेकडे होत असतो. ताओ, बुद्ध, झेन आदी विचारधारा मनातूनच सत्याकडे झेपावत असतात. त्यामुळेच धर्म (Religion) आणि धर्मामागील अध्यात्म (Spirituality) यात फरक असतो.

### धर्माचे अध:पतन अंधभक्तांमुळे

धर्मवादी माणूस धार्मिक असेलच, असे नाही. धार्मिकतेचा संबंध प्रेमाशी, करुणेशी, सुसंस्कारांशी आहे. माणूस जे तर्कविवेकाने जाणू शकतो, ते करुणेनेही जाणू शकतो. बुद्धाने म्हटले आहे, की 'करुणेशिवाय ज्ञान व्यर्थ आहे.' धर्माचे अंतिम सत्य ईश्वरच आहे. त्याला जाणण्याचा मार्ग हृदयातूनच जातो. ईश्वर सर्वांचा आहे. तो हिंदूंचा, मुस्लिमांचा, ख्रिश्चनांचा असा वेगळा असत नाही. धर्मांध लोक उपासना पद्धतीलाच धर्म मानतात आणि मूळ धर्माचा हेतू विसरून जातात. ईश्वराकडे जाण्यासाठी शुद्ध मन आणि शुद्ध प्रेमाचीच आवश्यकता असते, हे ज्यांना कळते ते धर्मवादी नसतात, तर धार्मिक असतात. ते कधीही कट्टर असत नाहीत. अशा माणसांनीच हे जग सुंदर केले आहे. अत्यंत प्राचीन अशा यहुदी, पारशी धर्मातही माणसाने माणसाशी प्रेमाने वागावे, असेच दंडक आहेत. मोझेसच्या दहा आज्ञा (Ten Commandments) प्रसिद्ध आहेत. त्यात हिंसा, व्यभिचार, चोरी यांना सक्त मनाई आहेच; परंतु शेजाऱ्यांवर स्वत:सारखेच प्रेम



करा, हाही दंडक आहे. या दहा आज्ञा ही यहुदी, ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मांची पायाभूत तत्त्वे आहेत. धर्मदेखील मानवी बुद्धीचा, भावनांच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा आहे. धर्मांचा मानवी प्रज्ञेप्रमाणेच विकास झालेला आहे. मोझेसला त्या आज्ञा थेट ईश्वरापासून प्राप्त झालेल्या आहेत. येशू ख्रिस्त, पैगंबर, झरथ्रष्ट यांचे ज्ञानही ईश्वरीच आहे, असे समजले जाते. ती एक प्रज्ञेची उंच झेप होती, असे आपल्याला आधुनिक भाषेत म्हणता येईल. उच्चतम मानसिक अवस्थेतूनच धर्म जन्माला आले आहेत. त्यांचे अध:पतन झाले असेल ते त्यांच्या अनुयायांमुळेच किंवा अंधभक्तांमुळेच. माणसांच्या मूळ प्रेरणा निसर्गाशी सुसंवादी असतातच. त्या विकृत होतात त्या माणसातील असुरक्षितता, भय, स्वार्थ, लोभ यामुळे. श्रद्धा आणि सत्य यात संघर्ष येत असेल तर माणसाने सत्याचे अनुसरण केले पाहिजे; परंतु माणूस श्रद्धेऐवजी अंधश्रद्धेलाच चिकटून राहतो. त्यालाच तो धर्म म्हणतो. त्यातून त्याचा बौद्धिक व नैतिक विकास होत नाही.

### सहिष्णुतेचा गळा घोटला

माणसाला नीतिपूर्ण का जगावेसे वाटते आणि माणूस दुष्ट बुद्धीने का वागतो, याचे सुंदर चिंतन सेंट ऑगस्टिनच्या 'कन्फेशन'मध्ये येते. या पुस्तकाचा टॉलस्टॉयवर खूप प्रभाव होता. धर्म असे अंतर्मुख झाले पाहिजेत आणि ते काळाप्रमाणे बदललेही पाहिजेत. ते तेव्हाच बदलतील जेव्हा

ते प्रेम, करुणेच्या मार्गाने जातील आणि आपल्यातील कट्टरता दूर करून आचारविचारांनी मुक्त होतील. धर्माच्या आध्यात्मिक प्रेरणा वेगळ्या आणि ऐहिक प्रेरणा वेगळ्या असतात. त्या ऐहिक प्रेरणांपासूनही मुक्त होणे आवश्यक आहे. संघटित धर्म सत्यापेक्षा सत्तेला अधिक महत्त्व देतात. आपलाच धर्म श्रेष्ठ मानणाऱ्यांनी माणसातील सहिष्णुतेचा गळा घोटला आहे; परंतु सहिष्णुताच सखोल आध्यात्मिक जाणीव असते. प्रत्येक धर्मात एक भक्तिमार्ग आहे. तो धर्माला नाही, तर ईश्वराला मानतो. या ईश्वराचे रूप अनिश्चित असले, तरी त्यामागील प्रेरणा सत्याच्याच असतात. धर्म म्हणजे सर्वश्रेष्ठ मूल्यांची जाणीव. ही मूल्ये सामाजिक, धार्मिक, नैतिक अशा स्वरूपाची असतात. धर्माची व्याख्या अनेकांनी अनेक पद्धतींनी केली आहे. त्यावर आपण चर्चाही केली आहे. धर्माने एका अलौकिक शक्तीला मान्यता दिलेली असते. एवढेच नव्हे, तर त्या अलौकिक शक्तीनेच प्रेषितांच्या माध्यमातून धर्मग्रंथ निर्माण केले आहेत, अशीही त्यांची श्रद्धा असते. आपण त्याचे वैज्ञानिक पद्धतीने स्पष्टीकरण करू शकत नाही. आधुनिक तत्त्वज्ञानाने मात्र याची सखोल मीमांसा केलेली आहे. ईश्वर आणि धर्मदेखील माणसाची सर्वश्रेष्ठ निर्मिती आहे. गूढ वाटणाऱ्या असाधारण मानवी बुद्धीतून, सत्याच्या प्रेरणेतून ती निर्माण झालेली आहेत. अंत:स्फूर्ती (Intutional Awareness) हा ज्ञानाचा गूढ मार्ग असतो. तो तर्कविवेकाच्या शिड्या ओलांडून सत्याला स्पर्श करण्याचा प्रयत्न असतो. त्याला आपण भक्तिमार्ग म्हणूया. ती एक वेगळी जीवनदृष्टी, धर्मदृष्टी किंवा अंतर्दृष्टी असते.

**भक्तिमार्ग समजून घेणे आवश्यक**

माणूस या पृथ्वीतलावर एकाकीच असतो, असे एरिक फ्रॉमने म्हटले आहे. त्यामुळे तो सतत विश्वाशी स्वत:ला जोडण्याचा प्रयत्न करीत असतो. तो धागा प्रेमाचा असतो. प्रेम ही माणसाची भूक आहे. प्रेमाशिवाय माणूस जगू शकत नाही. हा नियम पशू-पक्ष्यांनाही लागू असतो. माणसाचा सर्वोच्च आनंद किंवा सर्वोच्च दु:खही त्याला प्रेमातूनच मिळत असते. प्रेम न मिळाल्यामुळेच माणसे भयंकर गुन्हेगार होतात, असे आढळून आले आहे. तसेच प्रेमाच्या असाधारण शक्तीतूनच गुन्हेगारही संत झालेले आहेत. याचाच अर्थ, प्रेमाचा संबंध भक्तीशी, ज्ञानाशी, सत्याशी आहे.आणि त्यांच्यातील एकत्व जाणणे म्हणजेच ईश्वर जाणणे होय. हिंदू धर्मातील (किंवा कुठल्याही धर्मातील) भक्तिमार्ग अशा तऱ्हेने समजून घेणे आवश्यक आहे.

सत्याला जाणण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यातील एक अनुभूती आहे. सत्य एखाद्या स्वयंप्रकाशी सूर्यासारखे आहे, असे बुद्धाने म्हटले आहे. काहींना अतींद्रिय अनुभवाद्वारे सत्याचा साक्षात्कार होतो; परंतु तो अनुभव तपासून पाहण्याची आवश्यकता असते. भारतात धर्म आणि अध्यात्माचा कायम बाजार भरलेला असतो. त्यामुळे सामान्य माणसाला सत्य आणि असत्यातील भेद कळणे कठीण असते. परंतु कुठलेही सत्य गूढ नसते. गूढपणा हा काही सत्याचा गुणविशेष नाही. त्याला जाणण्याच्या आपल्या पद्धती विकसित झालेल्या नसतात. म्हणून सत्य आपल्याला गूढ वाटते. सत्य प्रस्थापित विचारपद्धतीच्या पलीकडचे असते, म्हणून ते कायम नित्यनूतन व बंडखोरही असते. कारण आपल्या सर्व धारणांना, गृहीतकांना ते नकार देत असते. त्यामुळे खरा संत किंवा ज्ञानी हा विद्रोही असतोच. संतांचा प्रेममार्ग असाच विद्रोही होता. प्रेम हे तर्कशुद्ध नसते. तो भावनांचा आक्रांत असतो. मातेचे हृदय आणि संतांचे हृदय एकच असते. त्यामुळे चुकणाऱ्या मुलावर आई जसा कठोर हल्ला करते, तसा हल्ला कबीराने समाजव्यवस्थेवर, धर्मव्यवस्थेवर व धर्मातील मध्यस्थांवर केलेला आहे. जेव्हा जगावर आपण अतिशय प्रेम करतो, तेव्हा बंडच करतो. एक तर आपण क्रांतिकारक होतो किंवा संत-महात्मा होतो.

**संघर्ष निरंतर आहे**

हिंसेच्या मार्गाने जे क्रांती करू इच्छितात, त्यांना संस्थात्मक बदल हवे असतात. ते माणसाच्या जाणिवेत क्रांती घडवत नाहीत. त्यामुळे माणसाचा अंत:विकास होत नाही. प्रेमामुळे जी क्रांती घडते, त्यामध्ये माणसाच्या आत क्रांती होते. हा संघर्ष निरंतर आहे. धर्मातील ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग समजून घेताना त्यांना काही कसोटी लावली पाहिजे. पहिला प्रश्न असा आहे, की हे ज्ञान, कर्म, भक्ती सत्याशी सुसंगत आहे का? त्याला करुणेचा, प्रेमाचा स्पर्श झाला आहे का? दुसरा प्रश्न असा विचारता येईल, की त्याला मानवी हृदय आहे का? तसे जर नसेल तर ते ज्ञान, कर्म किंवा भक्तीही खोटी आहे. सत्य म्हणजे शेवटी सापशिडीचा खेळ नव्हे. तो प्रवास आहे प्रज्ञेचा, आत्मजागृतीचा. त्याला शील, करुणा, प्रेमाची जोड असायलाच हवी. धर्म हा विज्ञानाशी सुसंगत नसतो. कारण त्याचा मार्ग, पद्धती आणि हेतूच मुळात अलौकिक आहेत. सत्य हे कुठल्याही अंधश्रद्धेचे समर्थन करीत नाही किंवा नव्या अंधश्रद्धाही निर्माण करीत नाही. धर्म तसे करू शकतो. त्याचा प्रवासच एका श्रद्धेकडून दुसऱ्या श्रद्धेकडे होत असतो. सत्याचा प्रवास धोकादायक असतो. कबीराने म्हटले आहे, की हा प्रवास तलवारीच्या धारेवरून चालण्यासारखा आहे. चितेवर जिवंत जळणाऱ्या एखाद्या सतीसारखा आहे. स्त्रीचा प्रवास मृत्यूनंतर संपतो; परंतु सत्यशोधकाचा प्रवास चालूच असतो. कबीराने सती प्रथेचे समर्थन केलेले नाही; परंतु तिच्यासारख्याच तीव्र वेदना सत्यशोधकाला सोसाव्या लागतात. कबीराचा प्रवास भक्तीचा, प्रेमाचा, करुणेचा आहे. त्याचा धर्म वैदिकांचा नव्हता, तो बुद्धाचा होता. वेळप्रसंगी त्याने बुद्धाचेच तत्त्वज्ञान, तर्कविज्ञान वापरले आहे; परंतु ते भक्तिमार्गी संत होते. त्यांचे प्रेम आणि सत्य यात संघर्ष नव्हता. सत्याच्या तीव्र जागृतीबरोबरच प्रेमाच्या दिव्यदृष्टीचाही त्यांना लाभ झालेला होता. चराचरात ते प्रेम ओसंडून वाहत आहे, असा अनुभव घेणे म्हणजे भक्तीच्या सहाय्याने जगाचे ज्ञान मिळवणे होय. अर्थात, हे ज्ञान ईश्वरीच असते. त्याला विज्ञानाच्या कसोट्या लावता येत नसल्या, तरी ते सत्यच असते.

**हिंदू धर्मात स्थित्यंतरांचा अभाव**

देव आणि धर्म ही माणसाची सर्वश्रेष्ठ निर्मिती आहे. कारण त्यामुळे सत्याचे दर्शन त्याला प्रेमातच झाले. येशू ख्रिस्त म्हणतो, 'ईश्वर प्रेम आहे आणि प्रेमच ईश्वर आहे.' माणसाच्या अंत:प्रवृत्तीचीच ही आध्यात्मिक प्रक्षेपणे किंवा दर्शने आहेत. कारण या प्रवासाचा अंत म्हणजे ईश्वर आणि माणूस यातील अद्वैताचा साक्षात्कार आहे. प्रत्येक देव वा धर्मामागे काही सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक

परंपरा असतात. त्यामुळे येहुआ हा देव यहुद्यांमध्येच जन्मू शकतो. पैगंबराचा जन्म अरबांमध्ये, येशूचा जन्म पॅलेस्टाइनमध्ये. बुद्धासाठी मात्र अनुकूल भूमी भारतच होती. धर्म मूलत: सामाजिक असतो. त्यातून काही सामाजिक दंडक, मूल्ये, परंपरा जन्मतात. त्यामुळे धर्म समजून घ्यायचा असेल तर हा भौतिक विकासही समजून घ्यावा लागेल. त्या विकासाला अवरुद्ध करणारी प्रतिक्रांतीही समजून घ्यावी लागेल. प्रत्येक धर्मात आणि समाजव्यवस्थेत ती झालेली असते. ऋग्वेदापासून गीतेपर्यंत हिंदू धर्माची मूळ भूमिका बदललेली नाही. त्यामुळे त्यात धार्मिक व सामाजिक स्थित्यंतरे झालेली नाहीत. मूळ ढाचा बदललेला नाही. त्यातून निर्माण झालेली विषमतावादी मूल्ये कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग या पंथांतही आलेली आहेत. त्यांचा प्रतिकार संतांनी कसा केला, हे पाहणे महत्त्वाचे आहे. भक्तियोगाचा पाया ईश्वराप्रती विशुद्ध प्रेम हा आहे. आपण ज्याच्यावर खूप प्रेम करतो, त्याची पूजा करीत नाही. त्याच्याशी आपण भांडतो. त्याला प्रश्न विचारतो. भक्तांनी अशा अर्थाने धर्माशी वा देवाशी भांडणे केली आहेत. परंपरेशी विद्रोह केला आहे. धर्मग्रंथांचे प्रामाण्य धुडकावून लावले आहे. त्यामागे नितांत शुद्ध अशी प्रेमभावना आहे.

विश्वाची उत्पत्ती कामभावनेतून (Sex) झाली की प्रेमभावनेतून, हा मूलभूत प्रश्न आहे. त्याचा शोध प्राचीन धर्मग्रंथांत घ्यावा लागेल. ऋग्वेदात नारदीय सूत्रात म्हटले आहे, की त्याच्या मनोबीजात सर्वप्रथम काम अवतरला. त्यानेच सृष्टी निर्माण करण्याच्या इच्छेला बळ दिले. त्यातून पहिला संबंध घडला. त्याच संबंधांचा धागा खालपासून वरपर्यंत झाला. त्याचा एक भाग पुरुषतत्त्व व दुसरा भाग स्त्रीतत्त्व झाला. त्यांच्या मैथुनातूनच हे जग निर्माण झाले. स्त्री-पुरुष संबंधांतून (अ‍ॅडम-इव्ह) विश्व निर्माण झाले, ही कल्पना बायबलचीही आहे. अर्थात, ती यहुद्यांची आणि इस्लामचीही आहे. ताओ या मूळ चिनी तत्त्वधारेप्रमाणे हे जग म्हणजे यिन (स्त्री) व यांग (पुरुष) यांची निर्मिती आहे. या परस्परविरोधी घटकांच्या (नैसर्गिक प्रवाहांच्या) अंतर्गत संबंधांतूनच विश्वनिर्मिती झाली आहे. अर्थात, हा संभोग नाही. नर-मादीमध्येच संभोग होऊ शकतो; परंतु या कल्पनांमधूनच आपले धार्मिक आणि नैतिक जग विकसित झाले आहे. ऋग्वेदकाळात मुक्त स्त्री-पुरुष संभोग होत होता. संभोग कल्पनेनेच आर्य पछाडलेले होते. त्यामुळे विश्वाची निर्मिती संभोगातूनच झाली, असे त्यांना वाटणे साहजिकच होते. संभोगाला सर्व धर्म अपवित्र समजतात. त्याचा आनंद देणारी स्त्री त्यांना अध:पतीत वाटते. संभोगातून समाधीकडे जाणे हा एक प्रकार आहे. संभोगाला टाळता येत नाही, कारण ती स्त्री-पुरुषांची मूळ प्रवृत्ती आहे. त्यामुळे तिला स्वीकारायचे कसे तर तिचे आध्यात्मिकीकरण करून.

**धर्मामुळेच स्त्रीला दुय्यमत्व**

माणसाच्या शारीरिक गरजांवर आत्म्याने विजय मिळवणे म्हणजे धर्म, अशी मांडणी होऊ लागली. जेव्हा विवाहसंस्था अस्तित्वात नव्हती, तेव्हा अनिर्बंध संभोग-संबंधांना यज्ञसंस्थेशी जोडण्यात आले व एका अर्थाने संभोग करणे हा एक धार्मिक सोहळा झाला. नंतरच्या काळात योनीपूजा, लिंगपूजा करणारे धर्मसंप्रदाय निर्माण झाले. हेतू तोच. संभोगाचे किंवा कामभावनेचे आध्यात्मिकीकरण करणे. योनी हे सर्जनाचे प्रतीक आहे. अगदी सिंधू संस्कृतीतही ती देवत्वाचे प्रतीक म्हणून पुढे येते. वास्तविक, त्यातून स्त्रीत्वाचा सन्मान होणे अपेक्षित होते; परंतु तसे झालेले नाही. स्त्रीला दुय्यमत्व धर्मामुळेच आले आहे. तिचे लैंगिक स्वातंत्र्यदेखील धर्मामुळेच हिरावले गेले. मनूने स्त्रियांवर अनिर्बंध बंधने लादली. त्यामुळे पुढील हजार वर्षे तरी भारतातील हिंदू स्त्रियांना डोके वर काढता आले नाही. तीच गोष्ट इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मियांत कमी-अधिक प्रमाणात घडून आली. याचे एकमेव कारण स्त्रियांच्या लैंगिक स्वातंत्र्याची पुरुषसत्ताक व्यवस्थेला वाटत असलेली धास्ती. पुरुषाने व्यभिचार केला तर तो हजार पटीने क्षम्य होता; परंतु स्त्रियांनी व्यभिचार करणे गंभीर अपराध होता. त्याला मृत्युदंड ही शिक्षा होती. तथाकथित वंशशुद्धीचे व वर्णाश्रम धर्माचे तत्त्वज्ञान यामधूनच बालविवाह, विधवांना पुनर्विवाहाचा हक्क नसणे, शिक्षणाचा, संपत्तीचा अधिकार नसणे, सती प्रथा अशा अमानवी रूढी निर्माण झाल्या. स्त्रिया इतर कनिष्ठ वर्णांशी संभोग करतील किंवा विवाह करतील. त्यामुळे वर्णव्यवस्था टिकणार नाही, याचे भय गीतेतही कृष्ण-अर्जुनाला वाटले आहे. वंश वा वर्णसंकर रोखणे हाच 'मनुस्मृती'चा मुख्य हेतू होता. त्यामुळे हिंदू स्त्री-पुरुषांमध्ये शुद्ध प्रेम कधी निर्माण होऊ शकले नाही. प्रेम व वासना यातील अंतर त्यांना कळले नाही. फ्रॉइडने कामवासनेला सर्वोच्च स्थान दिले आहे. प्रेम हे कामवासनेचे आध्यात्मिकीकरण आहे, असेही त्याने म्हटले आहे.

मार्क्सने उत्पादन साधनांच्या मालकीला अधिक महत्त्व दिले आहे. त्यातून मानवी मन वगळले आहे. त्याने शुद्ध प्रेमाची महतीही गायली आहे; परंतु माणसाचे उत्कट प्रेमच माणसातही आणि समाजातही बदल घडवू शकते, ही कल्पना त्यांना 'युटोपियन' वाटण्याची शक्यता होती. आर्थिक गरजांबरोबरच माणसाला नैतिक, बौद्धिक आणि मानसिक गरजाही असतात, हे त्यांनी लक्षात घेतले नाही. माणसाचे प्रेम त्यातून निर्माण झालेले. अध्यात्म, साहित्य, काव्य, तत्त्वज्ञान यांचा एकात्मिक अनुभव म्हणजेच जीवन आहे. ज्ञान ही यांत्रिक किंवा भौतिक प्रक्रिया नाही. ती मूलत: आध्यात्मिक प्रक्रियाच आहे. ज्या गोष्टीत सौंदर्य आहे, त्या गोष्टीत सत्यही आहे. सौंदर्य, सत्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. सुफी संत रुमीने म्हटले आहे :

**जर असेल प्रेम हृदयात**
**कडू गोष्टीही वाटतात गोड**
**आणि तांबे सोन्यासमान**
**नागीने केलेला दंश वाटतो मधूर**
**सिंह बनतात उंदरांसारखे निरुपद्रवी**
**आजार वाटतो आराम**
**संताप हवाहवासा**
**बादशहा आहेत गुलाम**
**आणि मरण पुनरुत्थान**

सुफी संतांच्या अशा अलौकिक सौंदर्याने नटलेल्या शेकडो कविता आहेत. राबिया अल बसरी हिने आपल्या कवितेत लिहिले आहे :

**जर मी करीत असेन आत्यंतिक प्रेम तुझ्यावर**
**नरकाच्या भीतीने**
**तर भस्म कर मला नरकातच**

**माझे निस्सीम प्रेम असेल स्वर्गलालसेपोटी**
**तर बंद कर स्वर्गाचे दरवाजे कायमचे माझ्यासाठी;**
**परंतु**
**जर असेल माझे प्रेम केवळ तुझ्याचसाठी**
**तर मात्र मला ठेऊ नकोस वंचित**
**तुझ्या अनंत सौंदर्यापासून**

हे अनंत सौंदर्य काय आहे, ते विज्ञानाला कळणार नाही. धर्मालाही ते कळणार नाही. ते फक्त प्रेमात आकंठ डुंबलेल्या एखाद्या कवीला, तत्त्वचिंतकाला किंवा संतालाच कळू शकेल.

प्रेम हीच धर्म आणि विज्ञानाला उल्लंघून जाणारी माणसाची आंतरिक आणि अद्‌भुत चेतना आहे. तो 'हंस अकेला' आहे, ज्याला स्थळकाळाची बंधने नाहीत. भक्तिमार्गातील या संतांचा प्रवास आश्चर्यचकित करणारा आहे. वास्तविक, त्यांचा जन्म मध्ययुगीन अंधारल्या काळात झालेला आहे. भारतात या काळात बौद्ध धर्माचा ऱ्हास झाला होता. ब्राह्मणी धर्माची स्थापना झाली होती. स्त्री, शूद्रांना शिक्षणच नाकारले गेल्यामुळे ते सत्तासंपत्तीपासूनही वंचित झाले होते. धर्म-अधर्मातला फरकच कळेनासा झाला होता. पश्चिमेतही धर्मसत्ता व राजसत्ता एकत्र आल्यामुळे धर्मनिंदेच्या आरोपाखाली लोकांना जिवंत जाळण्यात येत होते. मुस्लिमांच्या रानटी, आक्रमक टोळ्यांमुळे प्रगल्भ ग्रीक-रोमन संस्कृती लयास गेली होती. श्रद्धा (Faith) आणि विवेक (Reason) यांच्या संघर्षात विवेकाची पीछेहाट झाली होती. अंधश्रद्धेला श्रद्धा आणि विज्ञानाला चेटूक समजले जात होते. अशा या अज्ञयुगात सर्व धर्मांतील संत प्रेम व भक्तीच्या जोरावर अनैतिक धर्मसत्ता व राजसत्ता यांना आव्हान देऊ शकले, ही आश्चर्याची गोष्ट आहे. पर्शियाचे सुफी संत शायक सादी (मृत्यू : सन १२९१) लिहितात :

**All of Adam's race are members are one frame;**
**since all, at first, from the some essence came.**
**when by hard fortune one limb is oppressed,**
**The other members lose their wonted rest;**
**If thou feel'st not for others' misery,**
**A son of Adam is no name for thee...**

**संत मानवी ऐक्याचे प्रतीक**

संत हे मानवी ऐक्याचे प्रतीक राहिलेले आहेत. त्यांनी देश, धर्म, जात, वंश यांचे बंधन झुगारून दिले आहे. कारण जीवनाचा मूळ स्रोत असलेल्या ईश्वराला फक्त प्रेमाने जाणता येते, हे त्यांनी जाणले. 'धर्मग्रंथांचे पठण करून ज्ञान प्राप्त होत नाही. ते प्रेमाची अडीच अक्षरे वाचूनच प्राप्त होते', हे कबीराचे विधान एका सार्वकालिक, चिरंतन सत्याची साक्ष देते. पंडितांचा मार्ग आणि प्रतिभावंतांचा मार्ग यात मूलभूत अंतर असते. प्रतिभावंतांना पंख असतात. त्यामुळे भौतिकतेच्या मर्यादा ते सहज ओलांडू शकतात. त्यामुळेच बाउल संत लिहू शकतात :

**हे माझ्या भाऊ!**
**मी यासाठी झालो वेडा बावळा बाउल,**
**कारण मी नाही बांधलो कोणत्याही रितीरिवाजाला...**
**आणि ईश्वरासारख्या पालकालासुद्धा...**
**माझ्यासाठी आहेत वर्ज्य आणि व्यर्थ**
**माणसांनी केलेले भेदभाव...**

ही बंडखोरी प्रतिभेतूनच येते. बाउल यांनी गुरुपरंपरा नाकारली. ते गुरूसाठी 'फुन्य' (शून्य) शब्द वापरतात. शून्य म्हणजे अस्तित्वहीनता. ही बुद्धिस्ट संकल्पना आहे. आपले अस्तित्व मनाने निर्माण केलेले भ्रमजाल असते. ते अंधाराचे जाळे फिटले म्हणजे सगळीकडे प्रकाशच प्रकाश असतो. ज्ञानासाठी गुरूचीही आवश्यकता नसते. तो स्वयंशोध असतो. म्हणून बाउल संत एखाद्या ठराविक गुरूला मानत नाहीत. ते लिहितात :

**तुम्ही तुमच्या गुरूच्या वाकून पडाल पाया,**
**तो तर असतो प्रत्येक पावलावर,**
**रस्त्याच्या सर्व बाजूंनी,**
**कारण आहेत तुमचे गुरू असंख्य...**

**संतांच्या अभिव्यक्तीला मर्यादा**

गुरुपरंपरेतील बंदिस्तता सत्याला किंवा मुक्त शोधाला प्रतिरोध करू शकते. आपले सर्व संत गुरुपरंपरेतून आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीला मर्यादा पडलेल्या दिसतात. वर्णव्यवस्थेने त्यांच्यावर जे जुलूम केले आहेत, त्याचा बौद्धिक प्रतिवाद त्यांनी फारसा केलेला नाही. आपण शूद्र जातीत जन्मलो आहोत, याचे दुःख त्यांनी वारंवार व्यक्त केले आहे; परंतु त्यांनी जातिव्यवस्था धुडकावून लावली नाही. तिरुमलाई अलवार या अतिशूद्र जातीतल्या संताने लिहिले आहे :

**नाही घेतला मी जन्म द्विजापोटी,**
**नाही वाचता आले मला चार पवित्र वेद,**
**नाही मिळवला विजय मी पंचेंद्रियांवर,**
**केवळ वाचवतील मला फक्त तुझे चमकणारे पाय...**
**निराधार मी हे ईश्वरा,**
**तुझ्याशिवाय...**

ही अगतिकता, दास्य मानसिकता झुगारून त्यांनी विद्रोह केला आहे; परंतु आम्हाला शूद्र ठरवणारे तुम्ही कोण, हा प्रश्न त्यांनी व्यवस्थेला विचारलेला नाही. वास्तविक, बुद्धाने, कबीराने, तुकारामाने हे प्रश्न विचारलेले आहेत. संतांचा जन्म बुद्धकाळानंतर बऱ्याच उशिरा आणि तोही मध्ययुगीन अंधारलेल्या कालखंडात झाला. या पार्श्वभूमीवरही ते स्वयंप्रकाशाने तळपलेले आहेत. त्यासाठी त्यांनी भक्ती आणि प्रेमाचा मार्ग निवडला. तो सनातनी, क्रूर परंपरांच्या विरोधी असल्यामुळे उठून दिसतो. शेवटी प्रेम काय आहे, हा प्रश्न उरतोच. ईश्वरावरील प्रेम आणि माणसावरील प्रेम यात काही अंतर नसते. आपल्या प्रियतमेवर केलेल्या अतूट प्रेमातूनही ईश्वराचा साक्षात्कार होऊ शकतो. खलील जिब्राननं म्हटले आहे :

**मनी प्रेम करून कर्म करायचे म्हणजे काय असते नेमके?**
**वस्त्र विणत असाल तर–**
**ते विणा तुमच्या अंत:करणातील तंतूंनी**
**आणि समजा की ते पांघरणार आहे तुमची प्रेयसी...**

**भक्तिसंप्रदायात माणूस केंद्रस्थानी**

मानवी प्रेमाचेच उदात्त रूप म्हणजे **(उर्वरित पान ३७ वर)**

# सामाजिक समानता कुठंय?



डॉ. विनोद मिश्रा

*वंचित, शोषित, सामाजिक गटांना समान सामाजिक आणि आर्थिक हक्क देण्यास सातत्याने नकार देण्यात आल्यामुळे भारताच्या आर्थिक विकासात बिघाड झाला आहे. म्हणून शोषित, वंचित गटांना आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात समान हक्क मिळावेत यासाठी भेदभावाच्या दहशतीच्या निर्मूलनाची हमी देणाऱ्या अर्थपूर्ण मध्यस्थीची तातडीची गरज आहे. जोपर्यंत आपण हे साध्य करणार नाही, तोपर्यंत राज्यघटनेने दिलेले सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्य निरर्थक असेल.*



आपण नुकताच ७३ वा प्रजासत्ताक दिन साजरा केला. साहजिकच सामाजिक समतेचा विचार करता आपण या संपूर्ण काळात किती प्रगती केली आहे, या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. या संदर्भात गेल्या सात दशकांतील अनुभव आणि उपलब्धी संमिश्र स्वरूपाच्या आहेत. गरिबीच्या गुणोत्तरात लक्षणीय घट करणे, अन्नसुरक्षेच्या बाबतीतील स्वयंपूर्णता आणि विशेषतः गेल्या दोन दशकांतील मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आलेली आणि गाजावाजा झालेली उच्च आर्थिकवृद्धी अशी काही दीर्घकालीन उद्दिष्टं आपण यशस्वीरित्या साध्य केली आहेत. मात्र विविध विकास कार्यक्रम आणि त्यातही विशेषतः गरिबी निर्मूलन कार्यक्रमांसारखे विकास कार्यक्रम शाश्वत ठेवण्यासाठी उच्च आर्थिक वृद्धी आवश्यक असली तरीही तिच्यामुळे सामाजिक तफावती निर्माण होत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी आखलेली विविध धोरणे आणि कार्यक्रम यांच्यामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासारख्या दुर्बल सामाजिक गटांच्या सामाजिक आणि आर्थिक हितामध्ये सुधारणा होण्यास मदत झाली असली तरीही घरे, अन्न, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या विविध मूलभूत सेवा उपलब्ध होण्यासंदर्भातील तफावती मात्र वाढत गेल्या ओहत. देशाच्या लोकसंख्येचा जवळजवळ चौथा भाग असलेल्या अनुसूचित जातींना आणि अनुसूचित जमातींना सामाजिक ओळखीच्या आधारे अलगीकरण आणि भेदाभेद यामुळे पद्धतशीरपणे समान प्रवेश किंवा उपलब्धी नाकारण्यात आली आहे.

### उपेक्षित घटक अद्यापही मागासच

देशाच्या सामाजिक आणि राजकीय यंत्रणेने समाजाच्या मुख्य प्रवाहात विविध गटांना समाविष्ट करण्यासाठी विविध कार्यक्रम सुरू केले. मात्र तरीही सामाजिक तफावती तशाच राहिल्या. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या काही दशकांत सकारात्मक विकास झाला असला तरीही काही सामाजिक समस्या सोडवल्या गेलेल्या नाहीत आणि भारतात त्या अद्यापही तशाच रेंगाळत राहिल्या आहेत. चांगली घरे किंवा निवारा, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या विविध तरतुदींपासून सामाजिकदृष्ट्या उपेक्षित समाजांना अद्यापही बाजूलाच ठेवण्यात आले आहे आणि हीच सर्वाधिक महत्त्वाची समस्या आहे. राज्य आणि केंद्र सरकारांनी

विशिष्ट धोरणांच्या आणि कार्यक्रमांच्या स्वरूपात केलेल्या विविध प्रयत्नांनंतरही अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासारखे सामाजिकदृष्ट्या उपेक्षित घटक अद्यापही मागासच राहिले आहेत.

स्वाभिमानी जीवनासाठी अन्न, निवारा आणि वस्त्र या तीन मूलभूत गरजा महत्त्वाच्या मानल्या जातात. अन्न आणि पोषण ही मूलभूत मानवी गरज आहे. आरोग्यपूर्ण जगण्यासाठी पुरेशा प्रमाणात अन्न उपलब्ध असण्याची आवश्यकता असते; परंतु भारत प्रजासत्ताक बनल्याच्या ७२ वर्षांनीही संपूर्ण लोकसंख्येला पुरेसे अन्न पुरवण्यास आपण सक्षम बनलेलो नाही. सामाजिक गटनिहाय विश्लेषणातून असे सूचित होते की, सर्व सामाजिक गटांमध्ये अनुसूचित जातींमध्ये आणि अनुसूचित जमातींमध्ये भुकेची भीषण समस्या असण्याचे सर्वोच्च प्रमाण आहे. सात दशकांनंतरही जागतिक भूक निर्देशांकावरची भारताची कामगिरी दुःखदायक आहे. सन २०१८ मध्ये जागतिक भूक निर्देशांकावर एकूण ११९ देशांमध्ये भारताचा १०३ क्रमांक होता. गंभीर पातळीवरच्या भुकेला तोंड द्यावे लागणाऱ्या ४५ देशांमध्ये भारताचा समावेश आहे ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. त्याबरोबरच भारताच्या लोकसंख्येत मोठे प्रमाण असलेल्या उपेक्षित, शोषित समूहांमध्ये पुरेशा प्रमाणात अन्न आणि पोषण उपलब्ध असण्याचे प्रमाणही मर्यादित आहे.

**एससी अन् महिलांत अधिक कुपोषण**

स्वातंत्र्यानंतर विशेषतः अनुसूचित जाती आणि महिला यांच्यातील कुपोषणाचे प्रमाण खूपच अधिक आहे. भारतात १५ ते ४९ वयोगटातील ५३ टक्के महिला आणि २३ टक्के पुरुष रक्तक्षयाने ग्रस्त (अ‍ॅनेमिक) आहेत. रक्तक्षयाच्या प्राबल्यात २००५ ते २०१६ या १० वर्षांत फारसा बदल झालेला नाही या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे. रक्तक्षयाचे प्राबल्य हे कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. गरिबीचे उच्चतर गुणोत्तर आणि पुरेशा प्रमाणात उदरनिर्वाहाची साधने नसणे यांमुळे अनुसूचित जातींना आणि अनुसूचित जमातींना मोठ्या प्रमाणात भूक, रक्तक्षय आणि कुपोषण यांना तोंड द्यावे लागत आहे. एनएफएचएस-४ मधील माहितीनुसार, भारतातील सामाजिकदृष्ट्या दुर्बल गटांमधील सुमारे निम्मी मुले कुपोषणग्रस्त आहेत. दुर्बल, उपेक्षित घटकांमधील रक्तक्षयाच्या प्राबल्याचा विचार करता, अनुसूचित जातींमधील आणि अनुसूचित जमातींमधील ६० टक्क्यांहून अधिक मुलांना रक्तक्षयाच्या परिस्थितींचा त्रास सहन करावा लागत आहे. इतर मागास प्रवर्गातील आणि उच्चवर्णीयांमधील मुलांच्या तुलनेत हे प्रमाण खूपच अधिक आहे. त्याचप्रमाणे भारतातील अनुसूचित जाती व जमातींमधील ४० टक्क्यांहून अधिक महिला तीव्र कुपोषणाच्या समस्येला तोंड देत आहेत.

वर दिलेल्या आकडेवारीवरून स्पष्टपणे असे सूचित होते, की सामाजिकदृष्ट्या उपेक्षित गटांमधील कुटुंबांना अन्न आणि पोषण अत्यल्प प्रमाणात उपलब्ध होते. भारतातील आणि महाराष्ट्रातील अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांना उच्चवर्णीयांच्या तुलनेत पुरेशा प्रमाणात अन्न आणि पोषण मिळण्यापासून अधिक प्रमाणात वंचित रहावे लागते. या वंचनांना तोंड देण्यासाठी भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर अन्न आणि पोषणासंदर्भात विशेषतः समाजातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विभागांवर भर देऊन विविध कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमांची विविध विभागांकडून आणि सरकारी यंत्रणांकडून अंमलबजावणी केली जात आहे. मात्र तरीही या विविध यंत्रणांमधील सहकार्याच्या आणि सामुदायिक ताकदीच्या अभावामुळे या कल्याणकारी कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीस प्रतिबंध होत आहे. त्यामुळे सामाजिकदृष्ट्या वगळणुकीची वागणूक देण्यात येणाऱ्या गटांतील कुटुंबांवर याचा विपरीत परिणाम झाला असून त्यांना विविध कार्यक्रमांचे एकत्रित लाभ मिळण्यास प्रतिबंध झाला आहे.

## *अन्याय्य प्रथाही जबाबदार*

***सहकार्याच्या आणि अंमलबजावणीच्या अभावाच्या समस्या वगळता अनुसूचित जातींच्या विरोधात पाळल्या जाणाऱ्या सर्व स्तरांवरच्या वगळणुकीच्या आणि भेदभावाच्या पद्धती या त्यांना अन्न आणि पोषण यांच्याशी संबंधित विविध कार्यक्रम मर्यादित प्रमाणात उपलब्ध होण्यामागची प्रमुख कारणे आहेत. गाव पातळीवर राबवला जाणारा एकात्मिक बालविकास कार्यक्रम (आयसीडीएस) हा मुलांना आणि महिलांना अन्न व पोषण पुरवणारा प्रमुख आघाडीवरचा कार्यक्रम आहे. विविध अभ्यासांतून पुढे आलेल्या अनुभवाधिष्ठित पुराव्यांवरून असे दिसते, की अनुसूचित जातीच्या मुलांना आणि महिलांना या सेवांमध्ये समान हक्क नाकारला जातो. उपेक्षित, वंचित गटांमधील मुलांना स्वतंत्र, अलग बसायला सांगितले जाते आणि त्यांना नेहमीच शेवटी अन्न दिले जाते. शिवाय गावातील इतर सामाजिक गटांमधील मुलांच्या तुलनेत त्यांना अन्न व पोषक द्रव्ये कमी प्रमाणात दिली जातात. या कार्यक्रमाच्या अत्यल्प यशाला अस्पृश्यतेच्या आणि अन्याय्य वगळणुकीच्या प्रथाही जबाबदार आहेत. त्याचप्रमाणे अनुसूचित जातींसारख्या भेदभाव करण्यात येत असलेल्या गटांना माध्यान्ह भोजन आणि सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्था (रेशनिंग व्यवस्था) या सेवा मिळवतानाही अन्याय्य वगळणुकीला तोंड द्यावे लागते. अन्न आणि आहारविषयक गरजा भागवण्यासाठीचे हे दोन प्रमुख कार्यक्रम आहेत.***

**सरकारला प्रचंड काम करावे लागणार**

अनुसूचित जातीच्या कुटुंबांना या कार्यक्रमांचा लाभ मिळवताना सेवा पुरवठादारांकडून दिल्या जाणाऱ्या भेदभावाच्या वागणुकीचा सामना करावा लागतो. जातिधारित वगळणूक आणि भेदभावामुळे अनुसूचित जातीच्या कुटुंबांना अन्न आणि पोषण कमी प्रमाणात उपलब्ध होते. गरिबीच्या आर्थिक स्थितीमुळे त्यांना पुरेशा प्रमाणात अन्न आणि पोषण मिळवणे परवडत नाही आणि त्यातूनच त्यांच्यामध्ये भूक आणि निकृष्ट पोषणाची स्थिती निर्माण होते. अखेरीस या सामाजिक गटांमध्ये आरोग्यविषयक खराब फलिते निर्माण होण्यात याची परिणती होते; म्हणजेच त्यांच्या आरोग्यावर याचा विपरीत

परिणाम होतो. सन २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने एकूण १७ जागतिक उद्दिष्टांच्या संचांनी बनलेल्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टाचा ठराव केला. भारत हा या ठरावावर सह्या करणाऱ्या देशांपैकी एक आहे. शाश्वत विकासाच्या संचातील दोन क्रमांकाचे उद्दिष्ट हे सन २०३० पर्यंत भूक पूर्णपणे भागवण्याचे म्हणजेच 'झिरो हंगर'चे आहे. याखेरीज या उद्दिष्टांमध्ये कोणालाही मागे न सोडण्यावर भर देण्यात आला आहे. वर करण्यात आलेल्या विश्लेषणातून स्पष्टपणे असे सूचित होते, की भारताला भुकेचे संपूर्ण निर्मूलन करण्यासाठी आगामी दशकात अत्यंत अवघड असे प्रचंड काम करावे लागणार आहे. इतर देशांप्रमाणे भारतात गरीब लोकांचा एकच सामाईक गट नाही. उदरनिर्वाहाची साधने मिळवताना आणि याचाच अर्थ गरिबी आणि भूक कमी करताना सामाजिक-धार्मिक आणि वांशिक ओळखी महत्त्वाची भूमिका बजावतात. केंद्र आणि राज्य सरकारे गरिबी निर्मूलनाचे आणि रोजगाराचे विविध कार्यक्रम राबवत आहेत. या कार्यक्रमांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासारख्या सामाजिकदृष्ट्या उपेक्षित असलेल्या गटांवर खास भरही दिला जात आहे; परंतु विशेषतः उपेक्षित सामाजिक गटांमधील गरिबी निर्मूलनात या कार्यक्रमांचा परिणाम मर्यादित स्वरूपाचा आहे. विविध सामाजिक गटांमधील गरिबीविषयक आकडेवारीच्या विश्लेषणातून असे दिसते, की सर्व सामाजिक गटांमधील गरिबीत घट झाली असली तरी अनुसूचित जातींमधील आणि अनुसूचित जमातींमधील गरिबीच्या गुणोत्तरातील घट ही इतर प्रबळ सामाजिक गटांच्या तुलनेत कमी आहे.

### आजही केला जातो भेदभाव

भारताची राज्यघटना आणि त्यातही विशेषतः मूलभूत हक्क आणि राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांद्वारे अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या हितांचे रक्षण करणाऱ्या विशिष्ट तरतुदी देण्यात आल्या आहेत. राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून ७२ वर्षांनंतरही वंचित सामाजिक घटकांना पद्धतशीरपणे करण्यात येणाऱ्या भेदभावाला, वगळणुकीला आणि सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारख्या जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये समान हक्क नाकारले जाण्याला तोंड द्यावे लागत आहे, ही गोष्ट दुःखद आणि दुर्दैवी आहे.

### भेदभावाचे निर्मूलन व्हावे

विशिष्ट सामाजिक गटाच्या सामाजिक ओळखीला चिकटून असलेले पूर्वग्रह आणि कलंक हेच अद्यापही अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या विविध निदर्शकांची फलिते निश्चित करत आहेत. स्वातंत्र्यानंतर सरकारने सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे कल्याणकारी कार्यक्रमांचे लाभ मिळवण्यासंदर्भात उपेक्षित, वंचित सामाजिक गटांच्या आर्थिक स्थितींमध्ये काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. मात्र हा सकारात्मक कल असला तरीही उपेक्षित, वंचित सामाजिक गटांमधील बदलाचा दर अत्यंत कमी आहे. त्यामुळे गरिबीत सर्वसामान्यपणे घट झाली असली तरीही रोजगार, निवारा किंवा घरे, आरोग्य, शिक्षण आणि पोषण या जीवनाच्या मूलभूत, अत्यावश्यक गरजा मिळवण्यात सामाजिक गटांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावती आहेत. उपेक्षित, वंचित गटांमधील उच्च प्रमाणातील गरिबी टिकून राहिली असून त्याबरोबरच या गटातील आरोग्य, शिक्षण आणि पोषण



यांची स्थितीही खराब आहे. धोरणकर्त्यांनी याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. फक्त कार्यक्रमांची रचना आणि अंमलबजावणीच वंचित गटांना अनुकूल असून चालणार नाही; तर कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना भेदभावाच्या रुढींचे निर्मूलन करण्यावरही लक्ष केंद्रित करण्याची तातडीची गरज आहे. अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची वगळणुकीच्या आणि भेदभावांच्या रुढींच्या पालनाची भूमिका आणि अनुसूचित जातींच्या विरोधातील जातिधारित पूर्वग्रह आणि दृष्टिकोन हेसुद्धा सामाजिकदृष्ट्या वगळणूक करण्यात येणाऱ्या गटांमध्ये या कार्यक्रमांचा मर्यादित परिणाम दिसण्याच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. या गोष्टी लक्षात घेऊन कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतील भेदभावाच्या पद्धतींचे निर्मूलन करण्याच्या उपाययोजनांचा सरकारी धोरणांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये समावेश करण्याची गरज आहे.

अशा प्रकारे भारतीय राज्यघटनेने विविध कायदेशीर संरक्षणे देऊनही अनुसूचित जातींसारख्या उपेक्षित, वंचित गटांना अस्पृश्यतेची, भेदभावाची, वगळणुकीची आणि अत्याचाराची वागणूक देण्याच्या प्रथा अद्यापही सुरूच राहिल्या आहेत. जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये न्याय्य वाटा आणि समान हक्क मिळण्यापासून भारताच्या एक चतुर्थांश लोकसंख्येला वंचित ठेवणाऱ्या भारताच्या प्रशासनाच्या आणि सामाजिक व्यवस्थांच्या या दुखण्याचे सिंहावलोकन करण्याची गरज आहे. तोंड द्यावी लागणारी जी आव्हाने आम्ही या लेखात सूचित केली आहेत, त्यात गरिबी आणि भुकेच्या आव्हानांबरोबरच रोजगार, आरोग्य आणि शिक्षणात समान हक्क नाकारले जाणे यांसारख्या अधिक प्रमाणातील घटनांचा समावेश आहे. उच्च आर्थिक वाढ राखण्यात भारत यशस्वी झाला आहे; परंतु भारताच्या राज्यघटनेच्या अंमलबजावणीला ७२ वर्षे झाल्यानंतरही अद्याप प्रचंड गरिबीत आणि भुकेल्या स्थितीत जगणाऱ्या भारतातील लाखो वंचित गटांच्या आयुष्याला कलाटणी देण्यात, त्यांच्या आयुष्यांत बदल घडवून आणण्यात या वाढीचे लाभ रूपांतरित झालेले नाहीत. वंचित, शोषित, सामाजिक गटांना समान सामाजिक आणि आर्थिक हक्क देण्यास सातत्याने नकार देण्यात आल्यामुळे भारताच्या आर्थिक विकासात बिघाड झाला आहे. म्हणून शोषित, वंचित गटांना आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात समान हक्क मिळावेत यासाठी भेदभावाच्या दहशतीच्या निर्मूलनाची हमी देणाऱ्या अर्थपूर्ण मध्यस्थीची तातडीची गरज आहे. जोपर्यंत आपण हे साध्य करणार नाही, तोपर्यंत राज्यघटनेने दिलेले सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्य निरर्थक असेल. ●●●

**(लेखक वंचितांच्या प्रश्नाचे अभ्यासक आहेत)**

*सामाजिक बांधिलकीचं कंकण हाती बांधून सामान्यांसाठी तहहयात लढत राहिलेले एन.डी. पाटील एक उत्तुंग व्यक्तिमत्व. चालता येत नसतानाही वयाच्या ९२ व्या वर्षी व्हिलचेअरवर बसून आंदोलनांमध्ये हिरीरिने सहभागी होणारे, आमदार झाल्यापासून अखेरच्या दिवसापर्यंत आपल्या मानधनातील विशिष्ट रक्कम गरीब कार्यकर्त्यांना देणारे एन.डी. हे महाराष्ट्रातल्या राजकारणातील निःस्वार्थ आणि तत्त्वनिष्ठ लोकयोद्धा होते. त्यांच्या निधनाने एक नेता नाही, तर विचार लुप्त झालाय.*

**प्रतिनिधी**

व्यक्तिविशेष

# कष्टकऱ्यांचा आवाज : एन.डी. पाटील

आ उपेक्षित आणि कष्टकऱ्यांचा आवाज, ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत डॉ. नारायण ज्ञानदेव तथा एन.डी. पाटील यांच्या निधनामुळे लढाऊ बाण्याचा लोकयोद्धा आणि तत्त्वाशी कधीही तडजोड न करणारा नेता महाराष्ट्राने गमावला आहे. सामाजिक आणि राजकीय जीवनात ६५ वर्षे सक्रीय राहिलेल्या प्रा.एन.डी. पाटील यांचे जाणे क्लेशकारक तर आहेच, शिवाय महाराष्ट्रातल्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी करणारेही आहे. आयुष्यभर शेतकरी आणि कष्टकऱ्यांशी बांधिलकी मानून काम करणारा हा लोकनेता होता. एकाच वेळी अनेक संस्थांचे नेतृत्व करीत असताना त्या संस्थांचा कारभार आदर्श रितीने झाला पाहिजे, अशी भूमिका घेऊन ते जगले. राजकीय क्षेत्रातील सोयरसंबंधांचा आणि मंत्रिपदासह भूषविलेल्या कोणत्याही पदाचा गैरवापर त्यांनी वैयक्तिक लाभासाठी कधीही केला नाही. त्यामुळेच तर एन. डी. पाटील यांच्या मृत्यूने नीतिमत्ता हरवल्याची भावना समाजमनातून व्यक्त झाली.

सांगली जिल्ह्याच्या वाळवा तालुक्यातील ढवळी गावी एका निरक्षर आणि गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले. गावापासून आठ मैलांवर असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या आष्टा येथील शाळेत त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या चळवळीचे वाळवा तालुका हे मुख्य केंद्र होते. त्यामुळे स्वातंत्र्याचे आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे बाळकडूच त्यांना येथे मिळाले होते. विद्यार्थिदशेतच त्यांनी 'भारत छोडो आंदोलना'त उडी घेतली होती. महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी सामाजिक जीवनाला प्रारंभ केला.

**संघर्षशील कारकीर्द**

एन. डी. पाटील यांची संपूर्ण कारकीर्द संघर्षशील राहिली. तरुण वयात शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा



खांद्यावर घेतलेल्या 'एनडीं'नी तहहयात एक पक्ष आणि पक्षाची विचारधारा जपली. पद, पैसा आणि प्रतिष्ठेसाठी आज दलबदलूंचे अमाप पीक आल्याच्या काळातही एन. डी. पाटील यांनी एक पक्ष आणि पक्षाच्या विचारधारेशी एकनिष्ठ राहून राजकारणात एक आदर्श निर्माण केला. आयुष्यभर संघर्ष हाच स्थायीभाव जपत आणि लाल झेंडा खांद्यावर घेऊन तत्त्व आणि विचारांची लढाई ते लढत राहिले. १९५४ ते १९५७ अशी तीन वर्षे साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केलं. पुढे इस्लामपूर येथे काही काळ प्राचार्यपदाचीही जबाबदारी त्यांनी सांभाळली. नोकरी सोडून राजकारण आणि समाजकारणात सक्रीय झाल्यानंतर अठरा वर्षे ते विधान परिषदेचे सदस्य होते. १९७८ मध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी लोकशाही दलाचे अर्थात पुलोदचे सरकार आल्यानंतर या सरकारमध्ये एन.डी. पाटील सहकारमंत्री होते. मंत्रिमंडळात काम करताना ते शेतमालाच्या उत्पादनावर शेतकऱ्यांना दर मिळाला पाहिजे यासाठी आग्रही राहिले. यासाठी त्यांनी काही धोरणात्मक निर्णय घेतले. अहर्निश प्रयत्न करून खान्देश, मराठवाडा आणि विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी त्यांनी कापूस एकाधिकार योजना पुनरुज्जीवित केली. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळतो का नाही, याची खात्री करण्यासाठी ते रात्रभर मार्केटमध्ये फिरत राहायचे. शेतकऱ्यांचा वीज प्रश्न असो, की शेतमालाला भाव मिळण्यासाठी आंदोलन असो, त्यांनी योग्य आणि आग्रही भूमिका घेतली होती.

## कर्नाटक सीमाप्रश्नी आंदोलनातून मराठीजनांच्या हिताचीच काळजी

*कर्नाटक सीमा प्रश्न तातडीने सुटावा आणि कर्नाटकातील बेळगावसह प्रत्येक मराठीभाषक व्यक्ती महाराष्ट्रात यावी यासाठी एनडींनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. किंबहुना, त्यांनी या प्रश्नाचा ज्या धाडसाने विचार केला तितकी हिंमत महाराष्ट्रातील कुण्याही नेत्याने दाखवल्याचे दिसले नाही. सीमा भागात राहणाऱ्या सामान्यातील सामान्याची त्यांना कळकळ होती. म्हणूनच तर तिकडचा प्रत्येक मराठी माणूस महाराष्ट्रात यावा अशी त्यांची भूमिका होती. मंत्री असताना त्यांनी सीमाप्रश्नाचा पाठपुरावा केला. मात्र सीमालढा न्यायालयात नेण्याच्या विरोधात ते होते. तथापि, आपल्यामुळे आडकाठी नको म्हणून लढाऊ वृत्तीच्या या नेत्याने सीमाप्रश्नाच्या न्यायालयीन लढाईला मान्यता दिली. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी या लढाईचे नेतृत्व एनडींकडे दिले. न्यायालयीन लढाईच्या अस्थिर आणि संघर्षमय काळात ते स्थिर राहिले. मतभेद असले तरी 'लढणाऱ्यास पाठबळ हा त्यांचा स्थायीभाव होता. सीमा लढ्यात अनेक मतप्रवाह आहेत. मात्र त्यांचा उद्देश सीमाभागातील सामान्यजणांच्या हिताचा होता.*

### सच्चे शिक्षणमहर्षी

महाराष्ट्रात केवळ शिक्षणसंस्था काढली म्हणून अनेकजण स्वतः ला शिक्षणमहर्षी संबोधतात. मात्र वंचित आणि गोरगरिबांपर्यंत ज्ञानगंगा पोहोचवण्याचे उच्चकोटीचे काम करणारे एन.डी. पाटील हेच सच्चे शिक्षणमहर्षी शोभतात.

रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी वंचितांच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उभारलेली ही संस्था शिक्षणाची अखंड वाहणारी गंगोत्री झाली पाहिजे, ग्रामीण मुले शिकली पाहिजेत हा ध्यास त्यांनी सतत घेतला. संस्थेच्या विस्तारासाठी त्यांनी मोठे कष्ट घेतले. ग्रामीण भागात शाळांसाठी जमिनी आणि देणग्या मिळविण्यासाठी ते वणवण हिंडत राहिले. संस्थेत १९८९ ते २००८ अशी १९ वर्षे त्यांनी आजीवन सदस्य ते कार्याध्यक्ष अशा विविध पदांवर काम करून संस्थेला नावारूपाला आणले. शासनाने विनाअनुदानित शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर ग्रामीण भागात शाळा नसतील तेथे त्यांनी एकाच वेळी ८६ शाळा सुरू केल्या. शासनाने आश्रमशाळांची योजना आणल्यानंतर त्यांनी मोखाड, खरोशी अशा अतिदुर्गम ठिकाणी आठ आश्रमशाळा सुरू केल्या. सहा औद्योगिक प्रशिक्षण संस्थाही त्यांनी सुरू केल्या. ग्रामीण भागातील मुले शिकली पाहिजेत हा ध्यास त्यांनी कायम जपला. म्हणूनच सरकार रयत शिक्षण संस्थेला वैद्यकीय महाविद्यालय देत असूनही त्यांनी ते घेतले नाही. त्यावेळी त्यांनी घेतलेली भूमिका शिक्षणाच्या प्रसारासाठी किती विधायक होती, हे स्पष्ट होते. त्यावेळी ते म्हणाले होते, वैद्यकीय महाविद्यालयांसाठी इमारती, हॉस्पिटल बांधण्याच्या खर्चात मी ग्रामीण भागात पाच-पन्नास शाळा काढीन. शेतकऱ्यांची मुले उच्चशिक्षित झाली पाहिजेत, अशी त्यांची दूरदृष्टी होती. यातूनच त्यांनी महाविद्यालयांनाही प्राधान्य दिलं. राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी एकदा शाळांना लोवर गणित आणि लोअर इंग्रजी शिकवण्यास सुरू करण्याचे विधेयक विधानसभेत आणले होते. हे विधेयक पास झाले तर ग्रामीण भागातील मुले-मुली इंग्रजी आणि गणितात कच्ची राहतील, इंजिनिअरिंग, मेडिकलचे शिक्षण ते घेऊ शकणार नाहीत हे ते जाणून होते. त्यामुळे त्यांनी या विधेयकाला तीव्र विरोध केला. त्यासाठी सर्व आमदारांची एकजूट करून शासनाला विधेयक मागे घेण्यास भाग पाडले होते. जागतिकीकरणाच्या रेट्याने शिक्षणाचे खाजगीकरण होत असताना आणि बहुजन समाजाला शिक्षण परवडेनासे झाले असताना, एन.डी. पाटील यांनी बहुजनांना शिक्षित करण्याचा भाऊराव पाटील यांचा वसा प्राणपणाने जपला. म्हणूनच एन. डी.पाटील हे खऱ्या अर्थाने शिक्षणमहर्षी आणि शिक्षणतज्ज्ञ ठरतात.

### आयुष्यभर केली आंदोलने

रायगड जिल्ह्यातील पेणनजीकच्या ४५ गावांमधील शेतकऱ्यांच्या महामुंबई सेझसाठी संपादन केली जाणारी ३४ हजार एकर जमीन वाचवण्याचा लढा असो की बंद गिरणी कामगारांचा लढा, गोवा मुक्तिसंग्राम, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, भूमिहीनांसाठी आंदोलने, शेतीमालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी केलेले लढे, कापूस एकाधिकार योजना, महागाई आणि उपासमारविरोधातील आंदोलन, कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील २१ टीएमसी पाणी मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि बीड या दोन जिल्ह्यांना मिळण्यासाठी केलेला पाठपुरावा, बहुजनांच्या शिक्षणाला ग्रासणाऱ्या निर्णयांविरुद्ध लढा, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, धरणग्रस्त व विस्थापितांची आंदोलने, एन्रॉनविरोधी आंदोलन, शेगाव ते नागपूर विधानसभेवर पायी चालत काढलेली दिंडी, महाराष्ट्र राज्य वीज संघर्ष समितीचे आंदोलन, भूविकास बँकेच्या मनमानी कारभाराविरुद्धचे आंदोलन, अन्याय्य कामगारकपात करणाऱ्या कारखानदारांच्या मुसक्या आवळण्यासाठी केलेले आंदोलन, भांडवलदारी जागतिकीकरणविरोधी आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र समितीचे बेळगाव महाराष्ट्रात आणण्यासाठीचे आंदोलन, कोल्हापुरातील टोलविरोधी आंदोलन अशी आंदोलनांची न संपणारी यादी एन.डी. पाटील यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाची साक्ष देणारी आहे.

### सांप्रदायिकताविरोधी चळवळीला दिला वेग

जनआंदोलनांबरोबरच जातीयवाद, सांप्रदायिकताविरोधी चळवळीला धार आणण्याचे काम त्यांनी केले. कधीही तडजोड न करणारे राजकीय नेता आणि सामाजिक कार्यकर्ता अशा रूपातील ते एक दुर्मिळ, पण तेवढेच प्रभावी संयुग होते. या दोन्ही भूमिकांचे मिश्रण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आणि कार्यकर्तृत्वात दिसत होते. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही अत्यंत प्रभावी होते. त्यांचे भाषण कधी कधी तास-दोन तास चालले तरी ते भारावून टाकणारे असायचे. खरे तर, वैयक्तिक पातळीवर ते शरद पवार यांचे मेव्हणे होते, पण त्यांनी कोणत्याही पक्षाशी किंवा कोणत्याही नेत्याशी कधी तडजोड केली नाही. उलट बाबा आमटे यांच्याप्रमाणे त्यांनी स्वतःच्या पत्नीला सार्वजनिक जीवनातही योग्य अवकाश दिला. एनडींचे हे कार्यकर्तृत्व महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीलाच नव्हे, तर राजकीय पक्षांनाही अत्यंत प्रेरणादायी ठरले. ●●●

# सर, मॅडम गेल्या वाहून आता टीचर येणार धाऊन



जिथे कसलेच धोरणात्मक सातत्य नसते आणि सारे काही लाटांवर अवलंबून असते, त्याला भारतातील शिक्षण म्हणतात. खरे तर, शिक्षण सर्व प्रकारच्या राजकारणापासून, त्यातील रंगांपासून अलिप्त असावं अशी अपेक्षा असते. भारतात शिक्षण क्षेत्र अलिप्त दिसते पण प्रत्यक्षात मात्र ते वगेवगेळ्या रंगांत ओले झालेले दिसते. परीक्षा पद्धती वारंवार बदलली जाते, पाठ्यपुस्तकं सातत्यानं राजकीय आणि धार्मिक वादामुळे गाजतात. कधी शाळांच्या इमारती तर कधी तेथील खिचडी गाजत असते. राजकारणातले कारभारी बदलले, की धोरणं बदलतात. कधी परीक्षा वर्षातून दोनदा, कधी एकदा तर कधी परीक्षाच नाही असंही घडत असतं. शिक्षणातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तर ठरवण्यावरूनही असेच वाद होतात. सरकार उजव्यांचं आलं की शिक्षण उजव्या कुशीवर वळतं आणि डाव्यांचं आलं की डाव्या कुशीवर वळतं. डाव्यांचे जे नायक असतात, ते उजव्यांचे खलनायक असतात. चष्म्याचा रंग बदलला, की मग पुढं सारंच बदलत जातं. डाव्या-उजव्यांच्या कल्पना, संकल्पना वेगळ्या असतात. गोडसे एकीकडे खुनी होतो तर दुसरीकडे मूर्ती, पुतळ्यांचे साधन होतो. या सर्वांचा परिणाम म्हणजे आपल्या शिक्षणाची गुणवत्ता आणि विश्वासार्हता वाढत नाही. पाचवीतल्या पोरांना नाव लिहिता येत नाही, तर दुसरीकडे महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांसाठीच्या प्रश्नपत्रिका फुटतात. इतर क्षेत्रांप्रमाणे शिक्षणक्षेत्रही भ्रष्टाचाराच्या झोकाळ्यावर झोके घ्यायला लागते.

आता हे सारं पंक्चरवाल्यानं आताच का उकरून काढलं, असं कोणीतरी विचारेलही. त्याला कारण म्हणजे केरळमधील एका सरकारी शाळेने शिक्षकांना सर आणि शिक्षिकांना मॅडम म्हणू नये असं फर्मान काढलं आणि ते राबवलंही. सर आणि मॅडम हे दोन्ही शब्द वसाहतवादातले म्हणजे भारताला गुलाम करणाऱ्या साम्राज्यवादातले म्हणजेच गोऱ्या साहेबांचे आहेत. शिवाय सर आणि मॅडममुळे लिंगभेदही होतो. तो होऊ नये यासाठी एका सामाजिक कार्यकर्त्याने मोहीम चालू केली होती. अशीच मोहीम विद्यार्थ्यांच्या गणवेशाबाबतही. सर्वांना समान गणवेश म्हणजे लिंगभेद ठळक करणारे गणवेश टाळण्यात आले किंवा तसा प्रयत्न चालू आहे. इंग्रजीत सर हा शब्द अतिशय उच्चपदस्थांसाठी वापरतात. सर ही एक सर्वश्रेष्ठ पदवीही आहे. मॅडमच्या बाबतीतही असेच आहे. राण्या, महाराण्या, महिला राष्ट्राध्यक्ष किंवा महिला पंतप्रधान यांच्यासाठीही मॅडम शब्द वापरला जातो. तोच शब्द शिक्षिकांसाठी घेण्यात आला. म्हणजे प्रेसिडेंट मॅडम ते टीचर मॅडम, कारकून मॅडम, ऑफिसर मॅडम असा हा प्रवास सुरू झाला. पूर्वी शिक्षकांना मोठ्या आदरानं गुरूजी म्हटलं जायचं. शिक्षिकांना बाई म्हटलं जायचं. शिक्षकांचं रूपांतर कामगारांत आणि पुढं जणू काही सेवा पुरवणाऱ्यांमध्ये झालं. गुरूजी आणि बाई हे शब्द मागास वाटू लागले. त्याविषयी शिक्षकांनाही संकोच वाटू लागला. महाविद्यालयात शिकवणाऱ्यांना सर म्हणत असतील, तर आम्हाला का नको असा प्रश्न प्राथमिक, माध्यमिक, अंगणवाडी शिक्षकांमध्ये तयार झाला. वरचा सर सरकत सरकत खाली आला. मॅडमचंही तसंच झालं. त्या मॅडम मग आपण का बाई, असा प्रश्न शिक्षिकांमध्ये तयार झाला असावा. यातून सर्व शिक्षणक्षेत्र म्हणजे खालपासून वरपर्यंत सर्व क्षेत्र सर आणि मॅडमनी व्यापून टाकला. फरशी साफ करायची पावडर घेऊन येणाऱ्या, मॉलमध्ये सेल्सगर्ल होणाऱ्या आणि हॉटेलमध्ये धुणी-भांडी करणाऱ्यांनाही मॅडम म्हटलं जाऊ लागलं. तशीच कामे करणारे सर झाले. जणू काही आपण खूप मोठ्या प्रतिष्ठेच्या पदावर पोहोचलोत अशीच धारणा झाली. कोर्टातून माय लॉर्ड शब्द गेला. तोही वसाहतवादीच होता. मग आता सराला का सरकवायचं नाही या भूमिकेतून सर आणि मॅडमवर संक्रांत आली आणि केरळातील ओलासेरी या शाळेनं टीचर शब्द अमलात आणला. सुरुवातीला शिक्षक आणि विद्यार्थ्यांनाही संकोच वाटला. इंग्रजीत टीचर म्हणायचे तर मग अन्य भाषेत काय, असा प्रश्न निर्माण होईल. मराठीत शिक्षक असं म्हणणं मान्य केलं जाईल आणि शिक्षिकेला बाई! पण बाईला बाई म्हणणं आणि शिक्षकाला गुरूजी म्हणणं हे नव्या प्रतिष्ठेच्या कल्पनेत बसेल काय? आजच्या शिक्षकांत गुरूजी कमी आणि आठताशी कामगार जास्त आहे. या कामगाराला अजूनही बऱ्यापैकी प्रतिष्ठा आहे. एकूण काय तर कुणाला काय म्हणायचं यावर शिक्षण क्षेत्र गाजत राहील. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता, बाजारीकरण, विनाअनुदानित शिक्षण, शिक्षणातील राजकारण, शिक्षणात घुसवणारा मूलतत्त्ववाद, धर्मवाद, गळती, शाळाबाह्य विद्यार्थी वगैरे विषय मागं पडतील किंवा ते सुट्टीवर तर पाठवले जातील. पूर्वी कानडीत शिक्षकाला मास्तरच म्हणायचे. म्हणणारा आणि ऐकणारा दोघांनाही आनंद व्हायचा. शिक्षकांनी स्वत:साठी स्वत:च ड्रेसकोड तयार केला होता. विद्यार्थ्यांच्या

मनावर परिणाम होतील किंवा त्यांचे चित्त विचलित होईल, असं कोणी शिक्षक करायचा नाही. पण आता कामागाराला हा नियम लागू नये. या साऱ्या गोष्टी त्याच्या स्वातंत्र्याचा भाग बनल्या आहेत. कुणीतरी असेही म्हणले, की गुरूजी म्हणजे मागं जाणं आणि सर म्हणजे पुढं जाणं असतं. पंक्चरवाल्याला मात्र मागं किंवा पुढं अशी काहीच हालचाल दिसत नाही. वाजले की बारा असंच वाटतं राहतं.

# यूपीच्या निवडणुकांमध्ये सहभोजनाचीही इन्ट्री



उत्तर प्रदेशचं राजकारण नेहमीच धर्मवाद, गुन्हेगारी, पक्षांतर, हिंदुत्वाच्या घोषणा आणि बुवाबाबांच्या गर्दीने गाजत असतं. या सर्व गोष्टी उत्तर प्रदेशातील राजकारणाच्या जणू काही अविभाज्य भाग बनल्या आहेत. वर्षानुवर्षे त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले आहेत. कधी ते बाहुबलींच्या हातात जातं, कधी सोशल इंजिनिअरिंगचा नवा ट्रॅक काढतं तर कधी ते भगव्यात झगमगाटायला लागतं. आताही मुख्यमंत्री योगी यांनी केलेल्या सहभोजनामुळे ते गाजतं आहे. उत्तर प्रदेशची मते मायावतींच्या ताब्यात आहेत असं मानलं जातं, तर यादवांची मते समाजवादी पक्षाच्या ताब्यात. मुस्लिम आणि दलितांची मतं निर्णायकी असतात म्हणून त्यावर डल्ला मारण्याचे प्रयत्न आणि त्यासाठी भारी आयडिया शोधल्या जातात. दलितांना आपल्या बाजूला वळवण्यासाठी, त्यातही पिछडा वर्ग आपल्याकडे वळवण्यासाठी अशा आयडिया दिल्लीतल्या मुख्य कारभाऱ्यानेच लढवल्या. कधी त्यांनी सफाई कामगारांचे पाय धुतले, तर कधी आणखी काही केलं होतं. योगींना हे सर्व ठाऊक होतं. कारण त्यांच्याच राज्यात हे घडलं होतं, गंगेला साक्षी ठेऊन. एखादा गरिबाची सेवा करत असेल तर त्याविषयी आक्षेप घेण्याचं काही कारण नव्हतं. पण या सेवेमागे राजकारणात मतांचा मेवा मिळवून गलेलठ्ठ होण्याची जेव्हा योजना असते, तेव्हा मात्र चर्चा होतात. म्हणजे 'आतून कीर्तन बाहेरून तमाशा' असं जेव्हा घडायला लागतं तेव्हा तर चर्चा होतातच, ज्या आताही होऊ लागल्या आहेत.

कोरोनाच्या काळात असंख्य दलित आणि अन्य नागरिक मरण पावले, ज्यांच्या वाट्याला कफन किंवा स्मशानभूमीही आली नाही. गंगेत प्रेते फेकली गेली. त्यांना अंत्यसंस्कार द्यायला किंवा शोकसभा घ्यायला कधी कोणा कारभाऱ्याला वेळ मिळाला नाही. कोरोनाकाळातच अनेक उपचारकेंद्रात जाती उफाळून आल्या होत्या, पण तेथे दलितांच्या बाजूनं उभे राहायला कोणी गेलं नाही. मॉब लिंचिंगमध्ये आणि जात पंचायतींमध्ये झालंच तर गुंडागिरीमध्ये मारल्या गेलेल्यांच्या घरी जायला कुणाला वेळ मिळाला नाही. आता निवडणुकांचे ढोल वाजत असतानाच दलितांबरोबर सहभोजन घेण्याची कल्पना कशी काय सुचली, असा प्रश्न निर्माण झालाय.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गोरखपूरमध्ये अमृतलाल भारती या दलितांच्या घरी जाऊन जेवण घेतलं अर्थात, मांडीला मांडी लावून नव्हे तर थोडं अंतर ठेऊन. या सहभोजनाची छायाचित्र प्रसिद्ध झाली. मुख्यमंत्र्यांच्या मांडीला मांडी लावण्याचं धाडस भारती या दलितानं केलेलं नसावं. त्यामागं कारणेही असतील. एकतर ते मुख्यमंत्री आहेत. सुरक्षेचा प्रश्न असतो वगैरे, वगैरे.. मुख्यमंत्रीच सहभोजनाला जातात म्हणून त्यांच्या पक्षाच्या खासदाराने असा इव्हेन्ट केला. त्याचीही चर्चा झाली. निवडणुका संपेपर्यंत अशा चर्चा होत राहतात. मग पुढे प्रत्येक जण आपापल्या पायरीने वागायला लागतो. वरचा वरच्या पायरीवर आणि खालचा खालच्या पायरीवर रहायला लागतो.

वाजपेयी पंतप्रधान असताना परदेशात झालेल्या एका परिषदेत, भारतात जात कधी नव्हती आणि नाही असे सांगण्यात आले. पुढे हरिजन, दलित अशा शब्दांना आक्षेप घेत भारत जातमुक्त असल्याचा बोलबाला करण्यात येऊ लागला. प्रत्यक्षात जात होती. कागदावरच्या जाती थोड्याफार सौम्य झालेल्या असल्या तरी मनावरच्या जाती तशाच तीव्र आहेत. कोणती जात कोणत्या कारणाने कधी आपला फडा बाहेर काढेल आणि कधी कुणाला दंश करेल याचा नेम नाही. योगी आदित्यनाथ सहभोजनाला गेले, याचा अर्थच जाती कायम आहेत. त्या कायम असल्या तरी लोकशाहीत शक्तिमान मतदारही आहेत. ही मते आपल्याकडे वळवायची असतील तर निदान निवडणूक काळात तरी त्यांच्या जवळजवळ जावे लागते. मुठीत मते येईपर्यंत जवळ जावे लागते. मते मिळवण्यासाठी राजकारणात काहीही केले जाते. सहभोजन हे त्यापैकी एक. योगींनी ते केले आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जाती आहेत याला मान्यता दिली. वास्तव बनून राहिलेल्या जाती संपवण्यासाठी आपला पक्ष, आपलं सरकार आणि आपण स्वतः काय करणार हे जेवणानंतर तृप्त होऊन ढेकर देताना तरी सांगायला हवं होतं. अर्थात, ढेकराचा फोटो काढता येत नाही. फोटोत ढेकर दिसत नाही, ही गोष्ट वेगळी.

उत्तर प्रदेशऐवजी महाराष्ट्राला सहभोजनाची दीर्घ परंपरा आहे आणि ती सच्च्या समाजसुधारणेच्या भावनेतून आली होती. जाती संपवण्यासाठी मनापासून केलेला तो एक प्रयत्न होता. अशा प्रयत्नांनीही चिवट जाती संपल्या नाहीत, हा भाग वेगळा. वर्णव्यवस्थेचे कडवे समर्थक असलेल्या लोकमान्य टिळकांच्या सुपुत्रांनी म्हणजे श्रीधरपंत टिळकांनी संस्कृतीचे रक्षक असलेल्या टिळकवाड्यात दलितांना सहभोजन दिले होते. त्यावेळी सदाशिव पेठी ब्राह्मणांनी म्हणजे पेशवाई प्रिय मानणाऱ्यांनी श्रीधरपंतांना जणू काही बहिष्कृत केले होते. असाच प्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुरुवातीचे एक निष्ठावान कार्यकर्ते ....... यांनीही चर्मकारेतर अस्पृश्यांसाठी सहभोजन घातले होते. पण शिवतरकर यांचे जातभाई असलेल्या देवरूखकर यांनीच जातपंचायत भरवून शिवतरकर यांना धडा






शिकवला होता. टिळकांच्या बाबतीत जात होती आणि शिवतरकर यांच्या बाबतीत मात्र देवरूखकर यांनी ....... सूडाचे राजकारण होते. मंदिरप्रवेश काय, सहभोजन काय आणि सहभजन काय या सर्वांना आपल्या जाती पुरून उरल्या आहेत. जगजीवनराव यांनी अनावरण केलेला पुतळा शुद्ध करून घेण्याचे काम उच्च जातीयांनीच केले आहे. योगीही अशाच जातीचे प्रतिनिधी आहेत. जातिअंताचा नव्हे तर मते मिळवण्याचा मार्ग सहभोजनातून जातोय असे त्यांना वाटत असेल तर त्यांचे अध्यात्म आणि त्यांचा नवा धर्मवाद कच्चा आहे, असे मानावे लागेल. जाती संपवण्यासाठी स्वतः प्रथम डिकास्ट होण्याची आवश्यकता असते. पण एवढी ताकद स्वतःला सामर्थ्यवान योगी समजणाऱ्याकडेही नाही. मुळात अशी ताकद मिळवायची इच्छा कुणा पुढाऱ्यांना किंवा जातीचे टॉनिक पिऊन सशक्त होणाऱ्या पक्षांनाही नाही. तशी ती चुकून मिळाली तर मग जातीचे राजकारण कसे करायचे, हा नाजूक प्रश्न तयार होईल. तूर्त त्यांना सहभोजनच सोयीचं वाटतं. कारण पाच वर्षांतून एकदाच ते करायचं असतं.

## मद्यालये, विद्यालये आणि त्यांच्या मालकीचे सम्राट

महाराष्ट्रात कधी-कधी आक्रीत वाटाव्यात अशा गोष्टी घडत असतात. परवा अशीच गोष्ट घडली आणि ती म्हणजे राज्यातल्या काही बलाढ्य आणि धनदांडग्या बिल्डरांनी शाळा लवकर सुरू करा, विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, असा एकाएकी गळा काढला. बऱ्याच जणांना आश्चर्य वाटले. सिमेंट-विटांचा धंदा करणाऱ्या या बांधकाम सम्राटांना गरिबांच्या मुलांच्या शिक्षणाची काळजी का वाटायला लागली? त्यांच्या मदतीला काही स्वयंघोषित शिक्षणतज्ज्ञही धावले. अलीकडे एक गोष्ट चांगली आहे आणि ती म्हणजे ज्यांना शिक्षणावर लिहायला, बोलायला येते ते शिक्षणतज्ज्ञ होतात आणि ज्यांना कशावरही कसेही भाषण करता येते ते विचारवंत होतात. तर बांधकाम सम्राटांच्या मदतीला काही पोपट शिक्षणतज्ज्ञही धावले आणि आपली प्रतिभा वापरून त्यांनी नवी घोषणा केली. मद्यालये सुरू आणि विद्यालये बंद अशी ती घोषणा होती. उद्या कोरोना संपल्यावर शाळेतल्या पोरांना कोणीतरी निबंध लिहायला सांगेल.

शिक्षणाचा विषय घेऊन बिल्डर का धावले, हा प्रश्न शिल्लक राहतोच. त्याचे साधे सरळ उत्तर असे, की इमारती बांधणारे व्यावसायिक एक नवा व्यवसाय, विनाअनुदान तत्त्वावरचा व्यवसाय म्हणून शिक्षण क्षेत्रात घुसले. शाळा, हायस्कूल, महाविद्यालये, मेडिकल कॉलेज ते अगदी विद्यापीठांपर्यंत त्यांनी मजल मारली. सर्वात ताजा आणि हुकमी पैसा येतो तो खासगीच्या दारात बांधल्या गेलेल्या शिक्षणातून. कुणी अभ्यास केल्यास समजेल, की बहुतेक मोठे बिल्डर शिक्षण क्षेत्रात घुसले आहेत. पूर्वी विड्यांचा व्यापार करणारे शिक्षण आणि संस्कृती, कला क्षेत्रात आले. काही मद्यक्षेत्रात गेले, तर बहुतेक जण पैसा आणि प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या शिक्षण क्षेत्रात घुसले. विद्यामंदिरांना त्यांनी विद्यापेठा बनविल्या. पोपटवाले शिक्षणतज्ज्ञ हाताशी घेऊन शिक्षण ठरवण्याच्या धोरणातही त्यांनी शिरकाव केला. कोरोनामुळे शाळा बंद पडल्या. दुभती म्हैस रात्रीत आटावी तसं झालं. इतकी मोठी गुंतवणूक, पंचतारांकित इमारती उभ्या करून ठेवल्या आहेत आणि या शाळा बंद. काहीही झाले तरी शाळा सुरू व्हायलाच हव्यात अशी गरज निर्माण झाली. उच्चभ्रू पालकांच्या डोळ्यातही ती घुसवण्यात आली. कुठल्यातरी पोराला पाठव पत्र सरकारला असं सांगण्यात आलं. मद्यालये चालू तर शाळा का नको, अशा घोषणा चालू झाल्या.

आमची पोरं कोरोनाचे बळी होऊ देत; पण शाळा उघडाच असा अर्ज कोणत्या पालक संघटनांनी केलेला नाही. कोवळ्या पोरांना कोरोनाची बाधा झाल्यावर त्याची जबाबदारी कोण आणि कशी घेणार याविषयी कोणी बोलत नाही. एक वर्ष शाळा बंद पडल्या म्हणजे जूण काही जगबुडी होणार, असा प्रश्न तयार केला जात आहे, जो भांडवलशाहीच्या हिताचा आहे. शाळेतलं शिक्षण कसं सुधारेल, ज्ञानी समाज कसा तयार होईल यावर बांधकामसम्राट आंदोलन करू असे कधी म्हणत नाहीत. आपल्या नोकऱ्या जातील या भीतीनं काहीही करून ऑनलाईन, ऑफलाईन शिकवण्याची सोय करा, असे पुतना मावशीचा पान्हा व्यक्त करत बोलणारे शिक्षक एकीकडे, शिक्षणाच्या बाजारपेठेतला शेअरचा भाव वधारायला लावणारे धनदांडगे दुसरीकडे आणि या दोघांच्या दबावाखाली येणारे सरकार तिसरीकडे, अशी अवस्था आहे. या त्रिकोणात शिक्षणाला लकवा भरतोय आणि फेस विद्यार्थी व पालकांच्या तोंडाला येतोय. बाजारपेठेतले सौदागर रोखायचे असतील तर समाजवादी जे म्हणतात ते ऐकायला हवे. सर्वांना मोफत, सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शासनाच्या मालकीचे शिक्षण असे ते सांगतात. या मागणीला धनदांडगे पाठिंबा देणार आहेत काय?

●●●

# छळणाऱ्या, अस्वस्थ करणाऱ्या कहाण्या : सूर्याचे सांगाती

*ज्येष्ठ साहित्यिक बाबूराव बागूल यांच्या आतापर्यंत संग्रहित नसलेल्या आठ कथांचा संग्रह सूर्याचे सांगाती या शीर्षकाने नुकताच प्रकाशित करण्यात आला आहे. बागूल यांच्या निधनानंतर तब्बल तेरा वर्षांनी या कथा संग्रह रूपाने आलेल्या असल्या तरी त्या समकालिन वाटाव्या इतक्या प्रभावी आहेत.*

**सुदीप गुजराथी**




**ग्रंथपरिचय**

बाबूराव बागूल या महालेखकाची कथा म्हणजे वेदनांचा वन्हीच. त्यातला एकेक शब्द माणसाला जाळत, अस्वस्थ करत जातो. शोषणाच्या या कहाण्या पुढचा कितीतरी काळ माणसाला छळत राहतात. बागूल यांनी आपल्या कारकीर्दीत अवघ्या २९ कथा लिहिल्या. त्यांपैकी दहा कथा 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६३) आणि अकरा कथा 'मरण स्वस्त होत आहे' (१९६९) या कथासंग्रहात समाविष्ट आहेत. उर्वरित आठ कथा मात्र आतापर्यंत असंग्रहितच होत्या. त्या 'सूर्याचे सांगाती' या नव्या कथासंग्रहातून वाचकांसमोर आणण्यात आल्या आहेत.

मुंबईच्या लोकवाङ्मय गृह प्रकाशनाने काढलेल्या या कथासंग्रहाचे संपादन प्रसिद्ध लेखक व समीक्षक जी.के. ऐनापुरे यांनी केले आहे. संपादन नेमके कसे असावे, याचा वस्तुपाठच त्यांनी यानिमित्ताने घालून दिला आहे. संपादकाच्या भूमिकेतून त्यांनी लिहिलेली ७६ पानांची दीर्घ व अभ्यासपूर्ण प्रस्तावना हे या संग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येईल.

**असामान्य दूरदृष्टीचा प्रत्यय**

ऐनापुरे यांची प्रस्तावना व बागूल यांच्या आठ कथा असे या संग्रहाचे ठळक दोन भाग सांगता येतात. 'नवकथाकार बाबूराव बागूल' असे शीर्षक असलेल्या प्रस्तावनेत ऐनापुरे यांनी बागूल यांच्या कथेचे वेगळेपण नोंदवताना एकूणच मराठी साहित्यातील आपपरभाव करणाऱ्या सांस्कृतिक व्यवहारांचाही पद्धतशीर समाचार घेतला आहे. बागूल यांच्या कथेची जातकुळी, तिचे टिकाऊपण, नवकथेच्या इतिहासात तिची झालेली उपेक्षा, तरी झळाळून निघालेले कालातीतपण इथपासून ते भारतातील जातवास्तव, सांस्कृतिक प्रभुत्व की सांस्कृतिक वर्चस्व या नव्या विचाराला सामोरे जाण्याचे आव्हान अशा विस्तीर्ण पटाची मांडणी ऐनापुरे करतात. बागूल यांनी 'जेव्हा मी जात चोरली होती' कथा साठच्या दशकात लिहिली; पण २०२१ मध्येही जात लपवल्याचा आरोप करत गरीब स्वयंपाकीण बाईवर गुन्हा दाखल करणाऱ्या पुण्याच्या मेधा खोलेबाईंच्या प्रकरणावेळीही या कथेची आठवण झाली होती, याची जाणीव ऐनापुरे करून देतात आणि त्यातून बागूल यांच्या कथेचे काळाला पुरून उरण्याचे सामर्थ्य अधोरेखित करतात. साठच्या दशकातील कथेचा प्रत्यय २०२१ मध्ये येणे दुर्दैवी असले, तरी ते बागूल यांच्या असामान्य दूरदृष्टीचा प्रत्यय देणारे ठरते, हे येथे प्रकर्षाने ध्वनित होते.

**दोन कथांशी तुलना**

'नव्या कथा किंवा गद्य लिहिण्यासाठी 'मनुस्मृती'तील नियमांचा अवलंब करावा लागतो. रामायण-महाभारतातील दंतकथा, फँटसी, कथेची भाषा, रचना, पृष्ठमर्यादा अशा चर्चेतून हे नियम तयार झाले असून, अव्वल वाङ्मयीन मासिकांचे संपादकही कथेकडे या आग्रहाने बघताना दिसतात. मराठीतल्या नवकथेने या नियमांच्या उपयोजनेतून कथेचे रूप तयार केले', अशी मांडणी ऐनापुरे करतात. 'हे रूप वास्तववादाच्या विरोधात जाणारे, आशयाला गुंडाळून ठेवणारे, ब्राह्मणी सांस्कृतिक वर्चस्ववादाला पुष्ट करणारे आहे. त्याच्याविरोधात वास्तववादाच्या अधिक जवळ जाणारे, वर्तमान घडामोडीला आशयात बंदिस्त करून त्याला बदल, चळवळ, इतिहासातील अन्याय अशा भिंगाखाली ठेऊन बघणारे आणखी एक रूप आहे. कथेच्या या दुसऱ्या रूपाचे प्रवर्तन करणारी बाबूराव बागूल यांची कथा आहे', असे विवेचन ऐनापुरे करतात. त्याला आधार देण्यासाठी ते बागूल यांची 'पेसूक' व प्रख्यात कथालेखक विलास सारंग यांची 'नारी-सिंह' या दोन कथांची तुलना करतात.

**जुन्या शीर्षकातील बदल**

ऐनापुरे यांनी या संग्रहातील कथांचा अनुक्रमही अत्यंत

विचारपूर्वक लावला आहे. त्याविषयी ते म्हणतात, ‘बागूलांच्या कथेतला सर्वहारा वर्गाला कवेत घेणारा आशय हेच त्यांच्या टिकाऊपणाचे कारण आहे. ग्रामीण-दलित-मार्क्सवादी-आंबेडकरवादी अशा एकत्रितपणाचा परिणाम साधणारी ही कथा आहे. जात-वर्गशत्रूंना उघडे पाडून त्यांना एका रेषेत आणणारी ही कथा आहे. या कथांचा क्रम लावताना हा सकारात्मक पूर्वग्रह अधिकच बळकट होतो.’ संग्रहातील कथानुक्रम, कथांची जुनी शीर्षके, नवी संभाव्य शीर्षके व स्वीकारलेली शीर्षके याचा एक तक्ताच प्रस्तावनेत अंतर्भूत करण्यात आला आहे. मात्र, येथे जुन्या शीर्षकांत बदल करावासा का वाटला, याचेही विवेचन आले असते तर आणखी बरे झाले असते. तथापि, सध्याचा वाचक फेसबुक, व्हॉट्सॲपला जोडलेला असल्याचे ऐनापुरे यांनी म्हटले असल्याने अशा वाचकांचा विचार करून बहुधा हा बदल करण्यात आला असण्यास वाव आहे.

संग्रहात बागूल यांच्या एकूण आठ कथा आहेत. त्या सर्वच्या सर्व त्यांच्या इतर कथांप्रमाणेच भेदक आणि अक्षरश: अंगावर येणाऱ्या आहेत. वंशभेदाचे अमानुष अनुभव, नव्या सांस्कृतिक व्यवहारांशी होणारा जुन्या पिढीचा झगडा, चळवळीतल्या कार्यकर्त्यांची झालेली वाताहत, जुन्या प्रथांचे जोखड झुगारून देण्यासाठी करावा लागणारा संघर्ष असे धगधगते विषय या कथांतून हाताळण्यात आले आहेत. प्रत्येक कथा माणसाला मुळापासून हादरे देणारी आहे. ‘आंधळा उजेड’ या कथेतलं प्रत्येक वाक्य तर जणू एक वेगळी कथा आहे. या कथेतला आंधळा म्हातारा कर्मकांडे आणि उपेक्षितांची दु:खे यांचे नाते उलगडताना अपार वेदनेने म्हणतो-

**‘इठंच मी कह्याला जलम घेतला? या दु:खाच्या देशात! एवढं नाना तऱ्हाचं दु:ख इठंच कसं? इठं तं तैतीस कोटी देव! तरी भी एवढी दु:खं. म्हंजी जवा जवा दु:ख लय वहाडलं तवा तवा एकेक देव जलमाला आला. जिठं देव लय तिठं दु:खं भी लय. जवा दु:ख कमी व्हईल तवा देव भी कमी व्हतील...’**

## *भळभळत्या जखमांची दाहक जाणीव*

*‘फकिराचा वंशज’मधले जातवास्तवाच्या विस्तवाचे दर्शनही हलवून सोडणारे. महार, ढोराची पोरे असल्याने मास्तरने त्यांना वर्गाबाहेर उन्हात बसवल्यानंतर सहन करावा लागणारा अपमान, सारखी मांडी घालून अवघडून गेलेले अंग, ‘भोसडीच्या मांगा-म्हाराचे असून ऊन लागतंय’, असे म्हणत मास्तरने फेकलेला रूळ हे सारे वर्णन अंत:करण पिळवटून टाकते आणि माणूसपणालाच नकार देणाऱ्या जुलमी व्यवस्थेविरोधात विद्रोहाची आग तयार करते. ‘नेहमीप्रमाणे आजही त्याच्या वंचनेचा वाढदिवस साजरा झाला’ (तुरुंग) यासारखी असंख्य वाक्ये कथित उच्च समाजाने नाकारलेल्या माणसांच्या भळभळत्या जखमांची दाहक जाणीव करून देतात. बागूल यांच्या साहित्यातील महत्त्वाचा भाग असलेल्या या कथा त्यांच्या निधनानंतर तेरा वर्षांनी संग्रहरूपाने आल्या आहेत. तरी त्या समकालीन वाटाव्यात इतक्याच प्रभावी आहेत. त्या आवर्जून वाचायला हव्यात. कारण कित्येक अनाम पीडितांच्या वेदनांना शब्द देणारा तो एक विलक्षण वास्तववादी पट आहे.*

**सूर्याचे सांगाती**
**(बाबूराव बागूल यांच्या असंग्रहित कथा)**

**संपादक : जी. के. ऐनापुरे**

**प्रकाशक : लोकवाङ्मय गृह, मुंबई**

**पृष्ठे : १६८**

**मूल्य : २०० रुपये**

**(पान २७ वरून)**

# भक्तिपंथ : धार्मिक स्वातंत्र्य व समतेसाठीचा संघर्ष

ईश्वरी प्रेम आहे. तो निरंतर विकास आहे भावनांचा, प्रज्ञेचा, प्रेमाचा. त्यामुळे भक्तिसंप्रदायात ईश्वर नव्हे माणूसच केंद्रस्थानी आहे. समता हे भक्तिसंप्रदायाचे मूलतत्त्व आहे. म्हणूनच ते परंपरेच्या विरोधी आहे. त्यामुळे संतांचा अतोनात छळ झाला व काहींचे खूनही झाले. धार्मिक सहिष्णुतेचा आग्रहही या भक्तिसंप्रदायात आढळतो. कारण प्रेमापलीकडे जीवनाचा मोठा धर्म असू शकत नाही. अमीर खुसरो लिहितो :

**Lovers of the friend us to kaba and to the temples of idols-**

**Lovers of the freind do not bother with infidility and faith.**

मुस्लिम संतांनी हिंदूंच्या मूर्तिपूजेवर कधी टीका केलेली नाही. मुस्लिम राजवटीतही हिंदू-मुस्लिम भक्तिसंप्रदायातील ही सहिष्णुता, सौहार्द आणि परस्परांवरील प्रेम आश्चर्यकारक आहे. भक्तिसंप्रदायातील सखी संप्रदाय दोन्ही धर्मांत आहे. ईश्वरालाच आपला प्रियकर मानून आपले सर्वस्व अर्पण करणे त्यात अभिप्रेत आहे. संत मीराबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई अशी अनेक देदीप्यमान उदाहरणे सर्वच धर्मसंप्रदायांत आढळून येतात. सेंट थेरेसा यांनीही आपला प्रेम व भक्तीतील गूढ अनुभव नमूद केला आहे. स्त्रियांना खरे स्वातंत्र्य भक्तिसंप्रदायांमुळेच मिळाले. अर्थात, ते धार्मिक क्षेत्रातच. दक्षिणेतील खरा क्रांतिकारक संत म्हणून बसवण्णांनाच ओळखले जाते. भारतातील पहिला अस्पृश्य-ब्राह्मण विवाह त्यांनीच लावला. अर्थात, त्या नवविवाहित दाम्पत्याला राजाने हत्तीच्या पायी देऊन ठार मारले. वर्णव्यवस्थेने लोक किती आंधळे झाले होते, हे यावरून लक्षात येते. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत)**

## कविता



# सावित्रीची लेक

सावित्रीची लेक निघाली
आता सीमापार
तूच उघडले मायमाऊली
ज्ञानाचे हे दार ।।१।।

ज्योतीची ही आच निराळी
जीवनात या आल्या सकाळी
घेऊन गेलीस जीवन आमुचे
अंधाराच्या पार ।।२।।

घराघरातच उजेड आला
माणूस माणूस शहाणा झाला
पिचलेल्या या शब्दांनाही
आली आता धार ।।३।।

ज्ञानाच्या या शिखरावरती
आज पोचली अवघी धरती
अलौकीक या आनंदाने
कळला जीवन सार ।।४।।

नव्हेस अबला, तू तर सबला
हरेक प्रांतच तूच व्यापला
तुझ्यामुळे हा गडे भविष्या
येतो आहे बहार ।।५।।

**– भीमराव धुळूबुळू**
मिरज, जि. सांगली

# छंद वाचनाचा

पुस्तकांची दुनिया न्यारी
चित्र-चरित्र कथा कहानी।
ज्ञानाची ही अनमोल शिदोरी
कधी गावे गजल गाणी।

पुस्तकाशी होता मैत्री
जगण्याचा अर्थ कळे।
तीर्थ पवित्र ज्ञानज्योतिने
दीन-दुःखितांचे भाग्य उजळे।

ज्ञानाचा हा अफाट खजिना
पुस्तकांनीच समृद्ध केला।
चोर, लुटेरे आले गेले
नाही कुणाच्या हाती आला।

पुस्तकाशी जोडून नाते
महामानव प्रगल्भ झाले।
यशोगाथा आम्हा सांगते
वाचनानेच समृद्ध केले।

म्हणून छंद जोपासू वाचनाचा
पुस्तकांशी होऊ एकरूप।
धडा घेऊ नीतिमूल्यांचा
जीवन होईल सुस्वरूप।

**– प्रा.डॉ. द्वारका गिते-मुंडे**
नांदूरघाट, जि. बीड



# नामांतर लढा



पँथरच्या डरकाळीने
सुरुवात झाली लढ्याची
अस्मितेच्या लढाईपायी
पर्वा केली नाही जीवाची

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे
हे मनात रुजलं होतं
अडाणी होतो तरीसुद्धा
विद्यापीठास बाबाचं नाव हवं होतं

नावात काहीही नाही हे
ठाऊक आहे आम्हास
पण त्यामुळे त्या नावाच्या विद्यापीठात
शिकण्याची
आस लागत राहते विद्यार्थ्यास

शिकण्यास गेल्यानंतर तिथे
होते निराशा विद्यार्थ्यांची
नामांतर होऊन ठीक झाले पण
कमतरता आहे तिथे उत्तम ज्ञानाची


नामांतरासाठी शहीद झालेल्यांचा
उद्देश अजून बाकी आहे
त्याचे सोहळे करण्यातच
आम्हाला खुशी आहे

इतिहास लक्षात ठेवण्याची भाषा करणारे
इतिहास बार-बार सांगत बसत आहेत
इतिहास घडवायचं विसरून
इतिहासातील सोहळे साजरे करण्यात गुंग
आहेत

इतिहास घोकल्याने भविष्यकाळ
आदर्श व उत्तम कसा घडेल?
त्यासाठी वर्तमानात जगावं लागतं
त्यामुळे भविष्य उत्तम घडेल व इतिहास
निर्माण होईल

**– जी. संदीप (गोणार, नांदेड)**

# ग्रेट थॉट्स




**गुलामगिरीने सुंदर नावे धारण केलेली असली तरी ती सर्वात वाईटच असते**

**– मौलाना अबुल कलाम आझाद**
(स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री, इस्लामिक धर्मशास्त्रज्ञ आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते)

---

**तुम्ही अशा माणसावर तुमचे प्रेम वाया घालवू नका; ज्याला त्याची किंमत नाही**

**– विल्यम शेक्सपिअर**
(इंग्रजीजील सर्वोत्कृष्ट लेखक, नाटककार, कवी)



---




**कोणतीही व्यक्ती पैशाविना गरीब नसते, तर स्वप्न आणि महत्त्वाकांक्षा नसेल तर ती व्यक्ती खरोखरच गरीब असते**

**– स्वामी विवेकानंद** (भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ)


---

**ऐशोआराम हा जीवनाचा गंज आहे, प्रतिभेचे मरण आहे, सर्व शक्तींचा ऱ्हास आहे**

**– साने गुरूजी** (ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, लेखक आणि समाजसेवक)




---



**बुद्धिमत्तेचे खरे लक्षण ज्ञान नसून कल्पनाशक्ती आहे**

**– अल्बर्ट आईनस्टाईन** (महान जर्मन भौतिकशास्त्रज्ञ आणि सापेक्षता सिद्धांताचे जनक)

---




**यशस्वी शिक्षण हा यशस्वी जीवनाचा पाया आहे**

**– विनोबा भावे** (अहिंसा आणि मानवी हक्काचे पुजारी, भूदान चळवळीचे जनक)

---

**चुका करण्यात घालवलेले आयुष्य हे केवळ अधिक सन्माननीय नाही, तर काहीही न करता घालवलेल्या आयुष्यापेक्षा अधिक उपयुक्त आहे**

**– जॉर्ज बर्नार्ड शॉ** (आयरिश नाटककार आणि समीक्षक)



---




**एक उत्कृष्ट पुस्तक शंभर चांगल्या मित्रांसमान असते; परंतु एक चांगला मित्र एका वाचनालयासमान असतो**

**– डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**
(भारताचे माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन)


---

**आपण आपले पाय योग्य ठिकाणी ठेवल्याची खात्री करा, नंतर खंबीरपणे उभे रहा**

**– अब्राहम लिंकन** (अमेरिकेचे १६ वे राष्ट्राध्यक्ष)



---



**आम्ही तेच आहोत, जे आम्ही वारंवार करतो. त्यामुळे उत्कृष्टता ही कृती नाही तर सवय आहे**

**– ॲरिस्टॉटल** (तत्त्वज्ञान आणि विज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत योगदान देणारे ग्रीक तत्त्वज्ञ)

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460



With Best
Compliments from

AJIT CONSTRUCTION